२ डिसेंबर १९७२ • पन्नास पैसे

# माणूस

## इन्सिडंट ऑन हिल ७९२



पन्नास पैसे

शनिवार
२ डिसेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

: बारा अंक : सव्वीस

## मुक्काम शहादे

धुळे जिल्ह्यातील शहादे तालुका शेतीच्या दृष्टीने संपन्न आहे. तापी व गोमई या दोन नद्यांनी या प्रदेशाला संपन्न करून टाकले आहे. तेथे सहकारी साखर कारखाना उभारण्याचे प्रयत्न गेली दहा वर्षे तेथील पुढारी करीत होते. सहा कोट रुपये खर्च करून हा कारखाना उभारण्यात आला आहे. कायम सुमारे पाचशे लोकांना काम मिळणार आहे. हंगामात आणखी हजार लोकांना काम मिळण्याची शक्यता आहे. या भागातल्या संपन्न शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सरकारच्या सहाय्याने हा कारखाना उभा केला आहे. त्यामुळे त्यांचा अधिक संपन्न होण्याचा माग सुरू झाला आहे. या कारखान्याचे उत्पादन दिवाळीच्या सुमुहूर्तावर सुरू झाले. कारखान्याचे उद्घाटन भारताचे अर्थ-मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी १८ नोव्हेंबरला केले. त्यांचे सोबत महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री ना. मधुकरराव चौधरी होते.

शहादे भागात भूमिहीन शेतमजूर कंगाल अवस्थेत रहात आहेत. एवढा संपन्न प्रदेश असून येथील शेतमजूर उपासमारीत जीवन कंठीत आहे. मजुरी अत्यंत कमी. आठवड्यातून काही दिवसच काम मिळते. या भागातल्या छोट्या शेतकऱ्यांची स्थिती तशीच आहे. साधनांअभावी त्यांचीही उपासमार होत आहे. अनेक प्रश्न या भागातल्या गरिबांचे आहेत. ते संघटितपणे सोडवण्याचे प्रयत्न ग्रामस्वराज्य समितीच्यावतीने होत आहेत. ना. यशवंतराव चव्हाण

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

येणार तर त्यांचे कानावर आपण आपली गाऱ्हाणी घालावीत असं लोकांनी ठरवलं.

या निमित्ताने काढलेल्या पत्रकात साखर कारखान्याच्या उद्घाटनानिमित्त होणारी जेवणावळ थांबवावी असे म्हटलेले होते. धुळे जिल्ह्यात च महाराष्ट्रात दुष्काळाची भीषण छाया पसरलेली असताना, मोठमोठ्या जेवणावळी होणे ठीक नाही हे कोणालाही पटण्यासारखं होतं. कारखान्याच्या संचालकांनी शहाद्याला बोर्ड लावून जेवणावळ रद्द करण्यात आल्याचे जाहीर केले. या निमित्ताने आणलेल्या कोंबड्या व बोकडांचे काय करायचे असा प्रश्न पडला. त्या दिवसापुरते तरी त्या बिचाऱ्यांचे प्राण वाचले.

ना. चव्हाण ठरल्यावेळी शहाद्याला पोचले. प्रथम सहकारी साखर कारखान्याचे उद्घाटन, शहादा कॉलेजचे उद्घाटन, सेंट्रल बँकेच्या शहादा शाखेचे व शहादा नगरपालिकेच्या नव्या वास्तूचे उद्घाटन हे कार्यक्रम करून ते विश्रामधामात आले. मोर्चा येणार हे पूर्वीच जाहीर झाल्यामुळे या लोकांना शेवटी मी भेटेन असे ना. चव्हाण यांनी कळवले होते. मोर्च्यासाठी गावोगावचे लोक पायी चालत शहाद्याला आले होते. बारा वाजता हा मोर्चा टेकभिलाटीतून सुरू झाला. मोर्चात शहादे शहरातील काही विणकरही सामील झाले होते. शहाद्याला पूर्वी पाचशे हातमाग चालत. ही हातमाग चालवणारी गरीब मुसलमान मंडळी आहेत. गेल्या दहा वर्षात त्यांचे हातमाग पूर्ण बंद झाले आहेत. त्यांनी सोसायटी बनवली. त्यांना सोळा पॉवरलूम्स मिळाले त्यावर तीस लोकांना काम मिळते. बाकी सर्व विणकर बेकार. मोलमजुरी करतात. आणखी पंचवीस पॉवरलूम्स सोसायटीने मागितले. परंतु मिळाले नाहीत. अत्यंत हलाखीचे जीवन आज हे विणकर जगत आहेत. दुसरे सामील झाले होते गाडीवान. साखर कारखान्याच्या संचालकांनी नगर, बीड, औरंगाबाद आदी जिल्ह्यातून ऊस तोडीकरता करार करून गाडीवानांना बोलावलं. त्यांना तीन नोव्हेंबरला शहाद्याला हजर व्हायला सांगितलं. ते बिचारे हजर झाले. परंतु त्यांचेपैकी अनेकांना काम मिळाले नाही. त्यांची उपासमार तर होतच होती, परंतु त्यांच्या बैलांची होणारी उपासमार त्यांना पाहवत नव्हती. आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी हे गाडीवान मोर्च्यात सामील झाले होते.

मोर्चा दीड वाजता विश्रामधामाजवळ पोचला. दोन वाजता आपल्या लव्याजम्यासह ना. चव्हाण आले. लगेच त्यांनी मोर्च्याच्या प्रतिनिधींना बोलावले. प्रतिनिधींनी त्यांना निवेदन दिले. ते ना. चव्हाण यांनी वाचले व म्हणाले, हे सर्व प्रश्न आहेत. मी आपल्या सर्वांच्या भावनांशी सहमत आहे. शासन आपल्या परीने प्रयत्न करीत आहे. त्यात काही उणिवा असतील तर त्या सुधारल्या पाहिजेत. ना. मधुकरराव चौधरी शेजारीच बसलेले होते. ते म्हणाले, या

प्रश्नांची तड लावण्यासाठी व अडचणी दूर करण्यासाठी नागपूर अधिवेशन संपताच मी दोन तीन दिवस येईन. ना. चव्हाणांना कार्यकर्त्यांनी गाडीवाल्यांच्या अडचणी समजावून सांगितल्या. कारखान्याचे अध्यक्ष पी. के. पाटील हे तेथेच होते. त्यांना याबाबत विचारता त्यांनी सांगितले. कारखान्याचा बॉयलर सुरू व्हायला वेळ लागल्यामुळे सर्वांना काम मिळाले नाही, लवकरच सर्वांना काम देण्यात येईल. ना. मधुकरराव चौधरी शेजारी उभ्या असलेल्या कलेक्टरना म्हणाले, जोपर्यंत कारखान्यात काम मिळत नाही तोपर्यंत मागेल त्याला काम देण्याच्या योजनेतून या गाडीवानांना काम द्या. कलेक्टरनी ते मान्य केले. बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्यावर गरीब शेतकऱ्याला कर्ज मिळत नाही ही गोष्ट ना. चव्हाण यांनी मान्य केली. परंतु सरकारचा प्रयत्न शेतकऱ्याला कर्ज मिळेल असा आहे, असेही त्यांनी सांगितले. हे सर्व प्रश्न मार्गी लागले पाहिजेत. त्या दृष्टीने ना. मधुकरराव चौधरी लवकरच इकडे येतील असे त्यांनी शेवटी सांगितले. नंतर ते लगेच बाहेर आले व मोर्च्यातील लोकांसमोर त्यांनी भाषण केले–तुमचे प्रश्न, अडचणी मला समजल्या आहेत. त्या सोडवण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. ना. मधुकरराव चौधरी येथे आहेत. त्यांनी आत्ताच सांगितलं आहे की, ते या भागात लवकरच येतील व आपल्या सर्व अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करतील. उन्हातान्हातून आलल्या लोकांचं कौतुक करून ना. चव्हाण यांनी आपले छोटे भाषण संपवले.

ना. चव्हाणांचे भाषण संपताच ते निघून गेले व त्यानंतर मोर्चासमोर मुंबईचे डॉ. पी. व्ही. मंडलीक, प्रा. सदानंद वर्दे, कुमार शिराळकर, अमरसिंग सूरवंती, बी. डी. पाटील व गोविंदराव शिंदे यांची भाषणे झाली. सर्वांनी भाषणात, सर्व गरिबांनी आपली एकजूट करून आपले प्रश्न सोडवायचा प्रयत्न करावा असे सुचवले. आज साखर कारखान्याच्या उद्‌घाटनाचे निमित्ताने त्या गावाचे नाव 'पुरुषोत्तम नगर' ठेवण्यात आलं. कारखान्याचे अध्यक्ष श्री. पी. के. पाटील यांनी आपलेच नाव या नगराला दिले, त्याबद्दल काही वक्त्यांनी खेद व्यक्त केला. श्रमिकांच्या एकजुटीचा विजय असो ही घोषणा देऊन सभा समाप्त झाली.

मुंबईचे डॉ. पी. व्ही. मंडलिक व प्रा. सदानंद वर्दे शहादे भागात ग्रामस्वराज्य समितीच्यावतीने चाललेले काम पाहण्यासाठी आले होते. त्यांनी पाडळदे, नांदिये, चिखली, कन्साई, सातपिपरी आदी गावांना भेटी दिल्या. या भागातील लोकांच्या अडचणी समजावून घेतल्या व त्या दूर करण्याचा मार्गही लोकांना सांगितला. शहाद्याला कार्यकर्त्यांच्या सोबत कामासंबंधी त्यांनी चर्चा केली. पुढील कामाच्या दृष्टीने काही उपयुक्त सूचनाही केल्या.

**शहादा येथील एक कार्यकर्ता**

# २८ नोव्हेंबर !

**श्री. ग. मा.**

शेतकरी हा हिंदुस्थानच्या प्रगतीचा कणा आहे, हे केंद्रसत्य म. फुले यांनी स्वच्छपणे ओळखलेले होते.

हा कणा सर्वत्र मोडून पडलेला ते पाहत होते.

टिळकही ही वस्तुस्थिती समजावून घेत होते. लहान, स्वतंत्र शेतकऱ्याचा मृत्यू त्यांना दिसत होता. पुणे जिल्ह्यातच टिळक तरूण असताना शेतकऱ्यांचे एक बंड उसळलेले होते. दुष्काळात टिळक महाराष्ट्रभर फिरले, शेतकऱ्यात त्यांनी जागृती उत्पन्न केली, त्या वेळीही त्यांना या केंद्रसत्याची महती चांगलीच प्रत्ययास आलेली होती.

फुले आणि टिळक या दोघांनी शेतकरी खंगत-मरत असलेला डोळयांनी पाहिला. या संहाराची मीमांसा मात्र दोघांनी वेगवेगळी केली.

फुल्यांनी भटशाहीला मुख्यत: जबाबदार धरले. टिळकांनी सर्वांनाच गुलाम करून टाकणाऱ्या परकीय इंग्रज सत्तेला दोष दिला.

गावोगावचा भट-सावकार उखडला व त्याचेजागी एखादा कर्तव्यदक्ष, नि:पक्षपाती गोरा अधिकारी आणून ठेवला की शेतकऱ्याची दुर्दशा संपेल असा फुल्यांचा विश्वास होता. त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या चळवळीचा मांड मांडला, संस्था वगैरे काढून भटशाहीविरोधाचे मोठेच रान महाराष्ट्रात पेटवून दिले.

टिळकांनी हेच नेमके इंग्रजांबाबत केले. कारण शेतकरी वर्गाचा व एकूणच हिंदी जनतेचा, क्रमांक एकचा शत्रू इंग्रज आहे, देशी भटभिक्षुक किंवा शेठसावकार नव्हे असे त्यांचे मत होते.

सोने काठीला बांधून आता कुणीही हिंदुस्थानभर प्रवास करावा, वाटेत चोर–दरोडेखोर–पेंढाऱ्यांचे भय नाही; रेल्वे आली, तारायंत्रे–पोस्टाचे जाळे विणले गेले, शाळा निघाल्या, सुधारणांचे युग अवतरले, कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले–असे म्हणून ब्रिटिशांचे स्वागत करणाऱ्या मवाळांच्या भूमिकेशी फुल्यांची भूमिका मिळतीजुळती राहिली. काही प्रसंगी तर ती मवाळांपेक्षाही अधिक ब्रिटीशधार्जिणी ठरली. हाच आगरकर-फुल्यांमधील ही एक मतभेदाचा मुद्दा होता. उलट, 'अहो ! काठीला बांधायला सोने शिल्लक राहिलेच आहे कुठे मुळी ! साहेब सगळेच सोने विलायतेत घेऊन चालला आहे'– असा प्रतिपक्ष मांडून टिळकांनी आपला वेगळा आखाडा काढला.

एकमेकांविषयी आदर असला तरी टिळक-फुले यांचे जमणे शक्यच नव्हते.

कारण दृष्टिकोनात मुलभूतच फरक होता. टिळकांचा शत्रू हा अनेकदा फुल्यांचा मित्र ठरत होता. फुल्यांच्या शत्रुस्थानी असलेल्या वर्गाचे हितसंबंध टिळकांकडून वरचेवर जपले जात होते. तरीही एक गोष्ट जाणवते, टिळकांनी मवाळांना जसे ठोकले, सुधारकांवर टिळक जसे घसरले तसे फुल्यांवर घसरलेले दिसत नाहीत.

आज असे म्हणायला हरकत नाही, की दोघेही कमीजास्त प्रमाणात चुकतच होते.

टिळक साठ टक्के बरोबर ठरले. बैलाचा आणि हत्तीचा पाय हिंदी जनतेच्या उरावर होता असे मानले तर हत्तीचा पाय प्रथम काढू म्हणणाराच अधिक बरोबर ठरला यात आश्चर्य काही नाही. टिळकांची चळवळ मनुच्या माशाप्रमाणे वाढत गेली. सुराज्यापेक्षा स्वराज्याची ओढ जनसामान्यांना, तेल्यातांबोळ्यांना अधिक वाटली हे पुढील इतिहासानेच दाखवून दिले आहे.

फुले चाळीस टक्के बरोबर होते. रयतेवर उच्चवर्णियांचा, भटसंस्कृतीचा, शेठ-सावकारांचा बोजा आहे, परकीय इंग्रज सत्ता हा येथील जनतेच्या छाताडावरचा मोठा हत्तीचा पाय असला तरी दुसरा स्वदेशी शोषकांचा बैलाचा पायही दृष्टिआड करून चालणार नाही, या पायाच्या दावातूनही रयतेला मोकळे करणे अवश्य आहे, मोठ्या लढाईच्या अंतर्गत ही छोटी लढाईही खेळण्याची तयारी ठेवली पाहिजे, निदान तिला विरोधी भूमिका घेऊन तरी चालणार नाही ही एक स्वच्छ जाणीव टिळकांनी मोकळेपणे व्यक्त केलेली दिसत नाही. ही त्यांची चूक होती, त्यांच्या प्रतिपादनातील एक मोठीच उणीव होती.

दोघांच्याही या कमीजास्त चुका, दृष्टिकोनातील फरक परिस्थितीमुळे, पूर्वसंस्कारांमुळे, आपल्याकडील जातीय तटबंदीमुळे पडलेला असावा. कारण काळ जसजसा पुढे सरकला तसतसा उभयतांच्या भूमिकेत इष्ट तो बदल घडत गेलेला दिसतो. देवाने सांगितले तरी अस्पृश्यता मानणार नाही असे टिळक शेवटी शेवटी म्हणू लागले होते. मजूरवर्गाच्या उदयाकडेही ते आशेने पाहत होते. फुल्यांच्या चळवळीतही ब्राह्मणमंडळींचा प्रवेश होऊ लागला होता.

हे दोन विरोधी प्रवाह गांधींच्या काळात पुढे बरेचसे एकत्र आले. आंबेडकरांनी आपले वेगळेपण जपले, पण ब्रिटिश आपला मित्र नाही हेही ओळखले. म्हणूनच एकीकडे त्यांनी बौद्धधर्मही स्वीकारला आणि दुसरीकडे भारतीय घटनेचे शिल्पही तयार केले.

हाच सुमार. टिळक-फुल्यांचा उदयकाल. देश रशिया. १८९२ च्या प्रारंभी रशियातील एका प्रांतात (समारा) दुष्काळ पडला. रशियन शेतकरी असाच देशोधडीला लागत होता. लेनिनचाही हा उदयकालच होता. मार्क्सवादी अमृत प्राशन करून लेनिन ताजातवाना झालेला होता. तो या दुष्काळाची मीमांसा सांगू लागला——

'या दुष्काळाला एक विशिष्ट समाजरचना जबाबदार आहे. जोपर्यंत ही समाजरचना कायम आहे तोपर्यंत दुष्काळ पडणारच. आपण जर का ही समाजरचना नष्ट केली तरच आपण हे दुष्काळाचे संकट कायमचे नाहीसे करू शकू. प्रचलित समाजरचना उधळून लावण्याच्या दृष्टीने दुष्काळाची मदतच होत आहे. कारण दुष्काळामुळे शेतकरी समाज खेडेगावातून उठून शहरांकडे निघाला आहे. आता शेतीप्रधान अर्थव्यवस्था कोसळणार आहे. शहरात गेल्यावर शेतकरी औद्योगिक कामगार होणार आहे. मग तेथे या वर्गाला भांडवलशाही रचनेचं खरं स्वरूप अनुभवावं लागेल. या अनुभवांमुळे हा कामगारवर्ग एकदा जागृत झाला, की तो झारच्या जुलमी सत्तेला आव्हान देऊ लागणार आहे. हे सारं जितक्या त्वरेने घडून येईल तितका क्रांतीचा उष:काल जवळ आलाच याची खात्री बाळगा.'

वास्तविक दुष्काळाचा आणि भांडवलशाहीचा तसा काही अर्थाअर्थी संबंध नव्हता. भांडवलशाही देशातून दुष्काळाने केव्हाच पळ काढलेला होता व समाजवादी क्रांती होऊन दहा-वीस वर्षे उलटून गेली तरी रशिया-चीन या देशात दुष्काळ अधूनमधून डोके वर काढीतच होता. भांडवलशाहीमुळे शेतकरी विस्थापित होतो, पण नवे तंत्र


# Do you have . . .

1. **Historical Documents;**
2. **Archival Manuscripts;**
3. **Private papers of eminent persons, high Government officials, writers, scientists etc. who have played an important role in the history of the country.**

(Coins, films, photos, inscriptions, pot sherds, beads, etc., will not be considered for acquisition)

The Historical Documents Purchase Committee is likely to meet in the last week of January, 1973 to consider the acquisition of historical material of the above categories.

Persons desirous of selling these documents may please send a detailed item-wise list by 30th November, 1972 to the Secretary, Historical Documents Purchase Committee, National Archives of India, Janpath, New Delhi-1.

*The material offered for sale should not bc sent unless asked for.*

davp 72/352

योजनापूर्वक त्याने आत्मसात केले तर लेनिनची भविष्यवाणी खोटीही ठरू शकते. चीनमध्येच ती एका अर्थाने खोटी ठरली. माओने रशियाप्रमाणे सरसकट शेतीचे सामुदायिकीकरण न करताच चिनी शेतकऱ्याला गर्तेतून वर काढले. आपल्याकडे गांधीही हेच करू मागत होते. फक्त चरखा हा ट्रॅक्टर–बॉयलरशी सामना करायला फार दुबळा ठरला. पण आज फुले-टिळक, लेनिन यांच्यापेक्षाही आपल्या शेतकऱ्याला माओ-गांधीची धोरणे व कार्यक्रम अधिक मार्गदर्शक व उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. दुष्काळ हा नैमित्तिक आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील असमतोलाचा तो परिणाम आहे. असे असमतोलाचे अधूनमधून उद्भवणारे प्रसंग सहजासहजी निभवून नेण्याइतपत सर्वसाधारण शेतकरी सुदृढ असायला हवा. ब्रिटिश येण्यापूर्वी शेतकऱ्याजवळ असलेले जोडधंदे त्याला ही सुदृढता प्राप्त करून देत होते. या आधारामुळे दुष्काळ किंवा इतर प्रासंगिक आपत्ती आल्याच तर एकदम तो रस्त्यावर फेकला जाण्यापासून वाचू शकत असे. जोडधंदे हा एकप्रकारे त्याचा आयुर्विमा (Insurance) होता, पूरक अन्न होते. ब्रिटिशांनी हे जोडधंदे शेतकऱ्याकडून काढून घेतले, हेतुपुरस्सर आपल्या साम्राज्यविस्तारासाठी या जोडधंद्यांचे खच्चीकरण केले, हे सत्य टिळकांपेक्षाही अधिक स्पष्टपणे गांधींनी ओळखले – त्यावर खादी-ग्रामोद्योगाची मात्रा सुचवली. ही मात्रा आज जशीच्या तशी उगाळून अर्थातच चालणार नाही. काळ पुष्कळ पुढे सरकला आहे. घड्याळाचे काटे मागे फिरवता येत नाहीत. परंतु १८८०–९० साली दुष्काळावर ब्रिटिशांनी, त्यांना सोयीस्कर असे शोधून काढलेले इलाज आज आपण काहीही सुधारणा बदल न करता जसेच्या तसे अंमलात आणतच आहोत ना ? या तात्पुरत्या इलाजांनी आपला दुष्काळामुळे आज रस्त्यावर आलेला, उद्या लोकसंख्येच्या दबावामुळे पुन्हा गावाबाहेर फेकला जाणारा शेतकरी वाचणे शक्य नाही. स्वदेशीचा नवा काही तरी अर्थ लावून ग्रामोद्योगांना चालना देणे, शेतकऱ्याला आपल्या जमिनीवर स्थिर करणे हाच या ऱ्हासावरील कायमचा उपाय आहे. फार थोडी जमीन असलेला जपान जे करू शकला, पन्नास वर्षापूर्वी झाडाच्या साली खाऊन दुष्काळाला तोंड देणारा चीन, वाढती लोकसंख्या असतानाही जे साधू शकला ते आपल्यालाही साधणे अशक्य नाही. लोकशाही समाजवादाची चालू चौकट जरी नीट राबवली तरी हे जमू शकेल. अधिक क्रांतिकारक व तरुण शक्ती पुढे सरसावल्या तर चीन-जपानलाही आपण मागे टाकू शकू. का नाही ? □ □ □


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
heros: SBC-45 MAR
MALTeX BISCUITS
SATHE
MALTeX
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

# सिन्नर मुरूड आणि अकलुज

निळू दामले

वृत्तपत्रात एक वातमी. ' भिकूसा कामगारांचा १८ सप्टेंवरपासून वैठा संप सुरू झाला.'

अशा वातम्या नेहमी येतात. संप सुरू होतात. संपतात. गणतीच नसते संपांची ह्या सिन्नर शहरात.

असे हे सिन्नर. भूगोलात नासिक जिल्ह्यात पडते. गणपतीची प्रचंड मूर्ती हेही एक वैशिष्टच. ह्याच गणपतीच्या मांडीजवळून पावसाळा सोडता वर्षभर सांडपाणी वाहत असते. ह्या सांडपाणी नेणाऱ्या गटाराच्या काठावर खुराड्यातून पसरलेले विडी कामगार आणि राडचाच्या मधेच उठून दिसणारे ऊंट, शिलेदार, कोंबडा छापावर बांधलेले इमले हे ह्या शहराचे खरे वैशिष्टच.

भिकूसा, सारडा, वाजे अशा शेट लोकांची ही कर्मभूमी, वर्मभूमी.

गावात शिरतानाच सरकारच्या कृपा प्रसादाने चालणारे दारूचे आणि मटक्याचे अड्डे आपले स्वागत करतात. तसे हे अड्डे कुठेही दिसतातच; पण विडीवाल्यांची मुले इथे हे धंदे करतात हे ह्या अड्ड्यांचे वैशिष्टच.

सिन्नरच्या दारूच्या धंद्यात आज ३०% मुले विडीवाल्यांची आहेत.

अवक हा एक मुलगा. वडील-आई दोघेही विड्या वळायचे. वडील वारले. आईच्या मजुरीवर घर चालणे कठीण. हा मुलगा शाळेत जात असे. पाट्या पुस्तके परवडत नसत. मागितल्यावर आईचे धपाटे वसत. न आणल्यावर मास्तरांच्या छड्या. ११।१२ व्या वर्षीच दारूच्या भट्टीवर वसायला लागला. दुसरा मार्गच नव्हता. आज स्वतःची भट्टी आहे; मालक वनला आहे. दिवसाकाठी २०।२५ रु. कमवतो आहे. दारू वाईट असे सांगणाऱ्या त्याच्या एका मास्तरांना निवृत्त होतानाही जेवढा पगार मिळत नाही तेवढे पैसे हा आजच मिळवतो आहे. शासनाचे प्रतिनिधी–वर्दीवाले व विनवर्दीवाले–खिशात खुळखुळावत फिरतो. अगदी मार्क्सिस्ट पुढारीही ज्या पोलीस अधि-

काऱ्याला घाबरतात तो अधिकारी ह्याला वचकून असतो असा ह्या अबकचा रुबाब आहे. गावातले पुढारीही काळोखात ह्याच्याशीच सल्लामसलत करतात.

आपण जे काही करतो ते काही चांगले नाही ह्याची जाणीव कधीकधी त्याला बोचते. पण नीतीच्या कल्पना, उपदेशाचे डोस, कायद्याचे अर्थ ह्या सर्व गोष्टी त्याला जगवू शकत नाहीत, फोल वाटतात. त्याला जगायचे आहे. 'पैसा फेको तमाशा देखो ' हा न्यायच खरा आहे हे त्याला निवडणुकीत फार चटकन जाणवले. काहीही असो अबक हा सिन्नरमधला एक वजनदार माणूस झाला आहे. माणसांचा ताफा आहे, पैसा आहे, जगण्याला आवश्यक प्रतिष्ठा देण्यासाठी लागणारे वकील व पुढारी त्याच्याजवळ तैनातीत आहेत.

मला भेटला तेव्हाही त्याच्या पूर्ण लव्याजम्यासकटच भेटीस आला होता.

ह्या दुसरा गमभ ! विडीवाल्याच्याच घरचा. ५ भावंडे आहेत. एका वारात सर्वांचे कपडे व्हावेत अशा वयातच सर्वजण विडया वळायला आईला मदत करायचे. हा पोरगा हुशार. मॅट्रिक पहिल्या फटक्यात पास झाला. घरची दैन्यावस्था. समजायला लागल्यापासून मटक्याच्या अड्डयावर बसायला लागला. शाळेत असताना वर्गात मास्तरांना आकडा कळावा म्हणून हा पठ्ठा फळयावरच आकडा लिहून ठेवत असे. (कारण काही मास्तर चोरून आकडा लावायचे ! ) आता तरबेज झाला आहे. खूप पैसा मिळवतो. स्वत: एक अड्डा चालवायची उमेद बाळगून आहे.

' मित्र, मास्तर, सर्व सांगायचे, असे करू नकोस म्हणून, पण पोटापाण्याची व्यवस्था मात्र करू शकत नव्हते. ' असा रोख सवाल मटका वाईट नाही का असे विचारल्यावर खवळून गावातल्या तमाम प्रतिष्ठित लोकांच्या कुलंगडयांचा पाढाच वाचतो. आकडा लावायला येणाऱ्यांची, ज्यात मास्तर आहेत, पुढारी आहेत, सरकारी अधिकारी आहेत, मोठी यादीच काढून दाखवतो. नोकरीची वाट पाहून थकलेल्या आपल्या अनेक विडीवाल्या भाईबंदांना आता तो ' पोटा-पाण्याला ' लावू लागला आहे. १०।१२ वर्षांच्या पोरांची फौजच आहे !

ह्या मटक्याच्या धंद्यातही २५% पेक्षा जास्त मुले विडी वळणाऱ्यांची आहेत. फार मोठ्या प्रमाणात दारू, मटका व ' इतर ' धंद्यांकडे ह्या विडीकामगारांची मुलं वळू लागली आहेत.

३०।३५ हजार लोकसंख्येच्या ह्या शहरात अर्ध्याहून अधिक घरे विडीवाल्यांचीच आहेत.

हे विडी वळणारे लोक मुळातले छोटे शेतकरी. सतत पडणाऱ्या दुष्काळांमुळे आणि एकंदरच शेतीमधे सामान्य माणसाच्या होणाऱ्या अबदेमुळे हे लोक विडया वळून गुजराण करू लागले. हे सर्व अडलेले हरी शेट लोकांचे पाय धरायला सिन्नरला आले.

धंदा चांगला आहे. हजार विडयांना

लागणारी पाने शेटच्या दुकानावरून सकाळीच आणायची. ह्या पानात कुसकी, मोडकी पाने खूप निघतात. ती स्वतःच्या पदरचीच घालावी लागतात. हजारांचे माप पूर्ण करण्यासाठी दोनशे ते अडीचशे ग्राम पाने स्वतःच्या पदरचीच घालावी लागतात. कमवायला सुरुवात करण्याआधीच ७०।८० पैसे स्वतःच खर्च करावे लागतात. महाराष्ट्रात तुकाराम निर्माण करण्याचीच फार थोर परंपरा ह्या सिन्नरमधे विडीशेठ चालवतात; धन्यवादास पात्र आहेत !

तीन तास पाने कापून, गठ्ठे बांधून मग कारखान्यावर जायचे. तंबाखू मालकाची (नशीब !) पण विडी बांधायच्या धाग्यासाठी मात्र १ विडी बंडल कापून घेतले जाते. (आणखी २० पैसे धर्मादाय !) संध्याकाळी ७ ते ७॥ पर्यंत विड्या वळत बसायचे दोन वेळा ह्या विड्यांची तपासणी होते आणि 'निकृष्ट' विड्या बाजूला काढून घेतल्या जातात. (ह्या विड्यांचा हिशोब शेट लोकांच्या वहीत नसतो. ह्यांना छाट विड्या असे म्हणतात. ह्या छाट विड्या १५।२० पैसे बंडलाप्रमाणे मालक विकतच असतात. पैसा अलगद खिशात जातो !) दिवसाकाठी प्रत्येकाच्या ७।८ विड्या अशा बाजूला काढल्या जातात.

३॥ रुपये हजार असा मजुरीचा दर. प्रत्यक्षात सातशे ते आठशेच विड्या होतात. छाट विड्या, धाग्याचे पैसे, पानाचे पैसे वगैरे सर्व वजा जाता १२ तासांच्या मेहनतीनंतर १ रु. ९० पैसे मजुरी मिळते.

अशा ह्या दोन रुपयात हा विडीवळणारा आपला सर्व कुटुंब चालवतो.. कपडालत्ता, शिक्षण, करमणूक, अन्नपाणी वगैरे बाबी फक्त दोन रुपयात. 'साधेपणाने राहा, काटकसर करा' हे नेत्यांचे आदेश हे विडीवाले किती खटपट करून अमलात आणतात !

एका विडीवाल्याची मुलगी आजारी पडली, जन्माला येताक्षणीच. वर्षभर झिजत झिजत राहिली. रोगाचे निदानच होऊ शकले नाही. डॉक्टरकडे जावे तर ५ रुपये व्हिजीट फी व औषधाचे वेगळेच पैसे. तीन दिवसाची मजुरी आजारपणावर खर्च करणे म्हणजे केवढी उधळपट्टी ! ती मुलगी शेवटी मेली. सुटला बिचारा.

असाच एक आणखी कोणी. त्याच्या बायकोला मेनेनजायटीस (मेंदूचा रोग) झाला. पुढची चौकशी करण्याच्या भानगडीत पडलोच नाही.

ह्या सिन्नरात २५% पेक्षा जास्त लोक क्षयाने पछाडलेले आहेत. सतत तंबाखूशी झटापट असल्याने ४५% पेक्षा जास्त कामगार क्षयाचे रोगी होतात. औषधपाणी करण्याचा प्रश्नच नाही. त्यांचा 'नेचर क्यूअर' उपचार पद्धतीवर गाढा विश्वास आहे. सावकाशीने, मजेत मरतात. क्षयाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

मालक मजेत आहेत. ह्यांच्या पूर्वजांनी चक्क लोटा घेऊन शहरात प्रवेश केला, पहिल्या महायुद्धाच्या आसपास. आता प्रत्येक शेटच्या मोठमोठ्या बंगल्या आहेत. चंद्राच्या पृष्ठभागासारखे रस्ते असलेल्या सिन्नरमधे ह्या शेट लोकांच्या इंपाला, फ्लायमाऊथ

धडपडत असतात. साधेपणाचे नियम ह्यांना लागू नाहीत, पानांबाबतचा अन्याय दूर करा, मजुरी वाढवा, कारखान्यात सोयी करा, औषधपाण्याची व्यवस्था करा, अशा मागण्यांसाठी अनेक वेळा संप झाले. संप मोडून काढण्यात आले. असल्या गोष्टींकडे बघायला भिकूसा, वाजे, सारडा आदींना वेळच नसतो. ह्या बाबी फालतू आहेत.

वाजेशेठ ! एक मालक ! महाराष्ट्रात गरिबी हटवण्यासाठी हे वाजेशेठ आपल्या नातेवाईकांसह सत्ताधारी पक्षात होते. वसंतराव गटाने त्यांना ह्यावेळी तिकीट दिले नाही. गरिबांचा वाजेशेठना भयंकर कळवळा. त्यांना ही गोष्ट फार लागून राहिली आहे. आता सध्या ते राजकीय साथीदारांच्या शोधात आहेत. इतर शेठही आपापल्या परीने सत्ताधाऱ्यांची सरबराई करीतच असतात.

अनेक शैक्षणिक-सामाजिक संस्थांना ह्या विडी महर्षींनी मदत केली आहे. नाशकात त्यांची सुदूर कीर्ती पसरून राहिलेली आहे. पैसा कसाही मिळालेला असो, कामगारांचे काहीही झालेले असो, त्या पैशाचा वापर चांगल्या कार्यासाठी झाला म्हणजे झाले. नाशिकची वर्तमानपत्रे चाळली तर दानशूर, थोर, महर्षी वगैरे विशेषणे ह्यांच्यावर उधळल्याचे अनेक प्रसंग वारंवार वाचण्यात येतील. आहेच कर्तृत्व तसे !

लोक उगाचच त्यांच्या चारित्र्यहननाचा प्रयत्न करतात. आठवड्याला १२ रुपये पगार मिळणाऱ्या एका म्हाताऱ्या नोकराला काढून टाकले, त्याने जास्त पगार मागितला म्हणून ! आपली सर्व जिंदगी त्या माणसाने शेटच्या तैनातीत घालवली म्हणून तर ३ रुपयावरून १२ रुपयापर्यंत त्याला बढती मिळाली. आठवड्याला १२ रुपये म्हणजे काय चेष्टा आहे ! महिन्याला ५०–५५ झालेच की ! अर्धा देश उपाशी असताना, ५० रुपये देण्याचे उपकार करत असतानाही लोक त्या म्हाताऱ्याची बाजू घेऊन कुत्सितपणे बोलतात.

दान-धर्म, शैक्षणिक कार्ये, सामाजिक कार्ये, गरिबी हटवण्यासाठी राजकीय कार्ये अशा व्यापामुळे कामगारांकडे द्यायला त्यांच्याजवळ पैसा नाही, वेळ नाही हे कोणीही अमान्य करीत नाही.

कोणालाही पटण्यासारखीच ह्या बिचाऱ्या शेठ लोकांची बाजू आहे.

जाता जाता फक्त एकच वाईट गोष्ट समजली. तितकीशी वाईट नाही; पण उगाच खटकली.

एका विडीशेटच्या मुलाने गेल्या वर्षी उधारीवर मटका खेळून मटकावाल्याचे १३ हजार रुपये बुडवले! एका वर्षात १३ हजार रुपये !

तोकडी मजुरी, विडी धंद्यातून मटका, दारू धंद्यात वेगाने पदार्पण, क्षयरोग्यांची संख्या, इंपाला, हवेल्या, धिप्पाड विघ्नहर्ता, सर्व सिन्नरात व्यवस्थित, आहे. गुण्यागोविंदाने नांदताहेत ! महाराष्ट्रात अशी अनेक सिन्नरं आहेत. □

महाराष्ट्र सरकारने ह्या वर्षी काही गावांना आदर्श गाव, ग्रामपंचायत म्हणून बक्षिसे वाटली. दुसऱ्या क्रमांकाचे

बक्षिस मिळाले अकलूजला आणि तिसऱ्या क्रमांकाचे मुरूडला.

हीं आदर्श गावे कशी दिसली ? मला व सरकारला !

मुरूड ! उस्मानाबाद जिल्ह्यातले हे गाव.

गावात गटारे नाहीत. जशी सोय होईल तसे सांडपाणी वाहत असते. ज्या रस्त्यावरून पुढाऱ्यांचे जाणे येणे त्याच रस्त्यावर दोहोबाजूला गटार नामक चर खणून ठेवलेले आहेत. कचरा टाकण्यासाठीही काही व्यवस्था नाही. गावच एक उकिरडा.

ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे बांधण्यात आलेली नाहीत. समाज कल्याण खात्याने दलितांसाठी व गरिबांसाठी म्हणून जी घरे बांधली आहेत त्या घरात उच्चवर्णीय व सधन (तुलनात्मक दृष्ट्या) लोकच राहतात.

ह्या गावात हिंदूंना स्मशानभूमी नाही. जेथे जमेल तेथे प्रेते जाळली जातात.

गावाला उत्पन्न मिळते येथे भरणाऱ्या जनावरांच्या बाजारातून, पण ह्या बाजाराचीच नीट व्यवस्था नाही. शेड्स बांधलेल्या नाहीत. जनावरे बांधण्याची नीट व्यवस्था नाही. दूरहून आलेल्या जनावरांच्या मालकांची उतरण्याची सोय नाही.

ग्रामपंचायतीचे मुख्य उत्पन्न घरपट्टीचे असते. मुरूडला घरपट्टीची वसुली २५% सुद्धा नाही. थकबाकीदारात पुढारी, श्रीमंत, बागायतदारांचीच संख्या जास्त आहे. उलट गरिबीच्या परिस्थितीमुळे बैल विकायला आलेल्या माणसाच्या बैल विकून आलेल्या पैशातून त्याची घरपट्टी वसूल केली जाण्याचेही उदाहरण ह्या मुरुड गावात आहे.

गावातले रस्तेही अत्यंत खराब असेच आहेत.

नळ योजनेबाबतच्या पैशातही बरेच घोटाळे असल्याचे ऑडीटरने नमूद केले आहे.

गांधी जन्मशताब्दीच्या वर्षी सहभोजन, साफसफाई वगैरे कार्यक्रम झालेच नाहीत असे गावातले लोक सांगतात.

तसा ग्रामपंचायत वगैरे प्रकार कागदावरच आहे. सर्व कारभार नाडे घराण्याच्या शब्दाप्रमाणे चालतो. गावात खास वैशिष्ट्य काही नाही, उणिवा मात्र खूप निघू शकतात.

वसंतरावांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना दिसले त्याप्रमाणे हे तिसऱ्या क्रमांकाचे आदर्श गाव !

दुसऱ्या क्रमांकाचे गाव अकलूज. लक्ष भोजनवाले शंकरराव मोहिते पाटील, त्यांचेच गाव.

लोकसंख्या ३० हजारावर तरीही नगरपालिका नाही. ग्रामपंचायतच आहे. ग्रामपंचायत असल्यावर सरळ जिल्हा परिषदेत लुडबूड करता येते म्हणून इथे ग्रामपंचायतच राहिली आहे, राहणार आहे.

व्यापारी पेठ सोडता बाकी सर्व गावभर रस्ते उसवलेले आहेत, गटारांची व्यवस्था नाही.

नळ योजना येते आहे, येते आहे अशा जाहिराती कित्येक दिवस फडकत

आहेत. अजून तरी योजना प्रत्यक्षात आलेली नाही.

दारुभट्टीचा, मटक्याचे अड्डे हे प्रकार अकलुजात आहेतच. एका ठिकाणी भट्टीवर पहारा करताना पोलीसच दिसला.

गवगवा करून संडास बांधण्यात आले, गेल्या वर्षी. जवळ जवळ दीडशे! पण त्यांची अवस्था इतकी वाईट आहे, की त्यांचा वापर करणे दूरच, त्यांच्या आसपास ५० फूट फिरकणेही (नाक मुठीत न धरता) मुश्कील आहे. ह्याचा परिणाम असा की सर्व लोक दिवसभर, विधी उरकण्यासाठी जुन्या किल्ल्यातल्या शाळेच्या आवारात जातात. शाळा आहे मुलींची!

गाव नाक्यावरच्या ऑक्ट्रॉय चौकी-वरून ठराविक लोकांचा माल जकाती-विना सुटतो!

मटण मार्केट बांधले आहे, पण मारली जाणारी जनावरे ठेवण्यासाठी व्यवस्था नाही. मारण्याचीही व्यवस्था योग्य नाही. एकंदर प्रकार अगदीच किळसवाणा असा असतो.

इथून फॉर्म भरून पाठवला. कुठल्या-तरी निमित्ताने मंत्री आले, तपासणी झाली, बक्षिस मिळाले, असाच प्रकार झालेला दिसतो.

सर्व गाव शंकरराव पाटलांच्या शब्दाप्रमाणे चालते. शंकररावांच्या कर्तृत्वाचा दरारा येवढा, त्यांची प्रतिभा येवढी जबरदस्त, की ग्रामपंचायतीत त्यांच्या माणसांच्या विरोधात निवडून जावे असे कोणाला वाटतच नाही. इथे सर्व मामला बिनविरोध.

विकास व्हायचा असेल तर तो अशा एका प्रतिभावान माणसाच्या बुद्धी-प्रमाणेच व्हावा यात काय चुकले? म्हणूनच मागे एकदा एका माणसाने लोकशाही हक्क वगैरे तत्त्वासाठी निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केल्यावर, सर्व लोकांसमक्ष, पोलीस गेटासमोर त्या माणसाला खरपूस चोप द्यावा लागला. असला चावटपणा कदापी ह्या गावात सहन केला जात नाही. लोकशाहीच्या रक्षणासाठी हे सर्व नाईलाजाने करावेच लागते. त्यामुळेच गावात आदर्श लोक-शाहीसुद्धा आहे. शंकरराव मोहिते पाटलांबद्दल लोकांना इतका अतोनात आदर आहे, की गावात कोणी त्यांच्या विरूद्ध बोलतच नाहीत!

गावच्या ऊस बागायतदारांचाही खूप फायदा करून देण्यात आला आहे. खूप ऊस पिकतो. बांध आपोआप फुट-तात. प्रचंड प्रमाणावर पाणी फुकट जाते, जमिनीत मुरून वा बाष्पीभवनाने नष्ट होते. तशी नोंदच सरकार दरबारी आहे. लीकेजमुळे प्रचंड प्रमाणावर पाणी दर वर्षी नष्ट होत असल्याची नोंद पाणी खात्याच्या नोंदवह्यात पाहायला मिळते. तरीही मेहनत करून शेतकरी ऊस भरपूर पिकवतात.

असे हेही दुसऱ्या क्रमांकाचे आदर्श गाव. बिनविरोध, बिनबोभाट कारभार!

गावातून परत जात असताना 'माणूस'चा माणूस गावात चौकशा करत फिरतो आहे हे कळल्यावर माझ्या-पाठी माणसे का फिरली व गावातले काही लोक का अस्वस्थ झाले हे मात्र कळले नाही! आदर्श गावात हे घडण्याचे काहीच कारण नव्हते! ◻ ◻ ◻

# आसाममधील दंगलीच्या निमित्ताने

सौ. तारा पंडित

काही दिवसापूर्वी आसाममध्ये 'ऑल आसाम स्टुडंट्स् युनियन 'ने भाषा चळवळ सुरू केली. ती सध्या थंडावली असली तरी पूर्णपणे बंद झालेली नाही. आसाममधील सर्व व्यवहार-विद्यापीठातील उच्च शिक्षणापासून सरकारी कामकाजापर्यंत प्रत्येक क्षेत्रातील व्यवहार आसामी भाषेतूनच चालावेत ही मागणी...त्यासाठी उठलेली दंगलीची वावटळ...त्या दंगलीत बंगाली माणसाविषयी निर्माण झालेली द्वेषभावना... आणि त्याची परिणती शेवटी धाकदपटशा दाखवून व 'बंगाल्यांनो येथून चालते व्हा' असे म्हणून सर्व बंगाली लोकांना हाकलून देण्यापर्यंत पाळी... सारं कसं अकस्मात् घडून आलं!

ह्या दंगलीचं मूळ स्वरूप १९६० मध्येच खरं अस्तित्वात आलं होतं. त्यावेळी श्री. छलिया हे मुख्यमंत्री होते. त्यांना एकदा राजकारणाचा ताप चढला म्हणून मग काही काळ गुंडांनीच तेथील राज्यकारभार हाती घेतला. सिल्चरला झालेल्या रक्तपातानंतर एकदाचा Language Act अस्तित्वात आला. त्यावेळी नेमलेल्या चौकशी समितीचा रिपोर्ट आजपावेतो प्रकाशात आलाच नाही. पुढेही येईल ही आशाच नको. तेव्हापासूनच आसामी अन् बंगाली यांच्यात तेढ निर्माण झाली ती आजतागायत बारा वर्षं झाली तरी तशीच कायम आहे.

कै. लालबहाद्दूर शास्त्री गृहमंत्री असताना त्यांनी गोहाटी विद्यापीठात बंगालीचे एम्. ए. चे वर्ग सुरू केले तेव्हा आसामी लोकांच्या तळपायाची आग मस्तकात भिनली. १९६१ मध्ये बंगाली डिपार्टमेंट विरोधी वातावरणातच सुरू झालं. अजूनही अधिकारी वर्गाकडून सावत्र आईसारखी वागणूक मिळत असून देखील आज १४० विद्यार्थी खुषीने बंगालीचा अभ्यास करीत आहेत.

१९६० च्या दंगलीचे परिणाम म्हणजेच मेघालय आणि मिझोराम ह्या आसाममधून विलग झालेल्या प्रदेशांची निर्मिती. १९६० नंतरच ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात आसामी विद्यार्थ्यांची संघटना अधिक प्रबळ झाली. आणि विद्या-

पीठाच्या अधिकाऱ्यांचं देखील त्यांच्यापुढे काही चालेना. आता नव्याने झालेली दंगल देखील ह्या विद्यार्थ्यांच्या धाकदपटशाला बळी पडून अभ्यासक्रमाच्या माध्यमाबाबत Acadamic Council ने स्वीकारलेल्या निर्णयामुळेच !

आज आसामी विद्यार्थी आपल्या भाषेच्याच माध्यमाचा आग्रह धरीत आहेत पण त्यांना हे कळत नाही की आसाम हे राज्य एक भाषीय कदापिही होऊ शकणार नाही. याचे कारण तेथील लोकसंख्येची विविधता. ह्या क्षणी आसाममध्ये ४२ टक्के लोक बंगाली आहेत. उलट आसामींची संख्या फक्त ३८ टक्केच आहे. अन्यभाषीय २० टक्के आहेत. म्हणूनच आसामी लोकांचा भाषेविषयीचा हट्ट निरर्थक आहे. त्यामुळे आसामचे अधिक तुकडे पडण्यापलीकडे काहीही हाती लागणार नाही.

या परिस्थितीचा फायदा मात्र दोन वेगळ्याच शक्ती स्वार्थी हेतूने करून घेत आहेत. एकतर पाकिस्तानी एजंट आसाममधील फाळणीपासून फार शिरजोर झले आहेत आणि तेथील मुस्लीम जनता बांगला देशच्या निर्मितीमुळे अत्यंत नाखूष आहे. बांगला देशच्या स्वातंत्र्यदिन त्यांनी सुतकासारखा पाळला होता.

खरं म्हणजे ही दंगल उपस्थित व्हायचं काही एक कारण नव्हतं. आसाममध्ये स्थायिक झालेल्या बंगाली लोकांनी अनेक दिशांनी आसामच्या भरभराटीला हातभारच लावलेला आहे. शिक्षण, उद्योगधंदे व व्यापार ह्या क्षेत्रात विशेष कर्तृत्व दाखवले आहे. एवढंच नव्हे तर आसामच्या संस्कृतीशीही एकरूप होण्याचा प्रयत्न देखील त्यांनी केला आहे. तेथील रहिवाश्यांबरोबर ते मिळून मिसळून राहिलेले आहेत. पण आता आसामी लोकांच्या डोक्यात पुन्हा एकदा बंगाल्यांच्या द्वेषाचे भूत शिरले आहे. बंगाली लोक आपले शत्रू नसून मित्र आहेत हे ह्यांना कधी आकलन होणार ?

आणखी खोलात शिरून इतिहास पाहू गेलो तर काय आढळतं ? आसामचा इतिहास प्रथम लिहिला गेला तो बंगाली भाषेतून आणि बंगाली माणसाकडूनच हे निर्विवाद सत्य आहे. याशिवाय The Social History of Kamarupa हा तीन खंडात प्रकाशित झालेला ग्रंथ नागेन्द्रनाथ बसु ह्यांनी लिहिला आहे. अगदी अलीकडे श्री. आर. एम. नाथ ह्यांनी The background of Asamese Culture नावाचा आसामच्या सांस्कृतिक इतिहासविषयक ग्रंथ लिहून साहित्यात फार मोठी भर टाकली आहे. अनेक बंगाली कवींनी मूळ आसामी भाषेतच काव्यरचना केलेली आहे हेही विसरता येत नाही. बंगाली लोकांच्या काही प्रकाशन संस्थांनी पूर्णत: आसामी साहित्य प्रकाशित करणे हेच आपले ध्येय ठरविले आहे. याशिवाय आसामी-बंगाली असे अनेक आंतर प्रांतीय विवाह झाल्याने दोन्ही राज्यांच्या संस्कृतींचे मीलन घडून आलेले आहे.

ही सर्व पार्श्वभूमी बळकट असूनही आसामात बंगाली जनतेविषयी द्वेष-भावना बळावत जावी नि त्याची परिणती दंगल माजण्यात व्हावी ही खरोखर खेदाची गोष्ट होय. दोन्ही राज्यांतील विद्वानांनी आता ह्या प्रकरणी अवश्य लक्ष घालून समेट घडवून आणावा हेच उचित. ◻

## रिक्षा ओढणारा माणूस

रिक्षा चालवणं हा एक धंदा असा आहे की त्यासाठी भांडवलाची गरज नाही किंवा ट्रेनिंग घेण्याचीही आवश्य-कता भासत नाही. पण ह्या धंद्यासाठी मात्र फार मोठ्या प्रमाणात घाम गाळावा लागतो' अश्रूंची किंमत द्यावी लागते आणि त्यामानाने आर्थिक फायदा अगदीच कमी होतो, असे अलीकडेच झालेल्या संशोधनावरून आढळून आले आहे. एक रिक्षावाला दिवसाकाठी दहा तास रिक्षा ओढतो आणि दरदिवशी त्याला पाच रु. देखील उत्पन्न होत नाही. त्यातलेच अर्धे पैसे रिक्षा-मालकाला भाडं म्हणून द्यावे लागतात. असाच आणखी एखादा सर्व्हे केला तर घाम गाळणारांमध्ये रिक्षावाल्याची जीवनमर्यादा सर्वात छोटी आहे असे नक्कीच आढळून येईल. समाजवादाचा कितीही आव आणला तरी एक गोष्ट सत्य आहे की आशियातील अनेक देशात लोक रिक्षाचा वापर करतात ते केवळ स्वस्त वाहन म्हणूनच. तेही जर बंद केलं तर मात्र रिक्षा ओढणारांची शोचनीय दशा होणार हे ठरलेलंच आहे.

गंमत अशी की हा रिक्षावाला इतका चतुर असतो की कुठल्याही रस्त्याने तो तुम्हाला मोठ्या कुशलतेने घेऊन जातो. भयानक गर्दी असो तो मोठ्या शिता-फीने त्यातून मार्ग काढील. अगदी अरुंद गल्ल्याबोळातुन किंवा जिथे ट्राम किंवा बस जाऊ शकत नाही अशा रस्त्यांनी मजेदार वळणं घेत तो धावत असतो. कोणत्याही विभागात रिक्षासारखं सुर-क्षित वाहन नाही. म्हणूनच कित्येक लोक आपल्या मुलांना रिक्षानेच शाळेत पाठवतात व स्वत: निश्चित राहतात. ऊन असो, पाऊस असो, किंवा एरवी-देखील रिक्षावाचून माणसाचं अडतंच. पावसामुळे साचलेल्या गुढघाभर पाण्या-तून जाण्यासाठी रिक्षाखेरीज सारी वाहनं निरुपयोगी ठरतात. खड्डे पडलेल्या रस्त्यांवरून किंवा टोकदार गिट्टी बेदर-कारपणे पायाखाली तुडवीत रिक्षावाला चपळाईने धावत असतो आणि आत बसलेला माणूस गचक्यांपुढे बसल्या ठिकाणीच सहा इंच उडत असतो. येथील रस्ते एवढे खराब असतानाही हा रिक्षा-वाला बिनबोभाट सारे सहन करताना पाहून फार वाईट वाटतं. त्यापेक्षा हे वाहन बंदच केलं तर ? — नेमका हाच विचार एका गृहस्थांनी एका रिक्षा-वाल्याजवळ बोलून दाखवला पण त्याला तो अजिबात रुचला नाही. तो ह्या सद्गृहस्थांचा चेहरा निरखित

[पान २४ वर]

१५ ऑगस्टपासून सुरू झालेली 'माणूस' रंगतरग स्पर्धा दिवाळी अंकात संपली. स्पर्धेवर अनेक उलट–सुलट प्रतिक्रीया आल्या. ती सोपी होती, कठीण होती, किचकट होती, नकोच होती. इ.इ. याच प्रकारची एक स्पर्धा परदेशात घेतली गेली होती.
नमुन्यादाखल त्यातले एक कोडे.

# परग्रहावरून येणारे संदेश...

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

---

या चक्राची गति भयंकर...!

घटना किती झपाट्याने घडत असतात. चंद्रावर नील आर्मस्ट्रॉंग उतरण्याच्या घडीची काल आपण तहान-भूक विसरून वाट पाहिली. आज अपोलोंचे उड्डाण ही 'नेमेची येणारी' एक नित्यनैमित्तीक बाब बनली आहे. मंगळ आणि शुक्र यांच्या वेशीवर घिरट्या घालत रशिया आणि अमेरिका यांची अवकाशयाने आज हिंडताहेत.— जॅक अंडरसनच्या उद्याच्या एखाद्या वार्तापत्रात दहा वर्षांनी शुक्रावर उतरणाऱ्या अमेरिका, रशिया चीन यांच्या संयुक्त प्रवासी संघाची गुप्त माहितीही मिळेल आपल्याला कदाचित् !

तुमच्या माझ्यासारख्या साध्या माणसाला भोवळ यावी येवढ्या प्रचंड गतीने दर घडीला आपल्या भोवतालचे सारे जग नव्हे तर सारे विश्व आज बदलतंय. केवळ चार वर्षात जगात असलेले सारे शास्त्रीय ज्ञान आज दामदुपटीहून अधिक होतंय.

—मेलेला माणूस थंड पेटीत पुरून पाहिजे तेव्हा त्याला जीवंत करण्याच्या प्रयोगात आज शास्त्रज्ञ गुंतलेत !— माणसाचा बुद्ध्यांक, त्याची बुद्धीमत्ता, पाहिजे तेवढी कमी जास्त करू शकेल अशी गोळी आज शास्त्रज्ञ शोधताहेत !—तुमच्या शरीरावरील कातडीतील एक 'सेल' टेस्टट्यूब मधे घातला तर तंतोतंत तुमची प्रतीकृती असेल असा माणूस तयार होईल !—हे असले

अफलातून प्रयोग उंदीर आणि बेडूक यांच्यावर यशस्वी झालेत !

आणि तरीही शास्त्रज्ञ आज संतुष्ट नाहीत. आपल्या भोवतालच्या साऱ्या जगाचा चेहरामोहरा एका क्षणात बदलेल असे काही याहूनही विलक्षण शोध फार लवकर आणि अगदी अवचीत् लागतील असे अनेक शास्त्रज्ञांचे आतले आवाज आज सांगताहेत.

या बदलत्या जगाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी जो ठेवणार नाही तो पाल्यापाचोळ्याप्रमाणे दूरवर भिरकावला जाईल. इंग्रजांच्या आधुनिक ज्ञानापुढे आणि 'कवायती फौजेपुढे' पेशवाई पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे जमीनदोस्त झाली—उद्याच्या नव्या वैज्ञानीक जगाला सामोरे जाण्यासाठी 'कवायती मने' ज्यांच्याजवळ नसतील ते असेच कुठल्याकुठे अडगळीत फेकले जातील. या बदलत्या जगाला सामोरी जाणारी कवायती मने तयार करणे हे अमेरिकेतील वैज्ञानीक मासिकांच्या पुढील आज प्रमुख काम आहे. एखादा प्रमुख शास्त्रज्ञ तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसासाठी एखादे वैज्ञानीक कोडे आपल्यासमोर ठेवतो. हे कोडे म्हणजे तुमच्यामाझ्या वैज्ञानिक ज्ञानाला, कल्पनाशक्तीला, आणि त्याहीपेक्षा तर्कशुद्ध शास्त्रीय विचाराला एक आव्हान असते. ते शास्त्रीय कोडे आणि तुम्ही यांच्यामध्ये जणू फिशर–स्पास्की यांच्यासारखी एक अटीतटीची लढाई सुरू असते.

तुम्हा आम्हाला तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांनी योजलेलीही एक लुटुपुटीची लढाईच असते म्हणाना.—आता फ्रँक ड्रेक सारख्या प्रख्यात शास्त्रज्ञाने घातलेले एक लोकविलक्षण कोडे बघा.

साऱ्या विश्वाचा पसारा खूप खूप मोठा आहे हे आपण जाणतो. समुद्रकिनाऱ्यावर पसरलेल्या वाळुंच्या कणात एका कणाला जेवढे महत्त्व असते तेवढेच महत्त्व या विश्वाच्या संदर्भात आपल्या पृथ्वीला आहे. या विश्वात अनेक सूर्यमाला आहेत. त्यापैकी काही सूर्यमालात संपूर्णपणे पृथ्वीशी मिळती जुळती अशी पृथ्वी असेल. वजन, हवामान, तपमान, सर्व बाबतीत संपूर्णपणे आपली प्रतीकृती आणि केवळ संख्या शास्त्राच्या आधारे विचार केला तरी अशा सहस्रावधी पृथ्वी या विश्वात अस्तित्वात असतील. डॉ. केल्व्हीन मेल्व्हिन तर याच्यापुढे गेलेत. ते म्हणतात. 'यापैकी कोणत्यातरी पृथ्वीवर, सर्वस्वी आपणाला मिळता जुळता असा माणूसही अस्तित्वात असला पाहिजे आणि इतर अनेक ठिकाणी आपणाहून थोडा वेगळा पण अधिक बुद्धीमान असा प्राणीही अस्तित्वात असेल. आपणाहून लाखो प्रकाशवर्ष* अंतरावर असल्याने तो आपणाला भेटू शकणार नाही. पण तो आपणाला संदेश खात्रीने पाठवील. एखाद्या विद्युत लहरीवरून त्याने पाठव-


---

*प्रकाशाचा वेग सेकंदाला १ लाख ८६ हजार मैल. या वेगाने प्रवास करणारा प्रकाश किरण वर्षात जेवढे अंतर तोडतो ते अंतर म्हणजे प्रकाश वर्ष !

१ १ १ १ ० ० ० ० १ ० १ ० ० १ ० ० ० ० १ १
१ ० ० ० ० ० १ १ ० ० १ ० १ १ ० ० १ १ १ १
० ० १ ० ० ० ० ० १ ० ० ० ० १ ० ० ० ० १ ०
० ० ० ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० १ ० ० ० ० ०
० ० ० ० ० ० ० १ ० ० ० १ १ १ ० १ १ ० १ ०
० ० ० ० १ ० ० १ ० ० ० ० १ १ १ ० १ ० १ ०
० ० ० ० ० ० ० ० ० १ १ १ ० १ ० १ ० १ ० १
० ० ० ० ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० ० ० ० ० ०
० ० १ १ १ ० १ ० ० ० ० ० १ ० १ १ ० ० ० ०
१ ० ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० ० ० ० ० १ १ १
१ ० ० ० ० ० ० ० १ १ ० ० १ ० १ १ १ १ १ ०
० ० ० ० ० ० ० ० ० ० ० १ १ १ १ १ ० ० ० ०
१ ० ० ० ० ० १ १ ० ० ० ० ० १ १ ० ० ० ० १
० ० १ ० ० ० १ १ १ १ ० ० १ ० १ १ १ १

० ० १ ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० ० ० १ ० १ ० ०
० ० ० ० ० १ १ ० ० ० ० १ १ ० १ ० ० ० ० ० ०
० ० १ ० १ ० १ ० ० ० ० १ ० ० ० ० ० ० ० ० ०
० ० ० ० ० १ ० १ १ ० ० ० ० ० ० ० ० ० ० ० ०
१ १ ० १ ० १ ० ० ० ० ० ० ० ० ० ० ० ० ० ० ०
१ ० १ ० ० ० ० ० ० ० ० ० १ ० १ ० १ ० १ ० १
१ १ ० १ ० १ १ ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० ० ० ०
० ० ० ० ० १ ० ० ० १ ० ० १ १ १ १ १ १ ० ० ०
० १ १ १ ० ० ० ० ० ० ० १ ० ० ० ० ० ० ० ० ०
१ १ ० ० ० ० ० ० १ ० १ १ ० ० ० १ ० १ १ ० ०
१ ० १ १ १ १ १ ० ० ० १ ० ० १ १ १ १ १ ० ० १
० ० १ ० १ १ ० ० ० १ १ १ १ १ १ १ ० ० ० ० ०
० ० ० ० १ १ ० ० ० ० ० ० ० १ १ ० ० ० १ ० १

आकृती क्रमांक १



आकृती क्रमांक २

लेले संदेश आपल्या वितन्तु दुरेक्षावर [ रेडिओ टेलिस्कोपवर ] येऊन आदळू लागतील आणि असा आलेला एक संदेश वाचनाचे काम तुम्हाला करावयाचे आहे.--आणि या साऱ्या प्रास्ताविकानंतर फ्रँक ड्रेकच्या त्या कोडयाला सुरुवात होते.

परग्रहावरील एका बुद्धीमान शास्त्रज्ञाकडून पृथ्वीवर एक संदेश आला आहे. [ आकृती क्रमांक १ पहा ].

आता या संदेशावरून आपण काय समजावयाचे? फ्रँक ड्रेक म्हणतो या संदेशातील एक महत्त्वाचे सूत्र लक्षात घ्या. या संदेशातील सर्व शून्ये व एक यांची बेरीज केल्यास ती 'पाचशे एक्कावन' होते. आणि पाचशे एक्कावन या संख्येला फक्त एकोणीस व एकोणतीस या दोनचा संख्यांनी भाग जातो. म्हणजे हा संदेश 'द्विमिती संदेश' आहे. या सर्व संदेशाची आपण एकोणीस आडव्या व एकोणतीस उभ्या घरात पुर्नरचना केली पाहिजे. पण अशी पुर्नरचना करूनही

आपल्याला काही फारसे भरीव हातात येत नाही. फ्रँक ड्रेक म्हणतो आता हे सारे दूरदृष्टी (टेलिव्हीज़न) संदेशासारखे पहा. पुनर्रचना केलेल्या उभ्या-आडव्या आकडयांची छोटेखानी चौकटीत मांडणी करा. चौकटीत जेथे एक येतो तो भाग काळया रंगाने रंगवा. शून्याची चौकट तशीच कोरी राहू देत. हे पाहा आपल्या संदेशाचे नवे चित्र. (आकृती क्रमांक २ पाहा)

आपल्या संदेशाची सुसूत्र मांडणी तर झाली. पण आता तर तो एखाद्या अत्याधुनिक शब्दकोडयासारखा दिसतो आहे. तो वाचावयाचा कसा ? ते काम आता तसे सोपे आहे. दूसऱ्या ग्रहावरून येणारा पहिला संदेश कोणत्या गोष्टी ग्रंथीत करील याचा प्रथम विचार करा. –एखादे बंद निळे वा गुलाबी पाकीट पाहून त्यातला मजकूर काय असेल ते तुम्ही डोळे मिटून शंभर टक्के बरोबर सांगताच की नाही ! इथेही अगदी तसेच आहे. त्या माणसाकडून येणारा हा पहिला संदेश तो माणूस कसा दिसतो, कोठे राहतो, काय खातो, कोणत्या नावाने ओळखला जातो येवढी माहिती तरी नक्कीच देइल. म्हणजे असे.

१. या संदेशातील खालील मध्यावरील भाग पाहा. – हा तर आपल्या सारखा एखादा माणूस दिसतो. ज्या बुद्धिमान प्राण्याने आपणास हा संदेश पाठविला, त्याचे हे चित्र आहे. त्याचे डोके आपणापेक्षा अधिक निमुळते आहे. त्याच्या दोन पायातील अंतरही अधिक आहे.–स्वारीचे बूड बरेच जड दिसतेय् ! म्हणजे तो ज्या ग्रहावर राहतो तेथे गुरुत्वाकर्षणाचा प्रवेग आपणापेक्षा अधिक असणार.

२. संदेशात वरच्या बाजूला डाव्या हाताला एक चौकोन आहे. डाव्या बाजूलाच त्या चौकोनाच्या खाली वरपासून खालपर्यंत नऊ आकृत्या आहेत. हे त्या सूर्यमालेचे वर्णन आहे. वरील चौकोन म्हणजे सूर्य आणि नऊ आकृत्या म्हणजे त्याच्या कक्षेत फिरणारे ग्रह. चार छोटेखानी ग्रह. एक मध्यम आकाराचा ग्रह. त्यानंतर पुन्हा दोन मोठया आकाराचे ग्रह. त्यानंतर एक मध्यम आकाराचा व एक छोटा ग्रह अशी त्या सूर्य मालेची रचना आहे.

३. या संदेशात वरच्या बाजूला उजव्या बाजूस दोन आकृत्या आहेत. विज्ञानयुगात वावरणाऱ्या प्रत्येकाने त्या लगेच ओळखल्या पाहिजेत. प्राणवायू व प्रांगार (कार्बन) यांचे ते चित्र आहे. विद्युत अणू सिद्धांताप्रमाणे (इलेक्ट्रॉनीक थिअरी प्रमाणे) ते काढलेले आहे. अणु केंद्राभोवती सहा विद्युत्कण फिरत असले की प्रांगार तयार होतो. विद्युतकणांची संख्या आठ असली की प्राणवायू तयार होतो. या चित्रातही मधल्या दोन अणूकेंद्राभोवती अनुक्रमे सहा व आठ ठिबके दाखवलेले आहेत. याचा अर्थ त्या ग्रहावरचे जीवन आपल्यासारखेच प्रांगारापासून बनलेले आहे. आणि आपल्या प्रमाणेच ते जीवनही प्राणवायूवर अवलंबून आहे.

४. ग्रहक्रमांक एक दोन तीन चार

व पाच यांच्या उजव्या बाजूचा भाग वाचावयास तसा अवघड आहे. फ्रँक ड्रेक या भागाचे स्पष्टीकरण असे देतो. तो म्हणतो. ग्रह क्रमांक एक, दोन, तीन, चार, पाच यांच्या उजव्या बाजूस द्वैत क्रमांक पद्धतीने (बायनररी सिस्टीम) एक, दोन, तीन, चार, पाच हे आकडे लिहिलेले आहेत. ही द्वैत क्रमांक पद्धती समजावून घेतल्यावर प्राणवायू व प्रांगार यांच्या खालील बाजूचा व माणसाच्या डोक्यावरील भाग विचारात घ्या. चार शब्दांच्या कर्णाकृती बाणासारख्या रेषेने हा भाग त्या माणसाकडे दाखविला आहे. म्हणजे हा भाग कोणत्या ना कोणत्या स्वरूपात या माणसाशी जोडलेला आहे. हा भाग म्हणजे काही संख्या आहेत. द्वैतक्रमांक पद्धती समजावून घेतली असेल तर आपण त्या संख्या वाचू शकू. ग्रहक्रमांक चार समोरची संख्या बरीच मोठी असल्याने ती तीन आडव्या चौकटीत विभागलेली आहे. या संख्याचा संगणकाच्या सहाय्याने मिळणारा अर्थ असा. ग्रहक्रमांक चारवर सातशे कोटी लोक राहतात. ग्रहक्रमांक तीनवर फक्त तीन हजार तर ग्रह क्रमांक दोनवर फक्त अकरा लोक आहेत. म्हणजे ग्रह क्रमांक चार ही त्याची मूळ मातृभूमी दिसते. आपल्याहून सुधारलेला हा माणूस ग्रह क्रमांक तीन वर आपली वसाहत करू पहात आहे आणि ग्रह क्रमांक दोनवर आताच कुठे त्या ग्रहाचे संशोधन करण्यासाठी त्याने अकरा शास्त्रज्ञांचा जथा पाठविला आहे.

५. संदेशातील माणसाच्या उजव्या बाजूचा भाग बघा. मध्यंतरी द्वैत क्रमांक पद्धतीने एक संख्या लिहिलेली आहे आणि त्या संख्येच्या दोन्ही बाजूस सरूप आकृती आहेत. थोडे नीट पाहा. वरील आकृती माणसाच्या डोक्याच्या समपातळीत आहे. तर खालील आकृती त्याच्या पायाच्या समपातळीत आहे


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

थोडक्यात म्हणजे त्या बाणासारख्या आहेत आणि मधला क्रमांक त्या माणसाची उंची किती आहे हे सांगत आहे. तो एकतीस 'काही प्रमाण' उंच आहे. –आपल्या दोन्ही संस्कृतींना माहीत असलेले एकमेव प्रमाण म्हणजे हा संदेश घेऊन येणाऱ्या 'विद्युत लहरी' थोडक्यात म्हणजे तो एकतीस विद्युत लहरी उंच आहे.

६. आता त्या 'बुद्धिमान प्राण्या'च्या खाली मध्यभागी चार एक ओळीने ठेवलेले आहेत. हे बुद्धिमान प्राण्याच्या जातीचे नाव वा त्याची सही आहे म्हणाना. यापुढे तो नेहमी आपल्या संदेशाच्या शेवटी अशी खूण करून आपली ओळख देईल. अर्थात या गोष्टीचा पडताळा पाहण्यासाठी मात्र त्याचा पुढील संदेश येईपर्यंत आपणास वाट पाहावी लागेल.

–फ्रँक ड्रेक यांनी बरोबर दहा वर्षांपूर्वी म्हणजे १९६२ साली हे कोडे तयार केले होते आणि केवळ एक महिन्यात डझनावारी अमेरिकन वाचक तंतोतंत काच स्वरूपाचे उत्तर घेऊन पुढे आले. तयार 'कवायती मने' हा काय प्रकार असतो याचे हे एक उत्कृष्ठ उदाहरण होते. –अमेरिकेत ही असली कोडी सोडवावयाला बक्षिसे वगैरे काही नसतात आणि 'माणूस' मात्र अमेरिकन वाचकांनाही हेवा वाटावा अशी दहा हजारांची बक्षिसे आणि काही सोपी कोडी घेऊन दिवाळीपूर्वी आपल्या भेटीस येत होता. –याचा अर्थ माणूसची इस्टेट फार वाढली आहे असा नव्हे! याचा अर्थ आपणा सर्वांनीच नीटपण समजावून घेतला पाहिजे. 'माणूस'ची कोडी फ्रँक ड्रेकइतकी अवघड नसतील. कारण इतकी अवघड कोडी आम्ही स्वतःच तयार करू वा सोडवू शकणार नाही. आमची कोडी केवळ विज्ञानविषयकही नव्हती. पण आमची आणि फ्रँक ड्रेकची भूमिका मात्र एकच होती. आपल्या जवळचे सामान्य ज्ञान, विज्ञानातले सोपे पण मूलभूत महत्त्वाचे नियम या सर्वांचा डोळसपणे उपयोग करून आपल्या भोवतालच्या विक्षिप्त प्रश्नांची सुसूत्रपणे मांडणी करू शकणाऱ्या 'कवायती मनां'ची निर्मिती करण्याचा हा एक प्राथमिक स्वरूपाचा प्रयत्न होता. ◻ ◻ ◻

---

[ पान १७ वरून ]

म्हणाला–'आपण कुणी राजकीय अधिकारी तर नाही ना?...आणि उत्तराची वाट न पाहता स्वतःच पुढे म्हणाला– 'कृपा करून रिक्षा बंद करू नका हो! तुमच्यासारख्यांवरच तर आमचं पोट अवलंबून आहे' व लगेच दुसऱ्या एका रिक्षावाल्याशी हुज्जत घालणाऱ्या माणसाकडे बोट दाखवून पुढे म्हणाला– 'मला म्हणायचंय्. दुसऱ्यांच्या कष्टांवर जगणाऱ्या व स्वतःच्या चैनीखातर कष्ट करणारास छळणाऱ्या ह्या अशा लोकांवरच आमची जीवनं अवलंबून असतात. तेव्हा कृपया हा 'हातरिक्षा' वाहन बंद करण्याची भाषादेखील बोलू नका हो! हात जोडून विनंती करतो तुम्हाला!...' ◻ ◻

हिल १९२ च्या उच्च शिखराजवळ मंडळी पोचली, तेव्हा सकाळचे दहा वाजले होते. त्या दिवसाच्या कारवाईसाठी योग्य अशी जागा मिझर्व्हेला तिथे सापडली. ती एक झोपडी होती. लहानच. पण सर्व दृष्टीने योग्य अशी. एरिकसन व मॅन्युएलने झोपडी साफ करण्यास सुरुवात केली. माओ थोडावेळ त्या दोघांकडे पाहत राहिली आणि नंतर तीही त्यांना मदत करू लागली. एरिकसन लिहितो : ही जागा



कशासाठी साफ केली जात आहे हे तिला त्यावेळी कळते तर...

तरीही त्या टेकडीवरच्या झोपडीत घडलेली ती अमानुष घटना घडलीच असती.

एखाद्या कथा कादंबरीतच शोभावी अशी स्वेन एरिकसनच्या सैनिकी आयुष्यात घडलेली ही घटना.

इन्सिडंट ऑन हिल–१९२ हे या कथेचे नाव.

अनुवादक : दिनकर गांगल

सैनिक युद्धावरून परततात ते अनेक स्मृती मनात दाटल्या अवस्थेतच. या काळात त्यांना इतके नवे अनुभव येतात की त्यांचे उर्वरित मुलकी जीवन त्या अनुभवांनी, स्मृतींनी पछाडून गेलेले असते. व्हिएतनाममधील युद्धाबाबतही हीच गोष्ट सत्य आहे. मी आता कथा सांगणार आहे, ती आहे स्वेन एरिकसनच्या सैनिकी आयुष्यातील. मात्र हे त्याचे खरे नाव नव्हे. त्याचे खरे नाव सांगितल्याने कदाचित तो धोक्यात येईल. एप्रिल १९६८ मध्ये सैन्यातील सेवा पूर्ण करून मोठ्या सन्मानाने तो मुलकी जीवनात परतला आणि त्याला शक्य झाले तर आपल्या सैन्य-जीवनातील साऱ्या स्मृती पुसून टाकायच्या आहेत. पण त्याला ते अजून शक्य झालेले नाही. व्हिएतनाममधील आपल्या लष्करी जीवनाचा तो जेव्हा विचार करतो तेव्हा एकचएक प्रतिमा त्याच्या डोळ्यासमोर उभी राहते. ही प्रतिमा आहे त्याच्यापेक्षा दोनतीन वर्षांनी लहान अशा एका तरुण व्हिएतनामी मुलीची. त्याला ती १८ नोव्हेंबर, १९६६ रोजी सेंट्रल हायलँडस् भागात एका झोपडीमध्ये प्रथम भेटली.

एरिकसन आणि त्याचे चौघे साथीदार यांच्याकडे त्यावेळी या भागात टेहळणी करण्याचे काम होते. एरिकसनला आता तिचा निश्चित चेहरा आठवत नाही. मात्र तिच्या तोंडात एक सोन्याचा दात होता आणि तिचे गडद तपकिरी रंगाचे डोळे अतिशय बोलके होते, या गोष्टी त्याला निश्चितपणे स्मरतात. त्याचप्रमाणे निळ्या काचेची मळलेली कर्णभूषणे तिच्या कानात होती याचेही त्याला स्मरण आहे. कारण तो दुपारी तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी थांबला असता ती निळसर कर्णभूषणे सूर्यप्रकाशात चकाकत होती. व्हिएत-

नाममधील ग्रामीण स्त्रियांप्रमाणे तिनेही सैलसर, पुष्कळ घोळाचा झगा घातला होता. एरिकसन म्हणतो, त्यामुळेच तिची अंगकाठी कशी होती हे कळले नाही. पण ती सडसडीत उभी होती. तिची उंची असावी ५ फूट २ किंवा ३ इंच. ती जिवंत होती तोपर्यंत एरिकसनला तिचे नाव कळलेच नाही. नंतर या प्रकरणाच्या कोर्ट मार्शलमध्ये तिच्या बहिणीकडून त्याला ते कळले. या प्रकरणाची कोर्टमार्शल-चौकशी व्हावी म्हणून एरिकसननेच प्रयत्न केले होते व या चौकशीत सरकारतर्फे प्रमुख साक्षीदार तोच होता. त्या मुलीचे नाव होते फान थी माओ. एरिकसन तिच्याशी कधी बोलला देखील नाही. दोघांना एकमेकांची भाषा समजतच नव्हती. त्याची आणि माओची ओळख फक्त २४ तासांची होती आणि तोच तिच्या जीवनातला अखेरचा दिवस होता. त्याच्याबरोबर टेहळणीवर असलेल्या चौघा सैनिकांनी तिच्यावर बलात्कार केला, तिला ठार मारले व तिचे प्रेत रानात फेकून दिले. त्यापैकी एका सैनिकाने तिच्यावर सुरीचे तीन वार केले. प्रतिवादीच्या वकिलांनी कोर्टमार्शल-चौकशीत यावेळी झालेल्या आवाजाचे वर्णन करण्यास सांगितले तेव्हा एरिकसन म्हणाला, 'मी हरणावर गोळी घातली आहे आणि त्यावर सुरीही चालविली आहे. बस, हा आवाज तसाच होता.'

या टेहळणी पथकात सामील होण्याचा आदेश त्याला १६ नोव्हेंबर, १९६६ रोजी मिळाला. त्याच्या प्लटूनचा प्रमुख अधिकारी हॅरॉल्ड रिली याने त्याला हा आदेश दिला. सेंट्रल हायलँडसमधील व्हिएतकाँग गनिमांच्या कारवायांचा तलास लावणे हे काम या पथकाकडे होते. नंतर चौकशीच्या वेळी लेफ्टनंट रिली याने सांगितले की हे काम 'अतिशय धोक्याचे होते आणि माझ्या प्लटूनमधील चार तुकड्यांतील सर्वोत्तम असे सैनिक या कामगिरीसाठी मी निवडले.'

दुसऱ्या दिवशी दुपारी या नव्या पथकाचे पाचही सदस्य एकत्र जमले त्यावेळी लेफ्ट. रिली यांच्या प्लटूनचे मुख्य कार्यालय माय थो खेड्याजवळ होते. या पथकाचा नेता होता सार्जंट टोनी मिझर्व्हे. मध्यम उंचीच्या टोनीची अंगकाठी शिडशिडीत होती आणि त्याचे वय अवघे २० वर्षांचे होते. एरिकसन म्हणतो की मिझर्व्हेचे वागणे ठाशीव होते. त्याच्या अंगी विलक्षण आत्मविश्वास होता. पथकातील तो सर्वात लहान व त्याचबरोबर सर्वात अनुभवी सैनिक होता. लष्करात तो तीन वर्षे होता. पैकी एक वर्ष त्याने व्हिएतनाममध्ये घालविले होते व या वर्षभरातच त्याच्या कामगिरीबद्दल त्याचा अनेक वेळा सन्मान झाला होता. एक महिनाभरात तो अमेरिकेत परतणार होता.

या पथकातील टोनीनंतरचा अधिकारी कार्पोरल एल्फ क्लार्क. त्याची प्रकृती थोडी स्थूल होती. डोळे फिकट निळ्या रंगाचे होते. एरिकसन म्हणतो:

क्लार्क अतिशय गडबड्या स्वभावाचा होता. तो कोणतेही निर्णय झटापट घेऊन कामाला लागे. पथकातील एरिकसनबरोबरचे इतर दोघे सैनिक वयाने त्याच्यापेक्षा एकादवर्षाने लहानच होते. एरिकसनचे वय त्यावेळी २२ वर्षाचे होते. ते दोघे एकमेकांचे चुलत भाऊ होते. त्यांची नावे दियाझ राफेल (त्याला सर्वजण रेफ म्हणतात) आणि मॅन्युएल. रेफ उंच, दणदणीत प्रकृतीचा व गोल चेहऱ्याचा होता. तो सर्वसाधारणपणे कोणाशीही मिळते घेत असे. मॅन्युअल रेफपेक्षा उजळ पण अधिक जाडा होता. क्लार्कप्रमाणे तोही गडबड्या होता. मात्र या प्रकरणात मॅन्युएलने केव्हाच पुढाकार घेतला नाही. एरिकसनने सांगितले की अधिकाऱ्याचे म्हणणे निष्ठापूर्वक पाळणे हेच तो आपले कर्तव्य मानीत असे. रेफचा स्वभाव काही प्रमाणात याविरूद्ध होता. तो अधिकाऱ्यांना जरूर तेथे उलट सवाल विचारण्यास कमी करत नसे. पण सहसा, तो अधिकारी म्हणतील तसेच वागत असे. उगाच नंतर काही भानगड होऊ नये म्हणून.

त्यादिवशी दुपारी ही मंडळी जमली होती ती आपली कामगिरी समजावून घेण्यासाठी. या बैठकीबाबत एरिकसन म्हणतो की, एकदा बोलू लागला की मिझर्व्हेला कामाशिवाय दुसरे काही सुचत नसे. बटॅलियनच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना सार्जंट मिझर्व्हेने आपल्या पथकातील चौघांना समजावून सांगितल्या व प्रत्येकाची कामगिरी वाटून दिली. टेहळणीसाठी ज्या मार्गाने जायचे होते तो मार्गही त्याने सांगितला. त्यांचे अंतिम उद्दिष्ट हिल–१९२ पर्यंत पोचण्याचे होते. बाँग सॉन खोऱ्यातली ही एक उंच टेकडी. पण तेथून चौफेर सर्वत्र नजर टाकता येत असे आणि याच टेकडीच्या आश्रयाने छोट्या छोट्या गुहांतून व्हिएतकाँग लपून बसलेले आहेत असा अमेरिकनांचा संशय होता. या अनुषंगाने लपण्याच्या किंवा शस्त्रे लपविण्याच्या साऱ्या जागा या पथकाने तपासायच्या होत्या आणि त्या साऱ्याच काही त्यांना पुरविलेल्या नकाशांमध्ये दाखविलेल्या नव्हत्या. व्हिएतकाँग गनिम खुल्या जागेत समोरासमोर भेटले तर इलाजच नाही. पण नाही तर या पथकाने स्वतः होऊन गोळीबार सुरू करायचा नव्हता. फक्त स्वसंरक्षणार्थच त्यांना शस्त्रे चालविण्याची परवानगी होती. तसा स्पष्ट आदेश बटालियनच्या आधिकाऱ्याकडून मिळाला असल्याचे टोनीनेच या बैठकीत सांगितले.

या पथकाची ही कामगिरी पाच दिवसांची होती. साधारणपणे टेहळणी पथकाला इतकी मोठी कामगिरी दिली जात नाही. पण इतके बाहेर राहायला मिळणार म्हटल्यावर एरिकसनला मात्र आनंद झाला. तो म्हणतो. कारण प्रत्यक्ष रणक्षेत्रात बाह्य दडपणाखाली काय व कसा अनुभव येईल हे सांगता येत नसे. त्यात एक विमुक्त मजा असे. चर्चाविनोद मोकळेपणाने होत. वेळ अधिक गमतीत जाई. अशा कामगिरीवर

जाण्यापूर्वी काम काय करायचे हे आधी ठरविलेले असे. पण प्रत्यक्षात त्या गोष्टी तशाच घडत असे नाही. कोणत्याही वेळी काहीही अनेपक्षित घडू शकेल ही भावनाच मोठी रोमांचकरी असते. अर्थात साधारणपणे अशा अनपेक्षित घटना घडायला बराच काळ जावा लागतो. कामगिरी सुरू झाल्या झाल्या त्या सहसा घडत नाहीत. पण यावेळचे सारेच विचित्र होते. आमच्या टेहळणी पथकाची कामगिरी सुरू होण्यास अजून अर्धा दिवस बाकी होता आणि आकस्मिक काहीतरी विचित्रच घडू लागले होते.

सार्जंट टोनीने पथकाच्या कामगिरी-बाबत सूचना दिल्यानंतर जे वाक्य उच्चारले त्यावरूनच एरिकसनला या 'अनपेक्षित घटनां'चा वास लागला. तो म्हणाला की, 'या आपल्या कामगिरी-वर मोठी मजा येणार आहे. आपल्या-साठी मी एक छानशी छोकरी बघणार आहे. 'पथकाच नितीधैर्य चागलं राहावं म्हणूनच आपण तिला बरोबर घेणार आहोत. पाच दिवस तिचं शरीर आपल्या ताब्यात आणि नंतर तिने आपल्याला पळवून नेल्याचा व बलात्कार केल्याचा, आरोप करू नये म्हणून आपण तिचा निकाल लावून टाकू. या दोन्ही अप-राधांना युनिफॉर्म कोड ऑफ मिलिटरी जस्टीसप्रमाणे फाशीची शिक्षा आहे.'

रेफने नंतर कोर्टमार्शलच्या वेळी सांगितले, 'आपण ठरल्या वेळेपेक्षा एक तास आधीच कामगिरीवर निघू म्हणजे आपल्याला छानशी मुलगी बघून बरोबर घेता येईल. 'एकसष्ट-बासष्ट' करण्यासाठी किंवा संभोगा-साठी आपण तिला आपल्या बरोबर ठेवू व पाच दिवसानंतर ठार मारून टाकू असे सार्जंटने बैठकीत सांगितले होते.' मॅन्युएलने आपल्या साक्षीत म्हटले होते, 'मिझर्व्हेने आम्हाला कामा-संबंधी सूचना दिल्यावर तो म्हणाला की टेहळणीपथकाबरोबर आपण एक मुलगी घेऊ, किंवा गंमतीसाठी एक मुलगी आपल्याबरोबर घेण्याचा प्रयत्न करू...तो पुढे म्हणाला की, पथकाच्या नीतीधैर्यासाठी ती चांगली गोष्ट ठरेल.'

एरिकसन म्हणतो : टोनीने ही गोष्ट सांगितली तेव्हा त्याचा चेहरा पूर्णपणे निर्विकार होता. प्रत्येकाने आपल्याला हवा तो त्याच्या या बोलण्याचा अर्थ लावावा. क्लार्कने त्याच्या या सूचनेचे लगेच मनापासून स्वागत केले. रेफ आणि मॅन्युएल नुसते हसले. त्यांना एक तर ही सूचना कशीशीच वाटली असावी किंवा त्यांना तो मिझर्व्हेचा निव्वळ विनोद वाटला आसावा, कारण टोनीने 'नीतीधैर्य टिकविण्याची' बात केली होती ना! आमच्या प्लटूनमध्ये नीतीधैर्य टिकविण्याबाबत असे अनेक विनोद नेहमीच चालत. मी टोनीच्या सूचनेवर काहीच प्रतिक्रिया प्रकट केली नाही. पण त्या बैठकीनंतर आम्ही आप-आपल्या निवासाकडे गेल्यावर मी, माझा मित्र कॉर्पोरल कर्ली रोवानला गाठले. त्याने व्हिएतनाममध्ये मिझर्व्हेइतकाच काळ काढला होता. मी सांगितलेली कहाणी ऐकून रोवान दिङ्मूढच झाला. पण


टोनीचे हे बोलणे कामगिरीवर निघण्या- पूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगावे का असे जेव्हा मी रोवानला विचारले तेव्हा रोवानने लगेच नकारार्थी मान हलविली.

'मिझर्व्हे अशी मूर्खासारखी गोष्ट करणारच नाही' असे त्यावेळी मला वाटले, असे निवेदन पुढे कोर्टात त्याने दिले.

एरिकसन म्हणतो : 'मात्र मिझ- र्व्हेच्या या सूचनेने रोवान अस्वस्थ झाला होता नक्कीच. कारण दोन आठ- वड्यापूर्वीची मिझर्व्हेबाबतचीच एक घटना रोवानने मला सांगितली. त्याने एका व्हिएतनामी गृहस्थाला जखमी केले होते. नंतर कारण सांगताना तो म्हणाला, मला वाटले म्हणून तसे केले मी. रोवानच्या सांगण्यावरून असे वाटत होते की मिझर्व्हेचे मनोबल युद्धाच्या तापामुळे नाहीसे झाले आहे अशीच त्याची भावना झाली आहे.

दुसऱ्या दिवशी पहाटे ४-३० वाजता पाचही जण पुन्हा एकत्र जमले. मिझ- र्व्हेने सगळ्याजवळचे युद्धसाहित्य ठीक आहे ना हे एकदा तपासले आणि सगळे जण कँपबाहेर पडले. अजून फिकट अंधार होता. सर्वत्र दाट धुके पसरले होते आणि आपल्या नेत्याच्या मनात निश्चित काय आहे, याविषयी अजूनही सर्वांच्या मनात शंका होती. वीसएक मिनिटे चालल्यावर त्यांच्या ते ध्यानी आले. आतापर्यंत त्यांची दोन हजार मीटर चाल झाली होती आणि एरिक- सन व इतर मंडळींच्या, आपण पूर्वेच्या बाजूला जाऊन राहिलो आहोत हे ध्यानी आले. टेहळणी पथकाचा नकाशावर रेखांकित केलेला मार्ग पश्चिम दिशेला जात होता व सार्जंटने काल सूचना देताना तोच मार्ग सांगितला होता. पण हे सगळे विचार पूर्ण होईपर्यंत ते फू माय जिल्ह्यातील कॅट ट्वाँग या वस्ती- वर येऊन पोचले देखील. आता मात्र आपण रोवानचे उगाच ऐकले व सार्जं- टच्या बेताचा अधिकाऱ्यांना सुगावा लागू दिला नाही याचे एरिकसनला वाईट वाटले.

एकदा वस्तीत शिरल्यावर मिझर्व्हेने जरासुद्धा वेळ गमावला नाही क्लार्क त्याच्या साथीला होताच. त्यांनी प्रत्येक झोपडीची अगदी पद्धतशीर पाहणी सुरू केली. पहिल्या पाच-सहा झोपड्या- तून ते रिकाम्या हातानेच परत आले. पण एव्हाना परिस्थितीशी मिळते घेणारा रेफही त्यांच्या प्रयत्नात सामील झाला होता. तो समोर दिसणाऱ्या एका पंढ- रट रंगाच्या झोपडीकडे बोट दाखवून ओरडला; 'एय, ती बघ त्या झोपडीत छान मुलगी आहे. तिच्या तोंडात एक सोनेरी दात आहे.' लगेच सार्जंट म्हणाला, 'चला तीच मुलगी पाहू या आपण' एक क्षणच रेफला वाटलं असावं, कशाला आपण सांगितले यांना ! तशाच दीन मुद्रेने त्याने एरिकसन व मॅन्युएल यांच्याकडे पाहिले. पण सार्जंट व क्लार्क यांना थांबायला वेळ नव्हता. ते धावत धावतच त्या सोनेरी दात- वाल्या मुलीचा शोध घेण्यासाठी त्या समोरच्या झोपडीत घुसलेही होते. त्या- नंतर झोपडीत काय झाले हे एरिकसन



सांगू शकला नाही. कारण तो बाहेरच उभा होता.

परंतु माओंची बहीण फान थी लॉक त्यावेळी झोपडीतच होती. तिने चौकशीच्या वेळी झोपडीत घडलेल्या साऱ्या प्रकाराचे साद्यंत वर्णन केले. ती म्हणाली, 'ते आत घुसले व त्यांनी साऱ्या झोपडीभर बॅटरीचा झोत टाकला. तावडतोब मी, माझी आई, बहीण साऱ्याजणी जाग्या झालो. त्या वेळी सकाळचे सहा वाजले होते आणि तरीही सर्वत्र अंधारच होता. आमचे वडील बाजारला गेले होते. परके लोक अचानक झोपडीत घुसलेले पाहताच आई रडू लागली. आम्ही दोघी बहिणींनी एकमेकीला मिठी मारली व अगदी भिंतीलगत जाऊन भयभीतपणे उभ्या राहिलो. पण त्या दोघा सैनिकांनी माझ्याकडे वा आईकडे एकदा चेहरे निरखल्यावर लक्षच दिले नाही. मात्र माझ्या बहिणीला त्यांनी ताब्यात घेतले आणि तिचे हात त्यांनी पाठीमागे बांधले.' आपल्या बहिणीच्या जबड्यात उजव्या बाजूला खालच्या ओळीत

सोनेरी दात होता हे तिने कोर्टाला सांगितले.

एरिकसन सांगतो : मिझर्व्ह आणि क्लार्क हे दोघे झोपडीबाहेर आले तेव्हा त्यांच्याबरोबर पाठीमागच्या बाजूला हात बांधलेली माओ होती. क्लार्कने तिचा दंड पकडलेला होता आणि पथकाला पुढे चलण्याचा आदेश मिझर्व्हने देताच क्लार्कने तिला पुढे ढकलली व तिच्यासह तो चालू लागला. आता सूर्य झपाझप वर येऊ लागला होता आणि टेहळेणी करण्याचा आमच्या हेलिकॉप्टर्सच्या आम्ही नजरेस पडण्याची शक्यता होती. मुलगी शक्य तितकी दिवसा उजेडात दिसू नये अशी खबरदारी तो घेत होता.

एवढा सगळा प्रकार होऊन वस्तीतून हे पथक बाहेर पडेपर्यंत माओच्या झोपडीभोवती चिक्कार मुलं जमली होती. एवढ्यात लॉक बाहेर आली. एरिकसन सांगतो : 'दोघा वहिणींनी एकमेकींकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यात साकळलेले भय नजर गोठवून टाकणारे होते.'

आपला माल बरोबर घेतल्यावर सैनिक आता योग्य दिशेला–पश्चिम मार्गावर–जाऊ लागले. ते जेमतेम २० च मीटर गेले असतील, इतक्यात माओच्या झोपडीत एकच आक्रोश उठला आणि त्यांना थांबावे लागले. माओची आई मोठमोठ्यांदा रडत त्यांच्या पाठी येत होती. मिझर्व्हने कोर्ट मार्शलच्या वेळी सांगितले : 'आई बाहेर आली आणि रडू लागली आणि रडतारडता बोलू लागली. या व्हिएतनामी बायका असेच नेहमी करतात. आम्ही त्यांना परत फिरा–मागे येऊ नका, एवढेच सांगितले.'

एरिकसन सांगतो : आई तिच्या हातातला गळपट्टा हलवत होती व मोठ्या कष्टाने पुढे येतच राहिली. शेवटी धापा टाकत टाकत ती या पथकाजवळ आली आणि काही हाताच्या खुणा करू लागली. तिच्या सांगण्याचा मतलब एवढाच होता की तो गळपट्टा माओचा आहे आणि तो तिला माओलाच द्यायचा होता. तिला धाप लागलेली होती व तिची अवस्था अगदी केविलवाणी वाटत होती.

एरिकसन सांगतो : मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. पण क्लार्कने काही क्षणातच निर्माण झालेला तो ताण मुक्त केला तोही किती विचित्र तऱ्हेने. हसतहसतच त्याने माओच्या आईच्या हातून गळपट्टा काढून घेतला आणि तो माओच्या तोंडात कोंबला.

मॅन्युएलने नंतर लिहून दिलेल्या शपथपत्रात तो म्हणतो : 'त्या मुलीने उगाच किंचाळू नये म्हणून क्लार्कने हा बंदोबस्त केला. त्या भागात तसा अजून काळोखच होता आणि इतर लोकांनी आम्हाला मुळीच थांबवण्याचा प्रयत्न केला नाही.'

आईला मागे टाकून पथक पुढे निघाले. माओलाही त्यांनी जवळजवळ खेचतच आपल्याबरोबर घेतले. कारण त्यांच्या संचलनाचा वेग तिच्या पायांना येणेच शक्य नव्हते. वस्ती जेमतेम नजरेआड झाली होती तो मॅन्युएलने क्लार्क-

[पृष्ठ ५७ वर]

# आ ले पा क

■ एका अग्रलेखात म्हटले आहे: शिमग्याचा सण पूर्वी ज्या थाटाने सर्वत्र मोठ्या प्रमाणावर साजरा होत असे तसा आता तेवढ्या प्रमाणावर होत नाही.

याचे कारण शिमगा आता आपल्या दैनंदिन जीवनाचाच भाग झाला आहे.

■ पिसा येथील सुप्रसिद्ध झुकता मनोरा अधिक झुकत चालल्याचे वृत्त आहे.

झुकेन पण मोडणार नाही, असा त्याचा निर्धार असल्यास हरकत नाही.

त्याचा झुकाव डावीकडे आहे की उजवीकडे आहे याचा अंदाज राजकीय निरीक्षक घेत असतील.

■ महाराष्ट्र राज्य नाट्यमहोत्सवातील स्पर्धेत यंदा एकूण एकशेआठ नाटकांचे प्रयोग सादर करण्यात आले.

तरी टीकाकार म्हणतीलच की महाराष्ट्रात नाटके पुष्कळ आहेत; पण नाटककार कोठे आहेत?

■ गुजरात विद्यापीठाच्या उपकुलगुरुपदासाठी झालेल्या निवडणुकीत २५ उमेदवार उतरले होते.

एकच उपकुलगुरु नेमण्याची जुनाट प्रथा विद्यापीठांनी आता सोडून द्यावी; जास्तीत जास्त लोकांची वर्णी लावण्यासाठी एक भलेमोठे उपकुलगुरु-मंडळ नेमावे.

■ मुख्यमंत्री नाईक एका व्याख्यानात म्हणाले : महाराष्ट्रावर गेली काही वर्षे सतत संकटे येत आहेत!

पुन्हा पुन्हा सत्तेवर येणारी काँग्रेस पक्षीय सरकारे हीच ती संकटे नव्हेत काय?

■ एक बातमी: बार्शी लाइट रेल्वे नोकरांना एक तपानंतर न्याय मिळाला.

बार्शी लाइट रेल्वेच्या मानाने लौकरच मिळाला म्हणायचा!

■ एका परिसंवादात एक विदुषी म्हणाल्या: बायकोसाठी चहा करणारे उदारमतवादी पुरूष दहा लाखात थोडेच असतात.

नवऱ्याने केलेला चहा बायकोला धार्जिणा नसतो, असे पेयोपनिषदात म्हटलेले आहे!

■ श्रीमती तारकेश्वरी सिन्हा एका भाषणात म्हणाल्या: विरोधी पक्ष असतील तरच भारतात लोकशाही राहू शकेल!

आम्हाला तर असे वाटते की भारतात लोकशाही राहण्यासाठी सत्ताधारी पक्षाची काहीच गरज नाही; विरोधी पक्ष मात्र हवेतच.

■ नांदेडच्या एका चित्रपटगृहातील प्रेक्षकांना जाणवणाऱ्या गैरसोयी ताबडतोब दुरूस्त करण्याची मागणी विद्यार्थीवर्गातर्फे केली जाताच थिएटर मालकाने तिचा लागलीच स्वीकार केला.

या थिएटरमालकाची दूरदृष्टी कौतुकास्पद आहे; कारण विद्यार्थ्यांची मागणी त्याने मान्य केली नसती तर प्रा. नरहर कुरूंदकरांचे 'चित्रपटगृह व्यवस्था : तंत्र आणि मंत्र' या विषयावरचे व्याख्यान त्याला ऐकावे लागले असते.

■ भारतीय ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष व पथकप्रमुख भालिंदरसिंग यांनी सादर केलेल्या अहवालात अशी तक्रार केली आहे : नेमबाजीच्या स्पर्धेत, आपल्या नेमबाजांनी, पाईंट २२ ही बंदूक वापरली. म्युनिकमध्ये वापरलेल्या बंदुकीतील ही सर्वात जुनी बंदूक.

म्युनिकमध्ये सर्वात नवी बंदूक वापरली ती अरब गनिमांनी !

■ 'घरटे अमुचे छान' या नाटकावरील परीक्षणात एक परीक्षक म्हणतात की या नाटकाच्या जाहिराती नाटकावर अन्याय करणाऱ्या आहेत.

आधी जाहिराती तयार करून मग नाटक केले की असेच होते.

■ महाराष्ट्र सरकारने श्री विठ्ठलाची महापूजा पुन्हा सुरू केली नाही तर शिवसेना आंदोलन करील असा इशारा सेनापती श्री. बाळ ठाकरे यांनी दिला आहे.

करून करून भागले आणि देवपूजेमागे लागले !

■ एक बातमी :(दुष्काळ असला तरी) मुंबई विद्यापीठाच्या सर्व परीक्षा ठरलेल्या वेळीच होतील.

निकाल हवे तसे पुढे ढकलले की झाले.

■ वर्तमानपत्रातील एक बातमी : काल बृहन्मुंबईत तीन इसम लोकल अपघातात ठार झाले ते असे : (१) विक्रोळी, ३० वर्षे वयाचा अज्ञात हिंदू; (२) ग्रँटरोड, ३५ वर्षे वयाचा अज्ञात हिंदू; (३) एल्फिन्स्टन, ३२ वर्षे वयाचा अज्ञात हिंदू.

मृतांची उत्तरक्रिया कोणत्या पद्धतीने होणार याबद्दलची शंका कोणाच्या डोक्यात वळवळायला नको.

■ एक विनोदी नट म्हणतात की नाटकात काम करायला अक्कल लागते.

मात्र नक्कल (पाठ) नसली तरी चालते.

काही नाटके पाहायलादेखील अक्कल लागते म्हणे.

■ हेच विनोदी नट पुढे म्हणाले : रस्त्यात भेटलेला ओळखीचा माणूस हसला की बरे वाटते; त्यातच रस्त्यात भेटलेली मुलगी हसली तर ब्रह्मानंद होतो !

पण काही वेळा ब्रह्मांड आठवते त्याचे काय ?

■ नटवर्य नानासाहेब फाटक आपल्या एका सत्कार-समारंभात म्हणाले : आज अनेक नटसम्राट सर्वत्र दिसत आहेत.

आपल्याला तर बुवा आज एकच नटसम्राट दिसतो; नानासाहेबांना वार्धक्यामुळे अनेक दिसतही असतील.

■ एका अग्रलेखात म्हटले आहे की मंत्र्यांच्या खोलीत कोणी व किती वेळ बसावे याचा काही नियम नाही.

मंत्र्याच्या खोलीत खुद्द मंत्र्याने काही काळ बसावे, असा तरी नियम कोठे आहे ? ◻

## मितोक्ती : जपानी तंत्र

मितपणा हा जपान्यांचा राष्ट्रीय गूण असावा. छोटा देश; छोटी माणसे; व्यवहारात छोटेपणाकडे कल अधिक. बॉनसाय ऊर्फ वामनी वृक्षनिर्मितीची कला हे त्याचे लक्षणीय प्रतीक मानता येईल. जपान्यांचे बोलणेही मोजके असते, असे म्हणतात. मोजक्या बोलण्याच्या हव्यासामुळे आणि सवयीमुळे जपान्यांनी मितोक्तीची कला आपोआप आत्मसात केली असावी. केवढातरी गंभीर, दारुण, जळजळीत आशय साध्या, निरागस, सोज्वळ शब्दात सांगणे म्हणजे मितोक्ती करणे. इंग्रजीत याला 'अंडरस्टेटमेंट' म्हणतात.

आता हेच पाहा ना. नुकतीच नवे जपानी पंतप्रधान तनाका यांनी चाऊ एन-लायची भेट घेतली. या भेटीमुळे चीन-जपानचे कित्येक वर्षे दुरावलेले संबंध सांधण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या भेटीत सुरुवातीलाच तनाकांनी चाऊंची क्षमा मागितली. कशाबद्दल म्हणता ? भूतकाळात जपान्यांनी चीन-वर केलेल्या घसमर आक्रमणाबद्दल ? चीनची भूमी बळकावल्याबद्दल ? छे छे. तनाकांनी क्षमा मागितली ती चीन-जपान या दोन देशात भूतकाळात उद्भवलेल्या दुर्दैवी घटनापटाबद्दल !

दुसऱ्या महायुद्धात, हिरोशिमा आणि नागासाकीवर दोस्तांनी टाकलेल्या अणुबाँबची माहिती सगळ्यांना आहे. पण त्यापूर्वीही जपानची काही कमी दुर्दशा झाली नव्हती. कित्येक शहरे भुईसपाट झाली होती; जनरल मॅकॉर्थरने जपानी पायदळाची ससेहोलपट केली होती. जपानी शाही नौदल नामशेष झाले होते. अणुबाँब हा अखेरचा निर्णायक आघात. पण या एकूण परिस्थितीचे युद्धकालीन जपानी सरकारने केलेले अधिकृत वर्णन मितोक्तीचे उत्कृष्ट उदाहरण मानता येईल. त्या वर्णनात एवढेच म्हटले होते की युद्धपरिस्थितीत झालेला बदल जपानला फारसा फायदेशीर ठरू शकणारा नाही ! ◻

## दीर्घायुषी कसे व्हावे ?

प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या प्रकृ-

तीची काळजी असते, यात काही विशेष नाही. पण अलीकडे माझ्या लक्षात असे आले आहे की आपल्या प्रकृतीची काळजी इतरांनाही असते. आणि आपली प्रकृती ठणठणीत (निरोगी प्रकृतीला 'ठणठणीत' म्हणणाऱ्या भाषेला आपण मानतो.) राहावी यासाठी हे इतरेजन सारखा सल्ला देत असतात. हा सल्ला अर्थात प्रत्यक्ष वा परोक्ष अनुभवावर आधारलेला असतो. या सगळ्यात, दीर्घायुषी होण्यासाठी दिलेला सल्ला विशेष आग्रही असतो. कारण त्याचा प्रभाव तात्कालिकापलीकडे पोचणारा असतो. कित्येक वेळा तर हा सल्ला अमर होण्यासाठी दिलेला आहे किंवा काय, असेही मला वाटलेले आहे. कोणी मला सांगतो तुम्ही भरपूर मध खा. कोणी म्हणतो पाच वेळा दही खा. कोणी म्हणतो कित्येक लिटर पाणी प्या, कोणी म्हणतो दुपारी झोपा; (कोणी म्हणतो रात्री झोपा); कोणी म्हणतो अनवाणी चाला; कोणी म्हणतो दररोज समुद्रस्नान करा; कोणी म्हणतो दिवसातून काही काळ सूर्याकडे टक लावून पाहा; कोणी म्हणतो दोरीच्या उड्या मारा; दीर्घश्वसन करा; चिखलाची आंघोळ करा; कोणी सांगतो मधून मधून मोराचे मास खा; कोणी सांगतो वर्तमानपत्रे वाचू नका.--मी भरपूर भाबडा आहे; त्यामुळे सांगितल्याप्रमाणे करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करतो.

हे सगळे आठवले; कारण एका अमेरिकन म्हाताऱ्याने दीर्घायुष्याची एक नवी गुरूकिल्ली नुकतीच सांगितली आहे. तो म्हणतो, माणसाने रांगले पाहिजे. अगदी हाताचे तळवे आणि गुडघे टेकून, घोडा होऊन रीतसर रपेट केली पाहिजे. ती करताना नजर हाताच्या करंगळीवर असावी, अशी बारीक सूचनाही म्हातारबाबांनी दिली आहे. रांगता रांगता सारी रोगता मागे पडते, असा या ८३ वर्षांच्या शेलारमामांचा अनुभव आहे

मला वाटते रांगण्याचा आणि निरोगीपणाचा, दीर्घायुष्याचा संबंध महाराष्ट्राला आणि मराठी भाषेला मंजूर असावा : रांगडा–डी–डे या शब्दांच्या प्रकृतीकडे पाहिल्यास हे सहज लक्षात यायला हरकत नाही ! ◘

## अरबांचा नेता : नासेर

गल्या पंधरावीस वर्षात, मध्यपूर्वेतील राजकारणाला जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. हे स्थान प्राप्त करून देण्यात अरबांचे दिवंगत नेते गमाल अब्दुल नासेर यांचा वाटा मोठा आहे. नासेरची कारकीर्द जयापजयाच्या नाट्याने भरलेली आहे. त्याने ब्रिटिशांना हाकलले; पण इस्त्रायली आणि रशियनांचा प्रवेश तो थांबवू शकला नाही. जगप्रसिद्ध आस्वान धरण त्याने बांधले; पण सुवेझ कालवा गमावला; १९६७ सालच्या पराभवानंतर, हुकूमशहा असूनही, त्याने राजिनामा दिला; आणि जनतेने आपला

विश्वास प्रचंड प्रमाणावर व्यक्त करून त्याला राजिनामा मागे घ्यायला लावला. नासेर ना होता तर इजिप्तला जगाच्या नकाशात इतके ठळक स्थान प्राप्त झाले नसते.

नासेरचे एक साक्षेपी चरित्र नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. चरित्रकार अँथनी नटिंगची नासेर आणि त्याच्या परिवाराशी दीर्घकाळ मैत्री होती. त्यामुळे नासेरच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे या चरित्रातील चित्रण मोठे वेधक झाले आहे. त्यातील एका पत्राचा काही भाग 'माणूस 'च्या वाचकांसाठी मुद्दाम सादर करत आहे. हे पत्र लिहिले तेव्हा नासेर अवघा १७ वर्षांचा होता. पण तेव्हाही आपल्या देशाच्या स्थितीने तो व्यथितचित्त झाला होता. तो आपल्या मित्राला लिहितो : 'इजिप्तमध्ये सगळीकडे नैराश्य आणि वैफल्य दिसते. ही भावना कोण दूर करणार ? इजिप्तमध्येही, कुत्र्याच्या मौतीने मरायला तयार नसलेले स्वाभिमानी सज्जन आहेत. सारे राष्ट्र कसे झोपी गेले आहे. आपण कोण आहोत याची जाणीव नसलेल्या या दुबळ्या जीवांना कोण जागे करू शकेल ?'

हे काम पुढे नासेरलाच करावे लागले; आणि हे काम करता करताच, अवघ्या बावन्नाव्या वर्षी, नासेर मृत्यू पावला.

—अनंतराव



## नोबेल पारितोषिक विजेता

# रोएँटजेन


डॉ. शरद अभ्यंकर


क्ष किरण (म्हणजे अज्ञात किरण) हे आज सर्वसामान्य लोकांनाही इतके ज्ञात झाले आहेत की पाऊणशे वर्षांपूर्वी या शोधाची माहिती प्रसिद्ध झाल्यावर जगात केवढी खळबळ उडाली असेल त्याची कल्पना करणेही अवघड आहे. १८९३ साली जर्मनीमधील बुर्झबुर्ग विद्यापिठात या विषयाचे पहिले जाहीर प्रात्यक्षिक डॉ. विल्हेम कोन्‌राड रोएँटजेन यांनी दाखवले. विद्यापिठातील शरीर रचना शास्त्रविभागाचे प्रमुख रुडॉल्फ कोलिकेर यांच्या हाताची क्ष-किरण प्रतिमा त्यावेळी काढण्यात आली व लगेच ती संस्कारित करून सभाजनांना दाखविण्यात आली. माणसाच्या शरीराला कोणत्याही प्रकारे इजा न करता आतील हाडांची सुस्पष्ट प्रतिमा उमटू शकते यावर कोणाचा विश्वासही बसला नसता, पण तसे प्रत्यक्ष घडलेले समोर दिसत होते. अल्पावधीतच रोएँटजेनचे नाव सर्व जगभर ज्याचेत्याचे तोंडी झाले.

क्ष-किरण शास्त्राचा वैद्यक शास्त्राशी इतका निकटचा संबंध आहे की डॉ. रोएँटजेन हे वैद्यकशास्त्राचे डॉक्टर नसून पदार्थ विज्ञानशास्त्राचे होते हे बहुतेकांना माहित नसेल. या किरणांचा शोध लागला त्यावेळी शरीरातून आरपार जाऊ शकणारे किरण शोधून काढण्याकरिता रोएँटजेन यांचे प्रयोग चाललेही नव्हते. योगायोगाने किंवा अपघातानेच हा शोध लागला असे म्हणावे लागेल.

निर्वात पोकळीतून जाणाऱ्या विद्युत्-प्रवाहाचा डॉ. रोएँटजेन अभ्यास करीत होते. खोलीत पूर्ण अंधार करून व निर्वात नळी काळ्या कागदाने आच्छादित करून त्यातून त्यांनी वीजप्रवाह सोडला. अचानक खोलीतील एक काच चमकू लागलेली त्यांना दिसली. या काचेवर बेरिअम प्लॅटिनोसायनाईडचा थर दिलेला होता. या चमकणाऱ्या







काचेचे निरीक्षण करत आपल्या हाताची पडछाया काचेवर उमटलेली रोएँटजेन यांना दिसली. त्यांनी या विषयाचा सूक्ष्म अभ्यास करून त्याचे अनेक प्रयोग केले. तरीही हे किरण निश्चित कोणत्या स्वरूपाचे आहेत हे न कळल्यामुळे त्यांनी या किरणांना 'क्ष' किरण हे नाव दिले. आता या किरणांची संपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे आणि त्याच्या संशोधकाचे स्मरणार्थ त्यांना 'रोएँटजेन किरण' हे नाव देण्यात आले आहे. (तरीही 'क्ष' किरण हे मूळचे अज्ञान-दर्शक नाव अद्याप चिकटूनच आहे.) रेडिओ लहरी, प्रकाश लहरी, उष्णतेच्या लहरी याप्रमाणेच रोएँटजेन किरण या विद्युत् चुंबकीय लहरी असतात, पण त्यांच्या लहरींची लांबी अतिशय लहान असते.

रोएँटजेन यांच्या शोधाचा सर्वत्र गाजावाजा होताच अनेक लोकांनी आपणही पूर्वी अशा शोधांचा असा परिणाम पाहिला असल्याचे जाहीर केले; आणि ते खरेही होते. निर्वात नळीतून वीजप्रवाह सोडल्यास त्याचे शेजारी असणाऱ्या छायाचित्रग्राहिका (photographic plates) आपोआप अनाच्छादित (expose) होतात हे बऱ्याच जणांनी अनुभवले होते. पण रोएँटजेन-प्रमाणे या विषयाचे आणखी प्रयोग करून त्याची कारणमीमांसा शोधण्याचा कोणीही प्रयत्न केला नव्हता. रोएँटजेन स्वतः अतिशय चिकित्सक संशोधक होते. नुसतेच कल्पित सिद्धांत मांडण्याला त्यांचा सक्त विरोध असे.

क्ष-किरणांच्या शोधाने वैद्यक क्षेत्रात अतिशय प्रचंड क्रांती घडवून आणली आहे. नुसत्या फुप्फुसांच्या क्षयरोगाचे क्ष-किरणद्वारा लवकर निदान करता आल्यामुळे कोटयावधी लोक बचावले आहेत. हाडांमध्ये असणाऱ्या कॅलशिअम मुळे क्ष किरण त्यातून पलिकडे जाऊ शकत नाहीत व त्यांची प्रतिमा उमटू शकते. परन्तु शरीरातील इतर अवयवांची प्रतिमाही त्यामध्ये क्ष किरण जाऊ न देणारे निरुपद्रवी पदार्थ सोडून उमटविता येते. हे तंत्र वापरून मेंदूतील पोकळचा, मज्जारज्जू भोवतालची पोकळी, श्वासनलिका, अन्नमार्ग, पित्ताशय, मूत्रपिंड, गर्भाशय, स्वादुपिंड, रक्तवाहिन्या इ. कोठल्याही अवयाची प्रतिमा

उमटवून त्यातील अप्राकृत गोष्टी वा विकार अभ्यासता येतात.

क्ष-किरणांचा शरीरावर सतत आणि जास्त प्रमाणात वर्षाव झाल्यास त्याचे दुष्परिणामही आढळतात. त्यामुळे त्वचेवर भाजल्यासारखा परिणाम होतो. वेगाने वाढ होणाऱ्या पेशींवर (उदा. रक्तपेशी, गर्भ, जननपेशी यावर) क्ष-किरणांचा दुष्परिणाम लवकर होऊ शकतो. क्ष-किरणांच्या या गुणधर्माचा उपयोग कर्करोगाच्या उपचाराकरता करून घेतला जातो. कर्करोगाच्या पेशी अनिर्बंधपणे झपाट्याने वाढत असतात. सखोल क्ष-किरणांच्या (Deep X-Rays) माऱ्याने त्यांची वाढ खुंटते.

नेहमीच्या क्ष-किरणांचा दुष्परिणाम होऊ नये म्हणून क्ष-किरण चिकित्सक शिशाचा थर असणारे संरक्षक आवरण (Lead Lined Apron) व हातमोजे वापरतात. या किरणांशी नेहमी संबंध येणाऱ्या लोकांना क्ष-किरण शोषून घेणारा एक बिल्ला लावण्यास दिला जातो. ठराविक काळाने याची तपासणी केल्यावर क्ष-किरण मात्रेची धोक्याची पातळी ओलांडली जात असल्यास लगेच कळते. हे संरक्षक उपाय अंमलात येण्यापूर्वी अनेक क्ष-किरण चिकित्सकांना निष्कारण यातना भोगाव्या लागल्या.

मात्र हा महत्वाचा शोध लावणारा महान संशोधक मॅट्रिकसुद्धा नव्हता. या ना त्या कारणाने रोएँटजेन शालांत अनुत्तीर्ण होत राहिले. त्यामुळे त्यांना जर्मनीतील पुढील शिक्षणास प्रवेश मिळेना. अखेर स्वित्झर्लंडमधील झूरीचच्या तांत्रिकी महाविद्यालयात त्यांना प्रवेश मिळाला. या महाविद्यालयात कागदी प्रमाणपत्रापेक्षा विद्यार्थ्यांचा कल आणि अंगातील गुण यांना जास्त महत्व दिले जात असे, हे आपले नशीबच म्हणायचे. येथे यंत्रज्ञानाचा (Mechanical Engineering) अभ्यास करून त्या विषयातली डॉक्टरेट रोएँटजेननी मिळवली. वुर्झबुर्ग विद्यापीठातील प्रोफेसर कुंड्ट यांचा मदतनीस म्हणून रोएँटजेननी उत्तम काम केले, परंतु शालांत परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे त्यांना अध्यापनाचे काम देण्यात आले नाही. त्यामुळे नवीन निघालेल्या स्ट्रासबुर्ग विद्यापीठात त्यांना जावे लागले.

क्ष-किरणांच्या शोधाचे पेटंट घेऊन रोएंटजेन यांना अल्पावधीतच कोट्याधिश होता आले असते, प ंतु त्यांच्या पूर्वीच्या जर्मन संशोधकांची परंपरा पुढे चालू ठेवून त्यांनी कोठल्याही तऱ्हेचे अधिकार, मानधन वा टक्केवारी न स्विकारता आपला शोध सर्वांना खुला ठेवला. एवढेच काय, या शोधाबद्दल मिळालेली नोबेल पारितोषिकाची रक्कम त्यांनी गरीब होतकरू विद्यार्थ्यांकरिता देऊन टाकली. या शोधाबद्दल बहाल करण्यात आलेला किताबही त्यांनी कृतज्ञतापूर्वक नाकारला.

ज्ञानाने, कर्तृत्वाने आणि मनाने मोठा असणारा हा शास्त्रज्ञ १० फेब्रुवारी, १९२३ रोजी स्वर्गवासी झाला.

◻

# मला न समजलेला वैश्वदेव

सौ. उज्वला पिंपळखरे

खडकीच्या इंजिन हाऊस रोडवरच्या एका बैठ्या घरात आम्ही आमच्या बदलीचे, विचवाला शोभणारे बिऱ्हाड मांडीत होतो. घर तसे टुमदार होते, पण काही दिवस बंद असल्यामुळे एक प्रकारचा कुंदपणा तिथे दाटला होता. हे स्वत: आवश्यक त्या पेट्या, ट्रंका उघडून त्यातले सामान बाहेर काढीत होते. त्या पसाऱ्यात माझा मुलगा 'आज खेळायला मज्जा आहे' असे म्हणत हातोडा, खिळे, चाकू यांच्याशी खेळत होता. मी मात्र घरभर हिंडून जागेची पाहणी करीत होते. एका कोपऱ्यात येशू ख्रिस्ताचा फोटो आणि त्यापुढं एक-दोन वितळलेल्या मेणबत्त्यांचे मेण दिसले. भिंतीतल्या कपाटाच्या एका खणात सॅन्टा क्लसचा जाळीदार बूट, कॅप्टन जोन्स या नावाचे दोन तीन जुने लिफाफे मला दिसले. आमच्या पूर्वी इथं कोणी कॅप्टन जोन्स नावाचा ऑफिसर त्याच्या कुटुंबासह राहत असावा असा तर्क करीत मी ह्यांच्या नावाची लाकडी पाटी पुढल्या जाळीच्या व्हरांड्यावर बाहेरच्या बाजूनं ठोकून लावली, या हेतूने की पोस्टमनने आमची पत्रे आम्हालाच द्यावीत. घर आता 'एम. एस. पिंपळखरे' या पाटीच्या नावानं सजले...जेवणाच्या खोलीत एक छोटंसं शेल्फ ठोकले. त्यावर अन्नपूर्णा, बाळ-कृष्ण, या देवांच्या मूर्तींची मी स्थापना केली. पूजा केली तेव्हा शांत वाटले. इतक्यात–

"रामराम सायब–" हे शब्द कानावर आले. व्हरांड्याच्या पायरीवर एकजण उभा होता.

"काय हवय्?" खोक्याचे खिळे काढीत असताना ह्यांनी थबकूनच त्याला विचारले.

"सायब, मी रद्दी, बाटल्या घेनारा! काई असलं तर पघा! दारावरनं जात व्हतो म्हनून इच्यारलं–"

"अरे, आत्ताच तर बदली होऊन आम्ही आलोय्! आत्ताच आमच्याकडं रद्दी, रिकाम्या बाटल्या कसं असणार?" मी त्याला म्हणाले.

"बरं बाई, म्या हतला जुना मानूस

हाये ! हतं म्या चालीस वर्सं ह्यो धंदा करतुया."

"अरे वा, इथली बरीच माहिती असेल तुला ?" माझ्या उत्तेजनपर बोलण्याने तो रंगात आला.

"हतल्या जोन्सायबाकडनं टोपलं टोपलं वाटल्या, रद्दी घ्येत व्हतो. आता पन मलाच घेत जावा." तो निघून गेला. मीही पाकसिद्धतेकडे वळले. लौकर स्वयंपाक करून जेवणे उरकली.

ट्रींग...ट्रींग थोडचा वेळाने दारावरची घंटा वाजली म्हणून मी दार उघडले.

"सलाम मेमसाब ! तुमी हितं नवी मानसं आलात म्हनून इच्यारायला आलो. माझं नाव तानू माळी ! तुमाला बागबगीचा करायला, मोटारगाडीला फडका मारायला मानूस हवा असल म्हनून इच्यारायला–"

"तू इथलाच का ? कुठं कुठं काम केलंस ?" मी चाचणीदाखल विचारलं.

"ह्यो बोट कल्पाचा (boat Club) माळी व्हतो मी ! आता माजंबी म्हातारपन आलंय्, अफसर लोकबी कल्पात जात नाई बोटींगला, तवा त्ये काम न्हाई. हतं जोनसायबाकडच व्हतो की आत्तापावर ! मेमसायबाला बागेची लई हौस ! ग्येली तीन साल ह्या बागेला नंबरी बक्षीस मिलायचं ! ह्यो गुलमोरीचो रांक हाये ना त्ये पन सर्वा म्याच केलुया ! परदर्शनात मेमसायबाच्या गुलाबाला बक्षीस असायचं– माजच कटींग व्हतं ना ते !"

"हे बघ–ही जागा आहे ना ती झाडून स्वच्छ ठेवायची रोज ! हे गवत बघ किती वाढलंय् कोपऱ्याकोपऱ्याला ! ते सर्व काढून साफ करायचं ! चार ठिकाणी फक्त चार ताटवे तयार करून त्याला मात्र रोज पाणी घालायचं ! शिवाय ह्यांची मोटार धुवायची ! या कामाचं काय घेशील ?"

"पन्नास पडतील ह्या कामाला ! माझा कामच तसा ! आपुन आनेस्टी जाणतुया." तानू माळी बोलत असतानाच गवताच्या बेटात कसलीतरी सळसळ झाली, एक छोटंसं जनावर सरपटत गेलं. तिकडे पाहत तो गप्प झाला. नंतर भानावर येत म्हणाला, "मेमसाब, ह्यो साप लई देवमानूस हाये ! काईबी करणार न्हाई, पर त्येच्या वाटंला जायचं न्हाई."

"अरे, पण मुलं अंगणात खेळायची, त्यांना सापापासून धोकाच की–" मी म्हणाले.

"मेमसाब, अवं हतल्या जोनसायबानं सापाला आनी सापाच्या मादीला मारलं, पन परिनाम काय पुछा की–सायब–मेमसाब दोघांचं मरन लागोलाग–! बरं पन माझ्या पगाराचं काय ?" तो म्हणाला.

"उद्या सांगते," मी त्याची बोळवण केली आणि दार लावून घरात आले. घरात बरेचसे सामान जागच्याजागी लावून झाले होते ! दारांवर पडदे चढले होते, स्वयंपाकघरातल्या फळ्यांवर प्लास्टीकच्या एका आकाराच्या बरण्या ओळीत अगदी शिस्तीने उभ्या होत्या; ओट्यावर स्टीलच्या पिपात मी पाणी देखील भरले होते. खिचडी, कांदेबटाट्याच्या रसभाजीचा स्वयंपाक झाला आणि तृप्त मनाने ते सारे जेवून हे पलंगावर विश्रांती घेत होते. मला

मात्र माळ्याच्या बोलण्याने झोप येईना ...छान, मोठी जागा राहायला मिळा-ल्याचं समाधान कुठल्या कुठे नाहीसे झाले. माझी नजर दर खोलीत भिर-भिरू लागली. दर खोली, दर कोपरा यात काहीतरी गूढ लपले असल्याचा मला आता भास होत होता. खरे म्हणजे खोल्या, दारे, खिडक्या, भिंती हे सारे नेहमीसारखेच होते, भिंतींना मंद क्रीम-रंग होता, दारेखिडक्यांना तेलाचा पांढरा रंग होता, पण मला मात्र यात गूढ भयानकता दाटल्यासारखी वाटत होती; अशा या घरात आता कसे दिवस काढायचे ? कॅप्टन जोन्स आणि त्याची पत्नी यांचे आत्मे इथं आसपास असतील का ? त्यांच्या काही अतृप्त इच्छा इथे आसपास वावरत असतील का ?...मला या विचारांनी स्वस्थ राहवेना. "अहो, अहो, ही जागा नको बाई." मी ह्यांना जागे झाल्यावर सांगितले.

"का, काय झालंय् ? माहेरी तुला लहान खुराड्यात राहयची सवय, ह्या सहा खोल्या त्या मानानं मोठ्या वाट-तात का ?" ह्यांनी आळस देत मलाच विचारले ?

"तसं नाही, आत्ताच एक माळी आला होता. त्यानं सांगितलं की या जागेत कॅप्टन जोन्स होता. त्यानं बाय-कोला मारलं आणि स्वतःलाही मारून घेतलं. ही जागा लाभदायक नसली तर... मी माझ्या मनातली शंका बोलून दाखवली; माळ्याने सांगितलेला सापाचा किस्सा ऐकून त्यावर हे मात्र हसले. "अग,तू सायन्स शिकलेली, तू शकुनावर विश्वास ठेवतेस कसा ? असं भ्याडपणानं राहून तुला कसं चालेल. माझी ही सैन्यातली नोकरी–आज इथं, तर उद्या तिथं. देवदयेनं चांगली जागा मिळाली हे पुष्कळ. समजा, कॅप्टन जोन्स आणि त्याची बायको यांचा इथं मृत्यू झाला असेल, पण त्या घटनेलाही काहीतरी कार्यकारणभाव असेलच ना ?" ह्यांनी आपले मत सांगितले.

ह्यांच्या बोलण्याने मला जरा धीर आला. त्यानंतर मात्र हा विषय घरात चर्चिला गेला नाही. मी माझ्या संसा-रात व्यग्र झाले होते. घरकाम, माझ्या मुलाचं काम, त्याच्याशी चेंडू-बॅट खेळणं आणि उरलेला वेळ बाग काम यात जाई. तानू माळ्याने चार ताटवे तयार करून बाकीचे सारे अंगण अगदी साफ ठेवले होते. मी ताटव्यातल्या गुलाबाच्या रोपांची मशागत करी–एकदा अशीच मी बागेत काम करताना फाटक उघ-डून एक मध्यवयीन स्त्री माझ्यासमोर आली.

"नमस्ते मिसेस खरे. मी मिसेस रामन, आम्ही तुमच्या समोरच्या घरात रहातो. तुम्ही इथं नवीन आहात, खरं म्हणजे तुम्हीच ओळख करून घ्यायला यायचं; पण वाटलं, तुम्हाला घर लावण्यात, मुलाचं करण्यात वेळ झाला नसेल, आपणच जाऊन ओळख करून घ्यावी–" तिने आपल्या येण्याचा हेतू सांगितला.

"बरं झालं, आलात ते. मीही येत जाईन आता." आम्ही दोघीही घराच्या पायऱ्या चढून व्हरांड्यातल्या खुर्च्यांवर बसलो. मिसेस रामनलाही मोकळेपणा वाटला. थोड्या वेळाने चहा-चिवडा घेऊन मी आले, आमच्या गप्पा अधि-

कच रंगल्या.

"या घरात पूर्वी कॅप्टन जोन्स रहायचे! आम्ही त्यांच्याकडे खूपदा येत होतो. मला तिच्या पिंकीचा इतका लळा होता" मिसेस रामन पिंकीच्या आठवणींनी गहिवरली.

मलाही मनातून जोन्स कुटुंबाबद्दल उत्सुकता होती, पण पहिल्या भेटीतच मिसेस रामनला विचारणं योग्य वाटेना, म्हणून मी इतकच म्हणाले, "तुझी आणि मिसेस जोन्सची खूप ओळख होती?"

"अग खूप काय, चांगलीच मैत्री होती. खरं सांगू का, मिसेस जोन्स अतिशय बुद्धिमान होती, स्वतः गोल्ड-मेडॅलिस्ट होती बॉटनीची, शिवाय चांगल्यापैकी लेखिका होती. 'विकली' मध्ये स्त्रियांचं पान ती लिहायची. तिच्या मानानं तिचा नवरा अगदीच बेताचा होता ग. शिक्षण फक्त आर्मीचं. कोणतंही कर्तृत्व अंगी नाही. दारूचं जबरदस्त व्यसन. तिच्यासमोर तो नोकर दिसायचा. तरी अशा बरोबर तिनं पाचसहा वर्ष संसार केला –"

"कॅप्टनचाच एक अविवाहित चुलतभाऊ वैमानिक होता. कॅप्टन आठ महिन्याच्या कोर्सवर महुला गेला असताना हा वैमानिक इथं होता. तसा तो त्यापूर्वीही मधूनमधून रजेवर यायचा; मोठा कलंदर माणूस. बिलीयर्डस् उत्तम खेळायचा, जलरंगाची चित्र उत्तम काढायचा. कॅप्टनच्या गैरहजेरीत त्या दोघांचं संघटन वाढलं. कॅप्टन जेव्हा परत आला तेव्हा त्याला ते सहन झालं नाही. त्यांचंही आपल्या बायकोवर प्रेम होतं, आपल्या दोन मुलीवर प्रेम होत. त्या प्रेमापायीच त्यानं तिचा जीव घेतला आणि आपणही दिला. तुमच्या या घराला इतिहास आहे हं." माझा निरोप घेऊन ती निघाली.

'तुमच्या घराला इतिहास आहे हं." हे तिचे वाक्य मात्र माझ्या कायमचे लक्षात राहिले. खडकीच्या त्या घरात आम्हाला पुढे तीन वर्षे रहावे लागले होते; तिथे कधी अंगणात साप दिसला नाही की आम्हाला कसलाच त्रास झाला नाही. मात्र कधी मुलाला अगर ह्यांना साधा ताप आला तरी माझं मन काळजीनं भरून येई. खरं म्हणजे साधा 'फ्लू' किंवा डोकं दुखून ताप येणं म्हणजे क्षुल्लक बाब पण मला मात्र सतत काळजी लागून रहायची... हे सारं कॅप्टन जोन्स आणि त्याच्या बायकोमुळे मला भोगावे लागत नाही ना?...तानू माळ्याचे बोलणे आठवत राही.

माझ्या मनातल्या शंकेचा सुगावा माझ्या आईला लागला. एका पत्रात तिने लिहिले, "आपल्या दिवेकरशास्त्रींनी यावर उपाय सुचविला –रोज वैश्वदेव करावा."

खरे म्हणजे हे स्वतः पूर्ण नास्तिक. मी सायन्सची विद्यार्थिनी. देवधर्म, अध्यात्म सारे काही शास्त्रीय सत्याच्या निकषावर घासण्याची माझी प्रवृत्ती असूनही वैश्वदेव या विषयाचा खरेखोटेपणा न पडताळून पहाता रोज वैश्वदेवाची सिद्धता मी करीत होते. वैश्वदेवाचा अर्थ न समजून घेता सारे करीत होते – माझ्या घरासाठी, माझ्या मुलांमाणसांसाठी? □ □ □

नूरन
पिंपळपान

# दोन दीर्घ काव्ये

पुस्तके

केशव मेश्राम

खंडकाव्यांची आणि दीर्घकाव्यांची निर्मिती गेल्या दशकांच्या तुलनेने आता कमी झाली आहे. केवळ वाङ्मयीन अभिरुचीचा विचार करणाऱ्या मोजक्या अंकातून वा विशेषांकातून, केव्हातरी एखादुसरी मोठी कविता आढळते, नाही असे नाही. पण एकोणीसशे पन्नासपर्यंत खंडकाव्ये, कथाकाव्ये, दीर्घकाव्ये यांच्या निर्मितीबद्दलचा जो झपाटा होता तो ह्या दोन दशकात कमी झाला एवढे मात्र नक्की. आणि अशा पार्श्वभूमीवर श्री. अविनाश वरोकर या नागपूरच्या तरुण कवीने लिहिलेले 'नूरन' हे खंडकाव्य आणि श्री. चोखा कांबळे यांनी लिहिलेले 'पिंपळपान' हे दीर्घकाव्य, त्यांच्या आकारात्मक किंवा रचनात्मक वेगळेपणामुळे, विशेष लक्षात राहतात.

प्रसिद्ध लेखक श्री. कुशवंतसिंग यांची 'Train to pakistan' ही कादंबरी श्री. वरोकर यांच्या वाचण्यात आली आणि त्यांच्या मनात अस्वस्थतेचे बीज पडले. ते म्हणतात– "जवळ जवळ दहा वर्षे त्या हृदयभेदक आणि प्रक्षोभक घटनांनी रात्रंदिवस माझा एकसारखा पाठलाग केला. अंतःक्षोभ वाढतच गेला. मी झपाटला गेलो व त्या अवघड मनोव्यथेतूनच माझं 'नूरन' हे खंडकाव्य साकार झालं. कुशवंतसिंगाच्या निर्मितीचा हा प्रभाव, योग्य असाच आहे.

हे काव्य दहाबारा घटनांचा आधार घेऊन निर्माण झाले आहे. सरहद्दीवरील 'मनोमाजरा' नावाच्या गावच्या मुसलमान कोष्टयाची मुलगी 'नूरन' रूपवती आणि गुणवतीही. फासावर लटकलेल्या एका कुप्रसिद्ध डाकूचा, 'जगिया' हा शीख तरुण, 'नूरन'चा प्रियकर. त्यांच्या पाणवठ्यावर होणाऱ्या भेटीगाठी, त्यातून तरुण देहाकडून घडणारी स्वाभाविक चूक, त्यातून 'नूरन'चे गर्भवती राहणे, देशाची फाळणी होणे, 'जगिया' व 'नूरन' परस्परांच्या बाहुपाशात-एकांतात असताना, गुंडाकडून तिला पळवण्याचा प्रयत्न होणे; जगियाने त्यांचे खंजिराने मुडदे पाडणे, पोलिसांनी त्याला खुनाबद्दल अटक करून तुरुंगात डांबणे, 'नूरन'चे पाकिस्तानात निघणे, तिच्या गाडीवर कोसळणाऱ्या

पूवरचित संकटाची, नुकत्याच सुटलेल्या जगियाला चाहूल लागणे आणि ' गाडी ' व्यवस्थित जावी म्हणून, अडथळा दूर करताना अज्ञातातून सुटलेल्या गोळीला बळी पडून ' जगिया 'चा मृत्यू आणि त्या काळोख्या रात्री ' सुकलेल्या या दोन कळयांची ' कहाणी अखेर संपणे. इतक्या घटनांची निर्मिती श्री. वरोकर यांनी ' नूरन 'च्या रचनेसाठी केली आहे.

काव्य म्हणून, कलाकृती म्हणून या खंडकाव्याचा आस्वाद घेताना, कुशवंत-सिंगांच्या कादंबरीने उडविलेल्या क्षोभाचा भावकल्लोळ येथे अभावानेच जाणवतो. उलट एक पारंपरिक प्रेम-कहाणी, शोकांतिका वेगळया पार्श्व-भूमीवर असेच त्याचे सूत्र कवीला जाणवले. त्यामुळे मन सुन्न करून टाक-णाऱ्या जबरदस्त भावनेचा प्रखर स्रोत येथे मुळीसुद्धा जाणवत नाही. काव्याच्या घटनांची एक तर्कसंगत व भावसंगत दुपेडी वीण; सहजपणाने विणली जाणे जे आवश्यक असते, तेही येथे घडत नाही. रूढ अर्थानेही खंडकाव्य म्हणून आणि सलग परिणामाच्या दृष्टीने ' काव्य ' म्हणूनही, ' नूरन ' ही ' आकृती' सामान्य उतरली आहे.

आठशेपेक्षा अधिक ओळींच्या आधा-राने त्यांनी आपली ' नूरन ' शब्दांकित केली आहे. पण निसर्ग, व्यक्ती आणि भावबंधांचा सुसंगत समन्वय, त्यांना साधता आला नाही. शब्द एकीकडे आणि पद्यगत भाग कोरडा किंवा तिसरीकडेच असाच प्रकार फार झाला आहे. केशवसुत आणि मर्ढेकरी कवि-तांच्या बाह्यरूपावशेषांचाही वरोकरांवर चांगला पगडा पडलेला दिसतो. अर्थात त्याही अनुकरणाच्या-लकबीच्या, दुय्यम पद्धतीचा.

ह्या एवढया विस्कळित लांबणी-मध्ये एखाददुसरी जागा मात्र, कवीच्या अंगभूत सामर्थ्याची चुणूक दाखवणारी सापडते. ' जगिया ' व ' नूरन ' यांच्या ' मीलना 'च्या काही जागा छान उत-रल्या आहेत.

" धुके बनोनि मुके पाखरू ।
घेईल गिरकी नभोवितानी "

किंवा

" उघडया मिटल्या नयनापुढती ।
असतील तरळत काजळरेखा ।
क्षणाक्षणाला पडत असावा ।
मधुर क्षणांचा शामल विळखा "

महात्मा गांधींच्या संदर्भातही –

" शोणित शिंपुनी लाल जाहली ।
अबोल पाने इतिहासाची ! " अशा भावोत्कट ओळी त्यांनी लिहिल्या आहेत. यश हे इतकेच.

प्रेरणा एखाद्या समर्थ कलाकृतीकडून जरी मिळाली असली, तरी अंतरीचा उमाळा आणि कवीची ' व्हिजन ' परि-पूर्ण नसली की अपयशाखेरिज काही मिळत नाही. हेच ' नूरन 'च्या बाबतीत म्हणावे लागते. त्यातच प्रा. या. मु. पाठक यांची आशीर्वादात्मक प्रस्तावना, बरीच अप्रस्तुत आणि आत्मस्तुतीने भरलेली, या खंडकाव्याला लाभली आहे हे आणखी वाईट. एकूण वरोकरांची ' नूरन ' हुकली हेच खरे. ◻

## पिपळपान

'पिपळपान' हे तीनशेपेक्षा अधिक कडव्यांचे श्री. चोखा कांबळे यांनी निर्मिलेले दीर्घ काव्य. या काव्यात श्री. कांबळे यांनी हताळलेला विषय रूढ अर्थाने जूना आहे. एक देहविक्रय करणारी वेश्या आपली कर्मकहाणी आलेल्या गिऱ्हाईकास ऐकवते आहे. आपल्या पतित आयुष्याची घृणा, त्या आयुष्याची परवड आणि तिने विचारलेले काही अत्यंत साधे प्रश्न, अस्वस्थ करून टाकतात.

वरवर पाहता ही एक शरीर विक्रयाचा व्यवसाय करावा लागणारी स्त्री आहे. एवढ्यावर श्री. कांबळे यांच्या आत्मवेदना प्रकट करणाऱ्या नायिकेचे वर्णन पूर्ण होत नाही. ती अवर्ण वर्णातील– चार्तुर्वण्य व्यवस्थेतील एक स्त्री आहे. गाववेशीबाहेर सवर्णांच्या कृपेने जगणाऱ्या किंवा जिवंत मरण हजारो वर्षे भोगणाऱ्या वर्गातील ती 'स्त्री' असल्याने तिचे दुःख अधिक गडद होते. ती म्हणते–

"म्हार मांग मोची गावासंगे लीन–
म्हणून लुटावी इज्जत गुमान?"

आणि ह्या प्रश्नातील बोच, कोणाही माणसाला, वस्तुस्थिती मान्य करायला लावणारी व शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे.

कोयना नदीच्या काठी सातारा जिल्ह्यात एका बेचक्यात वसलेल्या 'ऱ्हासाटी' गावची ही निवासी. शाळेत हुशार विद्यार्थिनी. बघता बघता ती वयात आली आणि तिच्या 'बापूंनी'– वडीलांनीं गांववाल्यांच्या नजरांचा अर्थ ध्यानात घेऊन, तिला अनुरूप वर नियुक्त केला. वाङ्निश्चय ठरला. हे पाखरू असे अल्लाद जाणे सलेला आवडले नाही. गावपाटलाच्या पोराने एका संध्याकाळी तिच्यावर अतिप्रसंग केला. गावकऱ्यापुढे भर चावडीत दाद मागणाऱ्या बापाने प्राण सोडला. आधीच काही नव्हते. आता तर कर्त्या पुरूषाचाही आधार संपलेला. बलात्कारित तरुणी म्हणते–

'बाहेर वेशीच्या घड नाही घर
रानात ना शेत आम्हा पोटभर'

साताऱ्याहून मुंबईला. सारजा मावशीने तिला आसरा देण्याच्या निमित्ताने कधी न सुटणारा धंदा शिकवला. तरीही ती धडपडली आणि शेवटी 'केरबा लांडगे' या समाज सेवकाने तिला कुंटणखान्यात सोडले. आता तिच्याही पदरी चार पोरी आहेत. एवढा फरक.

धर्माच्या नावाखाली देवदासी, मुरळी, जोगतीण म्हणून सोडलेल्या अनेक अगतिक परित्यक्तांची आणि साऱ्या स्त्रीजातीची ही 'हलाखी' चोखा कांबळे यांनी साकार केली आहे. ज्याला ती कहाणी सांगते तो युद्धात, धर्मवेडात पिसाटलेल्या सैनिकांपैकी एक आहे.

भोगासाठी जात येते का हो आड?
धर्मसंस्कृतीला उरते का चाड?"

असे विलक्षण प्रश्न जीवाच्या आकांताने तिने विचारले आहेत,

कथानकाच्या ओघात अनेक गोष्टींना कांबळे यांनी स्पर्श केला आहे. या वेश्येची कर्म कहाणी मांडताना श्री. चोखा कांबळे यांची अत्यंत प्रासादपूर्ण सोपी भाषा मनातच सरळ घर करते. ह्या सोप्या भाषेचा यशात फार मोठा वाटा आहे.

'करावा शृंगार श्रावण सरीत
धरती सारखा सजल, हसत'

किंवा—'असेच मनात येते काही तरी
आणि मनातच जिरे पाण्यापरी!'

यातील; 'धरती सारखा सजल शृंगार', 'काहीतरी पाण्यासारखे मनातच जिरणारे', ह्या भावसत्याचा प्रभाव चटकन जाणवतो आणि शेवटी तीही एक स्त्रीच— स्त्रीसुलभ भावनेचा स्वर म्हणून—

'नाही मूलबाळ जीवाला आधार
धरणीला भार जन्म निराधार' हे

अत्यंत स्वाभाविक व सहज असे वाटते. प्रचार संपून वेदना अशी शब्दरूप घेते.

पण या साधेपणा सोबतच काही कच्च्या जागा पिंपळपानात आहेत. पृष्ठ तेरावरील 'दिठीचा अनंग', 'वाजवितो नीरो फिडल गुमान', मृत्युंजय, निषादपुत्र, अभिमन्यू, दक्ष-प्रजापती, पानशेत, व्हिएतनाम, इस्त्राएल, नाटके-सिनेमा यांचे कित्येक संदर्भ कवीच्या उद्रेकातून आले आहेत, ते ठिगळवजा वाटतात.

'पिंपळपान' हे नावही कवीने कल्पकतेने योजले आहे. त्याचे मर्म प्रस्तावना-लेखिका दुर्गा भागवत यांनी विशद करून सांगितलेच आहे. 'षडाक्षरी' रचना, साधेपणा आणि त्या वेश्येने विचारलेल्या—

"हे परमेश्वरा असशील तर
तूच ऐक माझी विनम्र तक्रार!"


या फिर्यादीच्या आसूडाचा, सन्मानाने, संस्कृतीच्या थाटामाटासहीत जगणाऱ्या, अवघ्या मानवजातीलाच — भारतामध्ये तर फार गंभीर विचार करावा लागेल. तशी घुसळण सध्या चाललीच आहे.

एक जुना विषय नव्या संदर्भात, पण सहजपणाने बोलका केल्याबद्दल 'पिंपळपान' कर्त्या श्री. चोखा कांबळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे.

**नूरन**
अविनाश वरोकर
नागपूर प्रकाशन, नागपूर १.
किमत : तीन रुपये.

**पिंपळपान**
चोखा कांबळे
महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा प्रकाशन.
किमत तीन रुपये.

□ □ □




राज्य नाट्यस्पर्धा

# मी पाहिलेली तीन नाटके

रंगनाथ कुलकर्णी

दूरवर्षी राज्य सरकारतर्फे नाटकांच्या स्पर्धा भरविल्या जातात. नव्या नाटकांची लाट येते. शेकडो तरुण-तरुणी अत्यंत उत्साहाने दोन तीन महिने नाट्यकलेच्या धुंदीत वावरतात... निकाल जाहीर झाले की, टीका प्रतिटीका येत रहाते. या सबंध गळाठ्यातून एकदोन माणके हाती लागतात...कधी उत्तम नाटकाच्या रूपाने एकादे घबाड एकाद्या निर्मात्याला मिळते.

गेली १६ वर्षे 'नाटक' या जीवघेण्या विषयात गळ्यापर्यंत रुतुन बसलेल्या माझ्या नाटकवेड्या रसिकाला मग घरी झोप येत नाही. पुन्हा एकदा शिंगे मोडून वासरात शिरायचा मोह होतोच–

आणि ठाणे केंद्रातली तीन नवी कोरी नाटके मी पहातो.

'स्टील फ्रेम'

'ललित नभी मेघ चार'

'अर्ध्याच्या शोधात दोन'

विनायक पुरोहितांच्या गुजराती व नंतर हिंदी 'स्टील फ्रेम' विषयी पुष्कळ ऐकलेले असते. माझ्या धावपळीच्या आयुष्यात हिंदी प्रयोग पहायचा राहून गेलेला असतो. मराठी रूपांतर करणारे राजा कारळे अगत्याने बोलावतात–

'स्टील फ्रेम' उलगडत निघते. तिन्ही अंकात केशवराव मोरे यांनी वापरलेली पोकळ पोलादी चौकट नोकरशाहीची प्रतीक म्हणून डोळ्यात भरते...कारळ्यांचा अनुवाद समाधान देतो. एवढे अवघड नाटक पेलण्याची मोरे पति-पत्नींची जिद्द कौतुकास्पद वाटते...पण एवढेच!

सारखे वाटत रहाते–याहून चांगल्या समर्थ संचात 'स्टील फ्रेम' पुन्हा पहायला मिळाले पाहिजे...

'स्टील फ्रेम'मध्ये अशोक साठे भेटतात. या कर्तबगार तरुणाविषयी मला फार आदर आहे. त्यांचे कल्पक नेपथ्य, चित्रवेधक प्रकाशयोजना, 'ग्रॅज्युएट' नाटकातला अभिनय डोक्यात ताजा असतो...जोडीला त्यांनी मिळवलेल्या खानोलकरांच्या 'स्क्रिप्ट' विषयीची उत्सुकता!

'सूर्याभोवती प्रदक्षिणा घालण्याचं व्रत घेतलेली ही पृथ्वी फक्त राज-

पुत्रांनांच जन्म देते. इथे जन्मणारा कोणीही महारोगी नसतो. आपल्या मनातील कोळीष्टकं नाचवून आपण आपल्याच पिशाच्चांची भुतं पडद्यावर नाचवतो. माणसातल्या माणसाचा शोध घेणाऱ्या बाळवंधूच्या व्यवहारी भीषण स्वप्नाची कहाणी '

'ललित नभी मेघ चार'—स्वप्न आणि वास्तवाचे गहिरे रंग लेवून रंगमंचावर प्रगट होते.

स्वत: अशोक साठे डॉ. श्रीराम लागूंच्या शैलीत, आवाजात नाटकभर का बोलत होते, कळले नाही...त्यांची प्रकाशयोजना अंत:करणाला स्पर्शून गेली. त्यांचे हे नाटक पहिल्या फेरीतून पुढे सरकले तर किमान स्वप्न आणि वास्तव या दोन पातळ्यांवरचे खानोलकरांचे हृदयस्पर्शी, काव्यगर्भ, मुलायम संवाद त्यांनी किमान दोन तीन शैलीत, विविध सुरात—पट्टीत फेकावेत.. तेवढी ताकद, तेवढी समज या गुणी नटात नक्की आहे.

बाजी मारली ती लीना फडणीस या सोळासतरा वर्षांच्या अल्लड मुलीने आणि कुष्ठ रोग्याचे शंभर टक्के दर्शन देणाऱ्या विजय चौबळांनी !

लीना 'सुमडी'ची भूमिका जगली... नुकताच आचार्य विनोबा भाव्यांची मुलाखत घेऊन आलो...ज्या निरागस, बालसुलभ साधेपणाने हा तपस्वी त्या तासाभरात दोन-चारदा हसला—ते मोती वेचणारे ते सोनेरी क्षण हा माझ्या गद्यजीवनातला अमोल ठेवा आहे, असे मानतो...उंच झाडावरून पडलेल्या विश्रामची कुंडलिनी जागी झालेली असेल, मानवी व्यवहाराची कठोर 'स्टीलफ्रेम' मोडून तो 'ललित मेघां'वर स्वार होणारा बाळवंधू असेल तर त्या भूमिका करणाऱ्या अशोक साठ्यांनी त्याच निरागस, लोभस हास्याने 'सुमडी'शी संवाद साधला पाहिजे !

अन्यथा...

'त्यांच्या उंचीखेरीज त्यांच्यापाशी स्वत:चे असे काहीच नव्हते—' असली परीक्षणे वाचण्याचा प्रसंग आमच्यासारख्या मित्रांवर येतो आणि मन व्याकुळ होतं.

'तीन चोक तेरा'नंतर श्याम फडक्यांचा एकही फार्स मी पाहिलेला नाही. 'फार्स' हा नाट्यप्रकार माझ्या प्रकृतीस मानवणारा नाही...

पण—

'तीन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक' असे बिरुद मिरविणारे 'अर्ध्याच्या शोधात दोन' हे त्यांचे नवे कोरे नाटक पाहायला उत्सुकतेने गेलो. खुद्द फडक्यांचे गाव, 'गुरुदत्त मित्रमंडळ डोंबिवली' ही गेल्या वर्षीच्या स्पर्धेत अंतिम फेरीत दुसऱ्या क्रमांकाने आलेली विजेती संस्था...मो. ह. विद्यालयाचे पटांगण रसिक प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते. पण तरुण आणि रसिक जिल्हा प्रसिद्धी अधिकारी श्री. शशिकांत गुप्ते आणि त्यांचे दक्ष सहकारी सर्वांना सामावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते...

संकष्टी चतुर्थीच्या चंद्राला साक्षी ठेवून ठीक साडेनवाला पहिली घंटा

झाली...आणि नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या जन्मदिनी त्यांच्या पुण्यस्मृतीस सहस्र प्रणाम करून रंगमंचावर बागडू लागला आणखी एक ' फार्स ! '

' Farce is a farce for the spectators, but a life and death struggle for the charactors. ' हे फार्सचे मूलतत्त्व दिग्दर्शक–अभिनेते राम मुंगी यांच्या अंगात पूर्णपणे बिंबले असले, तरी अन्य पुरुष साथीदारांच्या अंगी बाणविण्यात त्यांच्यातला दिग्दर्शक असफल झाला आहे.

शिवाय तिसरा अंक फालतू तपशीलात फरपटवीत नेण्यात आमचे लेखक मित्र–श्याम फडके यांनी त्या मंडळींना मनःपूर्वक साहाय्य केले ! अलकनंदा रणदिवे, लीला करंबेळकर यांची तयारी, समज वाखाणण्याजोगी ! स्वतः राम मुंगी यांनी लेखकाचे हमखास दाद घेणारे उपहासगर्भ शेरे खणखणीतपणे फेकले आणि खळाळून हशे वसूल केले...

चकित करून टाकणारी गोष्ट म्हणजे या नाट्यकृतीत तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी श्याम फडके यांनी लिहिलेला dream sequence अंतःकरण हलवून गेला...कविमनाच्या माणसाला आपल्या अत्यंत प्रेमाच्या व्यक्तीकडून क्षणमात्र दाद मिळाल्याचा भास झाला, तरी तो काय फुलतो––ओहोहो !

' हमने तो बोझा लिया था
ख्वाब में तस्वीर का । '
–आणि ही लाली या गालांवर !

वा वा वा–राम मुंगी ब्रेव्हो !

श्याम फडके–मानलं तुमच्या लेखणीचं सामर्थ्य !

मागे एकदा वसुधा मान्यांची कथा वाचली होती. उद्योगधंद्यात रात्रंदिवस मग्न असलेल्या उद्योगपतींना ' घरी ' विरंगुळा मिळत नाही म्हणून त्यांचे कर्तृत्व फुलवणारा गोड शब्द देणारी ' मैत्रीण ' फ्लाइंग राणीमध्ये भेटते...

अशा अनेकांच्या कर्तृत्वाच्या पाकळ्या उमलविणारी एखादी ' मैत्रीण ' आपल्यालादेखील का भेटत नाही–असा गोड प्रश्न त्या खुल्या नाट्यगृहातल्या बाराशे प्रेक्षकातल्या निदान सहाशे कर्तृत्ववान् पुरुषप्रेक्षकांना पडला असेल खास !

स्त्रीप्रेक्षकांना कोणत्या प्रश्नाने रात्रभर तळमळत ठेवले असेल ते मी काय सांगू ?

नाटककाराच्या लेखणीचे हे यश सामान्य नव्हे !

□ □ □

क्रीडांगण

# राष्ट्रीय खोखो स्पर्धेच्या निमित्ताने

मुकुंद मणूरकर

बारामती येथे डिसेंबर महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या खो खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ नुकतेच जाहीर झाले. खोखोत महाराष्ट्रामध्ये – आणि पुरुषांच्या बाबतीत भारतातही – पुणेकरांनी आपले वर्चस्व निर्विवादपणे सिद्ध केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या तिन्ही संघात (पुरुष, महिला व कुमार गट) पुणेकरांनी जास्तीत जास्त जागा पटकाविल्या. पण गंमतीची गोष्ट म्हणजे या निवडीबाबत खुद्द पुण्यातूनच टिकेची झोड उठली ! पण प्रांजळ नजरेने महाराष्ट्राच्या खोखो संघाकडे पाहिल्यास दिसून येईल की, सर्वोत्कृष्ठ संघ निवडण्यात निवडसमिती बहुतांशी यशस्वी ठरली आहे. निवड समितीच्या निर्णयाचे पृथ:करण करताना ज्या दोन स्पर्धेतील कामगिरीवर हे संघ निवडण्यात आले त्या स्पर्धांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते.

पैकी पहिली स्पर्धा म्हणजे राणाप्रताप संघाने आयोजित केलेली अखिल भारतीय पातळीवरील निमंत्रित सघाची खोखो स्पर्धा ! अतिशय डौलात पार पडलेल्या या स्पर्धेने निवडसमितीचे काम बरेचसे सोपे केले होते. कारण या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व खेळाडूंची एकमेकांबरोबर, त्याचप्रमाणे भारतातील इतर नामवंत खेळाडूंबरोबर कसोटी लागली होती. पुण्याच्या नवमहाराष्ट्र संघाने ही स्पर्धा जिंकताना आपल्या योजनाबद्ध खेळाचे व गिरीश दंडे या त्यांच्या नवोदित खेळाडूने आपल्या नेत्रदीपक खेळाचे प्रात्यक्षिक दाखविले. या स्पर्धेत नजरेत भरलेले वैशिष्ठय म्हणजे सर्वच संघांनी आत्मसात केलेली योजनाबद्ध खेळाची पद्धत ! खोखो हा आता केवळ धश्चोट पद्धतीचा खेळ राहिला नसून तो एका अभ्यासपूर्ण पातळीवर पोचल्याचेच ते द्योतक होते ! या स्पर्धेच्या निमित्ताने भारतातील नामवंत खेळाडूंचा खेळ बघण्याची संधी पुणेकरांना बऱ्याच कालावधीनंतर मिळाली. त्याचप्रमाणे भारतातील पहिल्या चार संघात पुण्याचे नवमहराष्ट्र, सन्मित्र व महाराष्ट्र बँक हे तीन संघ बसू शकतात हेही सिद्ध झाले. या स्पर्धेचे उल्लेखनीय वैशिष्ठच म्हणजे उत्कृष्ठ संयोजन ! राणाप्रताप संघाने स्पर्धेच्या संयोजनाची जबाबदारी नव-

महाराष्ट्र, सन्मित्र व रमणबाग मित्र-मंडळ या संघांवर सोपविली होती. एरवी एकमेकांशी प्रखर विरोधात झुंजणारे हे संघ या स्पर्धेच्या निमित्ताने एकत्र आल्याचे दुर्मिळ दृश्य पुणेकरांनी पाहिले.

या जमेच्या गोष्टीवरोबरच प्रेक्षकांनी एक विचित्र गोष्टही अनुभविली. ती होती महाराष्ट्र बँक संघाच्या संदर्भात ! बँकेच्या संघात नवमहाराष्ट्र व सन्मित्र-मधील खेळाडूंचा भरणा आहे. हे सर्व खेळाडू श्रेष्ठ आहेतच. त्यामुळे उपांत्य-पूर्व फेरीत मुंबईच्या विजय क्लब या तुलनेने बलाढ्य असलेल्या संघावर त्यांना मात करता आली. पण उपांत्य सामन्यात मात्र बँकेचे काही विशिष्ठ खेळाडू गडवडले कारण प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहिलेला संघ हा 'त्या' खेळाडूंचा ओरिजनल संघ होता ! आपल्या नेहमीच्या सहकाऱ्यांविरुद्ध खेळावे लागणार म्हणून हे खेळाडू बावचळले. कुरूक्षेत्रावर युद्धाचे वेळी आप्तस्वकीयांवर शस्त्र उगारण्याच्या कल्पनेने गोंधळलेल्या अर्जुनासारखीच या खेळाडूंचीही संभ्रमित अवस्था झाली असावी. (पण यांना वठणीवर आणण्या-साठी यावेळी कोणी कृष्णाची भूमिका वठविली नाही.) परिणामी त्यांच्या हातून अंगचोरपणाचा खेळ झाला. हा प्रकार सहज घडला का जाणूनवुजून केला गेला याची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. पण या स्पर्धेतील कामगिरी महा-राष्ट्राचा संघ निवडताना विचारात घेतली जाणार असतानाही हा अंगचोर खेळाचा प्रकार आश्चर्यजनक होता. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एक चांगली लढत पहावयास मिळेल या उत्सुकतेने सकाळी अकरा वाजेपर्यंत ताटकळत बसलेल्या हजारो प्रेक्षकांचा विरस करून या खेळाडूंनी प्रेक्षकांवर अन्यायच केला.

महिला विभागात बडोद्याच्या मध्यस्थ रमतने अंतिम फेरीत सहज प्रवेश केला. दुसऱ्या बाजूने अंतिम फेरीत प्रवेश करण्यासाठी चुरस झाली ती नवमहाराष्ट्र संघाच्या मार्गदर्शना-खाली सराव करणाऱ्या आर्यक्रीडोद्धारक मंडळ, सरस्वती कन्या व रेणकास्वरूप या तीन संघात. त्यात आर्य क्रीडोद्धारक यशस्वी ठरले. पण अंतिम फेरीत 'अर्जुन वीर' अचला देवरे आणि ज्योति व भावना या पारेख भगिनींच्या जोरा-वर मध्यस्त रमतने आर्य क्रीडोद्धारकवर सहज मात केली. शीला दळवी, नीला जोशी यांनी थोडी झुंज देण्याचा प्रयत्न केला एवढेच !

या स्पर्धेनंतर कल्याणला झालेली दुसरी चाचणी स्पर्धा म्हणजे राज्य अजिक्यपदाची आंतरजिल्हा स्पर्धा ! यात पुणे जिल्ह्याला पुरुष, महिला व कुमार या तिन्ही गटात अजिक्यपदे मिळाली. मुंबईचे संघ या तिन्ही गटात उपविजयी ठरले. यावेळी सर्व सामने एकतर्फी झाले, फक्त कुमार गटातील सामनाच काय तो चुरशीचा ठरला. शिवाय एका पंचांनी वारंवार दिलेल्या वादग्रस्त निर्णयांमुळेही तो निराळ्या-प्रकारे गाजला !

महाराष्ट्राचे खोखो संघ वरील दोन स्पर्धांनंतर जाहिर झाले. यंदा संघ निवडताना निवड समितीने चांगला पायंडा पाडला. खेळाडूंची अष्टपैलू, पळणारे व क्षेत्ररक्षक अशी वर्गवारी करून प्रत्येक संघात यापैकी अनुक्रमे पाच, चार व तीन खेळाडू निवडले. दुसऱ्या एका गोष्टीबद्दलही निवडसमिती प्रशंसेस पात्र आहे. संघ निवडताना त्यांनी जया-पराजयाचा विचार न करता केवळ वैयक्तिक कामगिरीच विचारात घेतली. त्यामुळे कुमार गटात उपांत्य फेरीतच बाद होणाऱ्या धुळे संघातील खेळाडूंनी अंतीम विजयी झालेल्या पुणेकरांइतक्याच म्हणजे चार जागा मिळविल्या. उलट धुळ्याशी बरोबरी करणाऱ्या नगर संघातील एकाच खेळाडूची निवड झाली. पुरुष गटातही (राणाप्रताप स्पर्धेत) सन्मित्रकडून पराभव पत्करणाऱ्या महाराष्ट्र बँकेचे तीन खेळाडू निवडले गेले तर सन्मित्रचे दोनच ! कर्णधारपदाच्या बाबतीतही एक गोष्ट नजरेस आली. पुणे जिल्हा संघात अरविंद पटवर्धनच्या नेतृत्वाखाली खेळलेले सतीश देसाई व विजय भट हे महाराष्ट्र संघाचे अनुक्रमे कप्तान व उपकप्तान झाले, तर महिला गटात पुण्याकडून कलिंदी फडकेच्या हाताखाली खेळलेली शीला दळवी महाराष्ट्राची संघनायिका झाली ! उलट गेल्या वर्षी उपकप्तान असलेल्या सुभाष चुटकेचा यंदा नुसताच खेळाडू म्हणून समावेश झाला. या नेमणूका करताना निवडसमितीने काही निकष लावलेही असतील. समाधानाची गोष्ट ही की नेतृत्वपदी नेमणूक झालेले खेळाडू त्या जागेसाठी पूर्णपणे पात्र आहेत !

निवडसमितीने यावेळी एक धाडसी निर्णय घेतला. राणाप्रताप स्पर्धेत उत्कृष्ट पळतीचे पारितोषीक मिळवलेल्या सन्मित्रच्या हेमंत जोगदेवला वगळले गेले. कारण कल्याणच्या स्पर्धेत त्याच्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे तेथे उपांत्य व अंत्य सामन्यात तो काही सेकंदातच बाद झाला. हेमंतच्या अपयशास त्याच्या प्रतिस्पर्धी खेळाडूच्या कौशल्यापेक्षा त्याचा दुखरा पायच कारणीभूत होता. मागे बंगलोरला झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघात अशा जखमी खेळाडूंचा भरणा होता आणि त्याची परिणती महाराष्ट्राच्या पराभवात झाली. तेव्हापासून राज्य संघटनेने जखमी खेळाडूंबाबत सावध दृष्टीकोन स्वीकारला. अर्थात् जोगदेवबाबतचा हा निर्णय अनेकांना पसंत पडला नाही. (जाता जाता – मागील वर्षी पुणे विद्यापीठ संघात हेमंत जोगदेवचा समावेश झाला नव्हता पण एका वृत्तपत्रात यावर झालेल्या टिकेला घाबरून निवडसमितीने त्याला संघात स्थान दिले ! यावेळच्या निवडसमितीलाही या दिव्यातून जावे लागेल ! ! ) सन्मित्रच्याच राजेंद्र द्रवीडचाही पाय दुखावलेल्या अवस्थेत आहे. पण तो बरा होईल या भरवंशावर त्याला संघात स्थान दिले. हेमंत जोगदेव काय किंवा राजू द्रवीड काय, दोघेही निस्संशय श्रेष्ठ खेळाडू आहेत.

संघातील त्यांचे अस्तित्व सहकाऱ्यांना नेहमीच स्फूर्तीदायक व प्रतिस्पर्ध्यांना आव्हानात्मक ठरते. पण खेळाडूंच्या श्रेष्ठतेबरोबरच, किंबहुना त्यापेक्षाही अधीक त्याच्या शारीरिक क्षमतेचा विचार झाला पाहिजे. जोगदेवच्या बाबतीत याचा जसा विचार झाला तसा द्रवीडच्या बाबतीत मात्र झाला नाही. शिवाय दुखऱ्या पायाने खेळणे स्वत: द्रवीडलाही रुचण्यासारखे नसावे. त्याच्याऐवजी सन्मित्रच्याच श्रीहर्ष जोशी या नवोदित खेळाडूला संधी देणे संयुक्तीक ठरले असते.

मुंबईच्या शेखर बागाईतकर व दिलीप भुलेस्कर या दोन गुणी खेळाडूंची निवड मात्र राजकारणामुळे होऊ शकली नाही. या खेळडूंचे मुंबई जिल्हा संघटनेशी वाद झाले. जिल्हा सघटनेने राज्य संघटनेला या खेळाडूंचा संघात समावेश करू नये असे सुचविले. राज्य-संघटनेने निवड समितीला तसा आदेश दिला. ही घटना त्या खेळाडूंवर नक्कीच अन्यायकारक आहे. महिला संघात मुंबईच्या हेमा जोगचा समावेश राखीव गड्यात केला आणि तोही 'संरक्षक' म्हणून ! पूर्वी 'सरक्षक' म्हणून चमकणाऱ्या जोगने यंदा क्षेत्ररक्षणात बरीच चमक दाखविली. कल्याणच्या स्पर्धेत सर्वात जास्त गडी तिनेच बाद केले. त्यामुळे 'क्षेत्ररक्षक' या नात्याने तिचा समावेश संघात करणे सहज शक्य होते.

खेळाडूंच्या निवडीचा विचार झाल्यानंतर कल्याणच्या स्पर्धेतील दोन गोष्टींचा उल्लेख करतो. एक गोष्ट म्हणजे स्पर्धेचे गचाळ सयोजन ! संडास, बाथरुम्स व निवास व्यवस्थेने नीचांक गाठला होता. प्रत्यक्ष मैदानावर तर

## महाराष्ट्राचे खो खो संघ

**पुरुष :** सतीश दळवी (कप्तान), विजय भट (उपकप्तान), अरविंद पटवर्धन, प्रकाश शेठ, प्रमोद गवंडे, गिरीश दंडे, श्रीरंग इनामदार, शेखर धारवाडकर, सुभाष चुटके, राजेंद्र द्रवीड (सर्व पुण्याचे); एडवर्ड मिरांडा व पुष्पराज बागाईतकर (मुंबई)

**महिला :** शीला दळवी (कप्तान), उषा नगरकर, आशा नगरकर, कालिंदी फडके, शोभा देसाई, नीला जोशी, रेखा लुंकड, जयश्री देशपांडे, जयश्री गोखले (सर्व पुण्याचे); मंगल महाले (उपकप्तान), हेमा गोखले, अलका बागाईतकर (सर्व मुंबई).

**कुमार :** हसमुख शहा (कप्तान), किशोर जगताप, सुधीर पाठक, दिलीप वेहरे (सर्व धुळ्याचे); अशोक दाहिजे, सुनील उपासनी, किशोर नाजरे शेखर कुलकर्णी (सर्व पुण्याचे); चंद्रकांत दळवी, दिपक परब व अरविंद भट्ट (सर्व मुंबईचे); नंदू पवार (नगर).

आदल्या दिवसापर्यंत स्पर्धेचे कुठलेच चिन्ह दिसत नव्हते. राणाप्रताप स्पर्धेतील उत्कृष्ट व्यवस्थेपुढे कल्याण स्पर्धेतील व्यवस्था काळ्या डागाप्रमाणे उठून दिसली. दुसऱ्या गोष्टीचा उल्लेख मला करावयाचा आहे तो जरा गंभीर स्वरूपाचा आहे. पुणे जिल्ह्याच्या पुरुष व कुमार संघांच्या व्यवस्थापकांनी कल्याणला काही खेळाडूंच्या बाबतीत जास्त 'इंटरेस्ट' दाखविला. पुण्याच्या संघात सन्मित्र व नवमहाराष्ट्राचे खेळाडू असतात. पण जेव्हा ते पुणे जिल्ह्याच्या बॅनरखाली बाहेर जातात तेव्हा ते 'पुण्या'चे खेळाडू ठरतात; एखाद्या संस्थेचे नव्हे! व्यवस्थापकानेही अशावेळी तुमचा आमचा असा भेद करणे अनुचित आहे. पण यावेळी तसे घडले. महाराष्ट्र संघाची निवड जाहिर झाल्यावर व्यवस्थापकद्वयानी पुण्यातील काही खेळाडूंच्या निवडीबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त करण्यास सुरुवात केली. हेमंत जोगदेवला वगळल्यावर तर हे भलतेच नाराज झाले. इतकेच नव्हे तर मुंबईतील एका सुप्रसिद्ध क्रीडा समीक्षकांकडे जाऊन त्यांना सांगितले की आम्ही पुण्यातून हेमंत जोगदेवबद्दल आवाज उठवतो, तुम्हीही मुंबईतून तसा प्रचार करा. अर्थात् त्या समीक्षकांनी यांचा हा 'व्यवस्थापकीय' हट्ट पुरवला नाही हे सांगणे नकोच! असो.

बारामतीला सत्तावीस डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष व कुमार संघाना विशेष आव्हान नसणार! उत्सुकता आहे, ती गेल्या गुजरातबरोबर संयुक्त विजेतेपद मिळविणाऱ्या महाराष्ट्र महिला संघाच्या कामगिरीबद्दल!! □ □ □

[ पृष्ठ ८० वरून ]

एप्रिलमध्ये एरिकसनची लष्करातून मुक्तता झाली व त्याच महिन्यात क्लार्कची जन्मठेप कमी होऊन त्याला २० वर्षांची शिक्षा झाल्याचे त्याला कळले. पुन्हा काही महिन्यानंतर तिचा पुनर्विचार होऊन ती आठ वर्षांवर आणण्यात आली. याच प्रकारे रेफची चार व मिझर्व्हेची आठ वर्षांवर शिक्षा आली. आरोपींचे पूर्वीचे वर्तन, तुरुंगातील वर्तन वगैरे अनेक गोष्टी ध्यानात घेऊन या शिक्षा कमी करण्यात आल्या. आणखी काही महिन्यानंतर तर, मॅन्युएलप्रमाणेच रेफचीही काही तांत्रिक मुद्यावर निर्दोष मुक्तता झाली.

रेफच्या सुटकेचे एरिकसनला वाटले नाही. कारण आपल्या कृत्याबद्दलचा त्याला वाटणारा पश्चाताप पहिल्यापासून स्पष्ट दिसत होता. पण क्लार्क–मिझर्व्हे यांच्या शिक्षा कमी झाल्याने त्याला निश्चितच वाईट वाटले. पण ही मरणोत्तर चिकित्सा झाली. स्वतः तो माओचा जीव वाचवू शकलो नाही याची अजून एरिकसनला खंत आहे. आता तो लष्करात नाही. सर्व सामान्य नागरी जीवन तो जगतो. पण व्हिएतनाममधील ती क्रूर घटना आणि त्यानंतरचे हे सारे सव्यापसव्य त्याच्या कायम स्मरणात राहिले आहे. तो म्हणतो, 'रस्त्यात कधी पौर्वात्य चेहेऱ्याची मुलगी दिसली तर लगेच मला तिच्या जागी माओचा चेहरा दिसू लागतो. अस्वस्थ होतो मी. पण नंतर ध्यानात येते की हा शांतता-काळ आहे आणि ती अमेरिकेत आहे...'

**समाप्त**

[ पृष्ठ ३२ वरून ]
वर कडी करण्यासाठी म्हणून की काय माओचे मागे बांधलेले हात सोडले आणि आपल्या खांद्यावरची बॅग तिच्या पाठीवर लादली.

पाच सैनिक आणि माओ आता झपाट्याने मार्ग आक्रमू लागले. त्यांचा वेग कमी होत नाही ना हे पाहायला मिझर्व्ह होताच. कारण आता सूर्य चांगलाच वर आला होता. त्याच्या प्रकाशात आपल्या मोहिमेवर निघालेली ही मंडळी दुरूनही दृष्टीत येत होती. एरिकसन सांगतो : छान, निसर्गरम्य असा प्रदेश होता तो. हायलँडस्मधल्या एका पठारावरून आम्ही चाललो होतो. आम्हाला सभोवार दिसत होत्या त्या छोट्या छोट्या टेकड्या, काळपट हिरव्या रंगाने माखलेल्या. खालच्या बाजूला एक विस्तीर्ण दरी होती. तीमध्ये एक शुभ्र पाण्याचा नाला लांबच लांब जाताना दिसत होता. या प्रदेशात सर्वत्र मुख्यतः हिरवा रंगच दिसत असला तरी मधलाच काही भाग निराळा दिसे आणि मग बाँबजळिताच्या काही खुणा दिसल्या की या लढाईच्या खुणा आहेत हे ध्यानी येई. त्याचप्रमाणे हा प्रदेशही असा विचित्र होता की मध्येच एकादा विस्तीर्ण माळच्या माळ मोकळा दिसे. तर लगेच घनदाट झाडीस प्रारंभ होई. यातून जायचं म्हणजे ठिकठिकाणी काटे लागत. अनेक ठिकाणी कपडे फाटत आणि झाडी तर इतकी दाट असे की चार-चार फुटाच्या अंतरावर असलेले आम्हीही एकमेकाला दिसत नमू.

सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास मिझर्व्हने अर्ध्या तासाची विश्रांती जाहीर केली. माओच्या तोंडातून बोळा काढण्यात आला. पण तिला खायला मात्र कोणीच दिले नाही. ती चिक्कार दमली आणि मधूनच तिला खोकल्याची उबळ येते असे पाहिल्यावर मिझर्व्हने तिला ॲस्पिरीन दिले.

त्या दिवशी सकाळी लष्करी कारवाई अशी एकच घडली आणि ती सुद्धा टाळता आली असती. रेफला वाटले की खालच्या नाल्यात स्ट्रॉ हॅट घातलेला एक व्हिएतनामी उभा आहे. तो व्हिएतकाँग गनीमच असे ठरवून रेफने आपल्या एम–१६ रायफलमधून त्याच्यावर दोन फैरी झाडल्या. पण अखेरीस तो निघाला एक रेडा. गोळीबाराच्या आवाजाला घाबरून त्याने धूम ठोकली. अनावश्यक गोळीबार करू नका हा सुरुवातीचा आदेश रेफने मोडला होता.

एरिकसन म्हणतो : रणक्षेत्रात आधीच्या योजनात काहीही अर्थ राहत नाही. पथक या शब्दालाही तसा काही अर्थ नसतो. कारण प्रत्येकजण आपल्या मनाप्रमाणे वागतो. आम्हीही आमच्या मनाला वाटेल त्याप्रमाणेच वागत होतो. मिझर्व्ह रेफला त्यावेळी काही बोलला नाही किंवा नंतर आम्ही कोणीही जरी असा आदेशाचा भंग केला तरीही मिझर्व्ह काही बोलत नसे. आपल्या सेनाप्रमुखांच्या (कमांडिंग ऑफिसर) आज्ञेचा हा जो सार्जंटने अवमान केला होता त्याबाबत त्याला उलट तपासणीत विचारले असता तो म्हणाला : 'बहुतेक

वेळा सर्वांचे सी. ओ. बरोबर एकमत असते. काही वेळाच मतभेद असतात आणि कधीकधी आपण ते सांगतही नाही. आपण आपल्या जवळच ठेवतो ते.'

हिल–१९२ च्या उंच शिखराच्या जवळ मंडळी सकाळी १०॥ ला पोचली आणि त्या दिवसाच्या कारवाईसाठी योग्य अशी ठाण्याची जागा मिझर्व्हेला सापडली. ती एक झोपडी होती. आठ फूट लांब, आठ फूट रुंद आणि आठ फूट उंच. तिला पूर्वेच्या बाजूला एक खिडकी व पश्चिमेला दार होते. या शिवाय उत्तरेला-दक्षिणेला दोन झरोके होते. थोड्याच अंतरावर एक ओढा होता. यामुळे पाण्याची पंचाईत होणार नव्हती. झोपडीत एक टेबल, भिंती-लगतच बांधलेले एक बाक आणि एका कोपऱ्यात फाटकी चटई अशा वस्तू होत्या. जमीनीवर डब्याचे तुकडे व दगड पडलेले होते. झोपडीच्या मातीच्या भिंतीना ठिकठिकाणी भोके पडलेली होती. मात्र बंदोबस्ताच्या दृष्टीने ती ठीक होती. मिझर्व्हेने लगेच ती कोठीची खोली केली व आपली शस्त्रास्त्रे, दारुगोळा आणि अन्न झोपडीत नेऊन टाकले. शिवाय माओला लपवून ठेवण्यास ती उत्तम जागा होती. एरिकसनला व रेफला झोपडी साफ करण्यास व माओवर नजर ठेवण्यास सांगून मिझर्व्हे, क्लार्क आणि मॅन्युएल आजूबाजूचा प्रदेश काळजीपूर्वक पाहण्यासाठी, फेरफटका मारण्याच्या दृष्टीने बाहेर पडले. मॅन्युएलने माओच्या पाठीवरचे ओझे खाली उतरून ठेवले आणि एरिकसन व मॅन्युएल यांनी झोपडी साफ करण्यास प्रारंभ केला. काही वेळ माओ त्या दोघांकडे पाहत राहिली व मग तिने त्यांना साफसफाईच्या कामात मदत करण्यास प्रारंभ केला. एरिकसन म्हणतो : ही जागा कशासाठी एवढी साफ केली जात आहे हे तिला त्यावेळी कळते तर ! ...

तासाभराने मिझर्व्हे व इतर दोघे परतले. तोपर्यंत मध्यान्ह व्हायला आली होती. तेव्हा सगळयांनी खाण्याचे डबे उघडले. फराळ त्यांनी झोपडीबाहेरच उरकला आणि तेथेच मैदानात ते विश्रांतीसाठी आडवे झाले. मिझर्व्हे आता ताजातवाना झाला होता. सकाळ-पासूनच्या श्रमाचा त्याचा शीण नाहीसा झाला होता व चांगल्या जेवणाने तो सुखावला होता. जमिनीवर पडल्या-पडल्याच त्याने झोपडीकडे नजर टाकली व आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, 'आता थोडी मौज केली पाहिजे नाही?' याच वाक्याची अपेक्षा असल्यासारखा क्लार्क हसला आणि रेफ व मॅन्युएल यांचीही साधारणपणे तशीच प्रतिक्रिया दिसली.

एरिकसन म्हणतो की, 'माझ्या चेहऱ्यावर बहुधा नाराजी व्यक्त झाली असावी आणि ते स्वाभाविकच आहे. कारण आता यापुढे जे काही करण्याची त्यांची इच्छा होती, तीमध्ये भाग घेणे मला तर शक्यच नव्हते आणि मिझर्व्हेला बहुधा याची जाणीव झाली असावी. कारण त्याने मलाच सर्वांच्या

आधी सरळसरळ प्रश्न केला की माझी पाळी येईल तेव्हा मी झोपडीत जाईन की नाही ? मी नकारार्थी मान हलविली तेव्हा मिझर्व्हेने मला धमकावण्यास सुरुवात केली. तो म्हणाला की ' फ्रेंडली कॅजल्टी ' म्हणून माझ्याविषयी तक्रार करण्यात येईल. क्लार्कने त्याला पुस्ती जोडली व रेफ आणि मॅन्युअल यांनी, ही काय नसती पीडा म्हणून माझ्याकडे पाहिले. तरीसुद्धा नकारार्थी मान हलवून मी नकारच दर्शविला. माझ्या ठाम निर्धारामुळे काहीशा अवमानित झालेल्या मिझर्व्हेने माझ्या पुरुषत्वाविषयीच शंका घेण्यास सुरुवात केली. नपुंसक, नामर्द म्हणून त्याने मला चिडवण्यास सुरुवात केली. माझ्यावर याचा परिणाम झाला नाही. '

पण रेफ आणि मॅन्युएल यांच्यावर त्यांनी प्रत्यक्ष झोपडीत जावे म्हणून हाच प्रयोग करण्यात आला असावा. निदान त्या भीतीने त्यांनी ' त्या ' कार्यक्रमास होकार दिला असावा. कारण रेफने कोर्टात सांगितले की मिझर्व्हेने एरिकसनला अगदी ऐकवणार नाहीत अशा शिव्या दिल्या. आपली अशी कुचेष्टा किंवा टवाळी होऊ नये म्हणूनच मी माझ्या स्वतःच्या हाताने साफसूफ केलेल्या त्या झोपडीत जाण्यास होकार दर्शविला. तर मॅन्युएलने सांगितले की माझी टर उडविली जाईल अशी भीती मला वाटत होती. एखाद्या सैनिकाची अशी टर उडविली गेली की त्याची कहाणी हळूहळू साऱ्या प्लटूनमध्ये पसरते. मग तो साऱ्या प्लटूनभर टवाळीचा विषय होतो आणि तो एकाकी पडतो.

एरिकसन बधत नाही असे पाहिल्यावर, मिझर्व्हे आणि मंडळींनी आपल्या कार्याला सुरुवात केली. इतका वेळ एरिकसन झोपडीच्या दारात उभा होता. तो दूर जाऊन एका गवताच्या पट्ट्यावर बसला आणि जवळच्या दुर्बिणीतून मधूनमधून दूरवर पाहत राहिला. नंतरच्या खटल्यामध्ये त्याला विचारण्यात आले, ' तू तुझी जागा का बदललीस ? ' तेव्हा एरिकसन म्हणाला, ' ते सर्व जण तर वेडयासारखे वागत होतेच आणि त्यांचा तो उत्साह पाहिला की माझ्या पोटात कळ उठत होती. मी विचार केला की कोणीतरी बाहेर लक्षच द्यायला पाहिजे. कारण तो भाग व्हिएतकाँग गनिमांचा होता. '

झोपडीत शिरण्याचा पहिला मान सार्जंट मिझर्व्हेने घेतला. एरिकसन सांगतो : ' तो झोपडीत गेला आणि त्या मुलीने मोठ्या कष्टाने कण्हल्याचा आवाज बाहेर आम्हाला ऐकू आला. त्या एका कण्हण्यातून तिची सारी हताश स्थिती व्यक्त होत होती आणि मग हे कण्हणे काही वेळ ऐकू येत राहिले. मध्ये ती मुलगी श्वास घेण्यासाठी म्हणून काय विश्रांती घेत असेल तेवढीच. त्यानंतर काही वेळाने कण्हण्याचे रूपांतर सतत फुटणाऱ्या हुंदक्यात झाले. जवळजवळ अर्धा तास हा प्रकार चालू होता आणि मग मिझर्व्हे बाहेर आला. त्याच्या अंगात शर्ट नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर अपरिमित आनंद होता. तो म्हणाला,

'मस्त पोरगी आहे. आणि मुख्य म्हणजे स्वच्छ आहे.' आणि त्याने रेफकडे बोट दाखवून त्याला झोपडीत जाण्यास खुणा-वले. आपली टवाळी केली जाऊ नये म्हणून रेफही झोपडीत गेला.

कोर्टात त्याने सांगितले, 'माओ नग्नावस्थेत एका टेबलावर पडली होती. तिचे हात पाठीमागच्या बाजूस बांधून ठेवले होते. ती इतकी निष्पाप, इतकी शांत दिसत होती!'

कोर्टात आलेल्या पुराव्याप्रमाणे पुढील हकीगत अशी : तरीसुद्धा रेफ आणखी काही वेळ तेथे राहिलाच आणि मग झोपडीतून कण्हणे, हुंदके ऐकू येत राहिले. पण यावेळी त्यांची तीव्रता कमी झाली होती. झोपडीच्या भिंतीला असलेल्या एका भोकातून बाहेर बसलेला क्लार्क आतला सारा प्रकार पाहत होता. नंतर मिझर्व्हने झोपडीत जाण्यासाठी म्हणून त्याचे नाव पुकारले तेवढा एक सेकंदच क्लार्कच्या चेहऱ्यावर थोडीशी अवकळा दिसली. पण तो झोपडीतून बाहेर आला तो चित्कार करीतच. म्हणाला, 'मी तिच्या गळयाशीच सुरी धरली आणि त्याने शिकार करावयाची एक १० इंच लांबीची सुरी सर्वांना दाखवली. इतरांना अर्थातच ती सुरी माहितीची होती. कारण क्लार्कच्या मित्राने नुकतीच ती त्याला दिली होती. नंतर मॅन्युएल झोपडीत गेला. आता माओचे कण्हणे जवळजवळ नाहीसे झाले होते. जणू तिची आवाज करण्याची प्रतिकारशक्तीही खलास झाली होती.

हा एकूण प्रकार सुमारे दीड तास चालू होता. तो संपल्यावर सगळे सैनिक एकदम झोपडीत शिरले. आजूबाजूला व्हिएतकाँग असल्यास त्यांच्या दृष्टीस आपण पडता कामा नये याची जाणीव त्यांना झाली होती. आता एरिकसन त्यांच्यासमवेत होता. माओ एका कोप-यात अंग दुमडून बसली होती. तिचा चेहरा भयकाकुल होता. डोळे पाण्याने डबडबले होते. सकाळपासून तिचा खोकला वाढला होता आणि मधूनमधून तिला येणाऱ्या खोकल्याच्या उबळीनेच सर्वांचे लक्ष तिच्याकडे जात होते. तिच्या अंगात आता कपडे होते. तिचे हातही सोडण्यात आले होते. पुन्हा एकदा या सर्वांनी फराळ करून घेतला. तिला कोणीच काही दिले नाही. खाता खाताच त्यांच्या एकेकाच्या आठवणी सांगणे सुरू झाले. प्रत्येकजण आपल्याला पूर्वी भेट-लेल्या अशाच पोरीपेक्षा माओ कशी वेगळी आहे हे सांगत होता. त्यामध्ये बहुधा माओविषयी अधिक्षेपच होता. प्रत्येकाने आपल्याला किती दिवसात स्त्रीसुख मिळाले नव्हते हेही सांगितले. अशीच २० मिनिटे गेली आणि मिझ-र्व्हला या विषयाचा कंटाळा आला असावा बहुधा. कारण त्याने सर्वांना आपण कोणत्या कामगिरीवर आलो आहे याची जाणीव करून दिली. पुन्हा एकदा सर्वांनी बाहेर जाऊन आजूबाजूचा प्रदेश व्हिएतकाँग गनिमांचा शोध घेण्याच्या दृष्टीने धुंडाळावा असे त्याने सांगितले. यावेळी क्लार्कला झोपडीवर लक्ष ठेवण्या-साठी मागे राहण्यास त्याने सांगितले.

आणि ती दुपार लक्षात राहण्या-

सारखी ठरली. मिझर्व्हे, रेफ, मॅन्युएल आणि एरिकसन पुढे डोंगर धुंडाळण्यासाठी गेले. काही ठिकाणी सहासहा फूट उंच गवतातून त्यांचा मार्ग जात होता. एवढ्यात त्यांना खालच्या बाजूस ओढ्याच्या काठावर तीन व्हिएतनामी दिसले. त्यांच्या अंगावर गणवेष नव्हता. ते व्हिएतकाँग आहेत असे समजून या चौघांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या पण त्यामध्ये कोणीही जायबंदी झाले नाही. मिझर्व्हेने प्लटून अधिकाऱ्यांना बिनतारी संदेश देऊन मदतीसाठी आर्टिलरी मागवून घेतली आणि ही मदत धाडण्यात येत आहे असे अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले. मिझर्व्हेलाही बरे वाटले. कारण यामुळे त्याच्या कामगिरीचे महत्व सिद्ध होणार होते.

त्या तिघा व्हिएतनामींच्या अधिक जवळ जाण्याचे मिझर्व्हेने ठरविले आणि धुराची आणखी काही नळकांडी आणण्यासाठी त्याने एरिकसन व रेफ यांना झोपडीकडे पाठवले. त्या दोघांनी झोपडीजवळ येऊन क्लार्कला सारी परिस्थिती सांगितली. त्याच्या अंगात एकदम उत्साह संचारला. त्याने एरिकसनला झोपडीत राहण्याचा आदेश दिला व तो स्वत: रेफबरोबर जाण्यास निघाला.

एरिकसन म्हणतो, 'त्या तिघा व्हिएतनामींबरोबरच्या संभाव्य चकमकीतून माझी मुक्तता झाली होती. परंतु माओबरोबर एकटे राहण्याच्या नव्याच संकटात मी सापडलो होतो. माओशी कसे वागायचे, तिला तोंड कसे दाखवायचे हेच मला समजेनासे झाले होते. माझा नि तिचा परिचय नव्हता पण ती फार पूर्वीपासून माझ्या ओळखीची आहे असे वाटू लागले होते. तिचे दु:ख मी पाहिले होते, तिचे रडणे मी ऐकले होते आणि म्हणूनच आजपर्यंत कधीही अनुभवला नव्हता, असा गोंधळ माझ्या मनात निर्माण झाला होता. मी चक्रावून गेलो होतो. अत्याचार होत असता वेळचे तिचे रडणे मी ऐकले होते आणि तेव्हा मनात इतकी चीड निर्माण झाली होती की एकदा वाटले, या सगळ्यांना गोळ्या घालून ठार करावे. पण मग मला त्या चार प्रेतांचा हिशेब, त्याचे समर्थन वरिष्ठांना द्यावे लागले असते.'

त्या वेळच्या आपल्या मन:स्थितीचे कोर्टात वर्णन करताना त्याने सांगितले होते, 'त्या परिस्थितीत मी सापडलोच नसतो तर बरे झाले असते असे मला वाटत होते आणि मी परमेश्वराजवळ सारखा वायदा करीत होतो की, येथून जर मी जिवंत बाहेर पडलो तर या चौघांना त्यांच्या कृत्याबद्दल शिक्षा व्हावी यासाठी मी लागतील ते सारे प्रयत्न करीन.'

एरिकसन सांगतो, 'मला झोपडीत येताना माओने पाहिले आणि तिला बहुधा वाटले की, मी पण आता तिच्यावर बलात्कार करणार. तिने एकदम रडण्यास प्रारंभ केला व माझ्यापासून शक्य तितके दूर जाण्याचा प्रयत्न केला. ती अतिशय थकलेली आणि आजारी दिसत होती. मिनिटामिनिटाला तिचा

थकवा वाढत असावा इतक्या झपाट्याने तिची प्रकृती खालावत होती. मला वाटले, तिला कोठेतरी जखम झाली असावी. मी तिला थोडे खाण्याचे पदार्थ दिले. पहाटे तिच्या झोपडीतून निघाल्यापासूनचे हे तिचे पहिले खाणे. तिने उभ्याउभ्याच ते खाल्ले. तिचे मुसमुसणे चालूच होते. ती सारखी माझ्याकडे पाहत होती. मी पुढे काय करणार? कशासाठी माझे हे प्रलोभन आहे, हेच चाचपण्याचा तिचा प्रयत्न तिच्या नजरेतून दिसत होता. खाणे संपल्यावर ती व्हिएतनामी भाषेत काही म्हणाली. बहुधा ते आभारप्रदर्शक उद्‌गार असावेत. मी तिला इंग्रजीत म्हटले, 'तुझे बोलणे मला समजत नाही.' मला तिला बरेच काही सांगायचे होते. जे काही झाले त्याबद्दल तिच्याशी दिलगिरी व्यक्त करायची होती. मात्र तिने ही दिलगिरी स्वीकारावी किंवा त्यांनी असे का केले म्हणून मला विचारावे असे मला मुळीच वाटत नव्हते. मला सारखे वाटत होते की, आम्हाला दोघांना एकमेकांशी बोलता आले असते तर किती बरे झाले असते! मी तिला विचारले असते की, मी जर तुला सोडून दिले तर तू एकटी सुखरूप घरी जाशील का? कदाचित तिने तिला कशी मदत करावी हेही सांगितले असते. तिचा जीव धोक्यात होता आणि मला काय ते करायचे होते.

सारखे तिच्यासमोर नको. थोडा एकट्यानेच विचार करावा म्हणून मी बाहेर आलो आणि मला दूरवर तोफांचा आवाज ऐकू आला. माझे पथक कोठे आहे हे मला ठाऊक नव्हते. ही धुमश्चक्री झोपडीपासून ४०० मीटर दूर, हिल-१९२ च्या उंच उंच शिखरावर चालू आहे याचीही कल्पना मला त्या वेळी आली नाही. ती माहिती मिळाली असती तर कदाचित त्या वेळच्या माझ्या विचारांची दिशा बदललीही असती पण मला नक्की सांगता येत नाही. एक शिस्तबद्ध सैनिक म्हणून मला झोपडीमधील दारुगोळा व शस्त्रास्त्रे तशीच टाकून जाता येणे शक्यच नव्हते. पण त्याचबरोबर माओला वाचवायचे कसे, हा विचार मला बेचैन करीत होता. पुन्हा एकदा मला वाटले की तिला जाऊ द्यावे. पण मिझर्व्ह परतला की त्याला मी काय उत्तर देणार होतो? या दुबळ्या, खोकल्याने बेजार मुलीने मला गुंगारा दिला असे सांगणे शक्यच नव्हते. शिवाय ती सुखरूप घरी किंवा इतर कोठेही जाईल अशी तिची प्रकृती नव्हती. मग एकदा विचार आला की तिला घेऊन आपणच येथून सटकावे. परंतु अशा स्थितीत आम्हाला फार दूरही जाता आले नसते. ती रात्र अशीच कोठेतरी लपून काढावी लागली असती. त्यानंतरचा दिवसही आम्हाला असाच लपूनछपून काढावा लागला असता. कामगिरीच्या तिसऱ्या दिवशी आमच्या पथकाला दुसऱ्या एका पथकाकडून शस्त्रास्त्रे व दारुगोळ्याचा आणखी पुरवठा मिळायचा होता. ही भेट केव्हा व कोठे होणार हे मला ठाऊक होते. त्या ठिकाणी व त्या वेळेस



जर मी माओला घेऊन हजर झालो तर...? पण पुन्हा त्या नवीन पथकातील लोक आम्हा दोघांना मदत करतील किंवा नाही हा प्रश्न होता. माझ्या मनात नुसते वादळ उठले होते. माझ्या सहकाऱ्यांच्या कृत्यात सहभागी न होऊन माझी मलाच मी शिक्षा करून घेतली होती. मी एकटा पडलो होतो. माओबरोबरच्या माझ्या वर्तनात जराशी चूक झाली असती तरी माझ्या सहकाऱ्यांनी आमच्यावर गोळ्या घातल्या असत्या किंवा सैन्यातून पळून गेल्याचा आरोप मिझर्व्हने माझ्यावर लादला असता. इतरांनी अर्थातच त्यालाच साथ दिली असती. ते म्हणाले असते की पथकाबरोबर कधी मुलगी नव्हतीच आणि मी वेडा ठरलो असतो.

'मी पुन्हा झोपडीत गेलो. आता बहुधा माओच्या मनात माझ्याविषयी विश्वास उत्पन्न झाला असावा. तिचे मुसमुसणे बंद झाले होते. तिच्या डोळ्यातूनही माझ्याविषयीचा विश्वास प्रकट होत होता. पण तो विश्वास तिच्या मनात निर्माण होऊ नये असेच आता मला वाटू लागले होते. कारण तिच्यासाठी मला कोणतीही गोष्ट करता येण्यासारखी नाही असेच माझे आता मत झाले होते. तसा निर्णय घेऊन मी मनातले वादळ तरी शमविले होते निश्चित.'

एरिकसन पुढे म्हणतो, ' पथकातले माझे सहकारी परत येईपर्यंत माओची प्रकृती आणखीच बिघडली. तिला ताप चढला होता. तिचा खोकला वाढला होता. तिला आजच मारून टाकावे असे क्लार्कने सुचविले. परंतु मिझर्व्हने त्याला जरा धीर धरण्यास सांगितले. रात्रीच्या विश्रांतीनंतर ती पुन्हा ताजीतवानी होईल असे तो म्हणाला.'

रेफने कोर्टात सांगितले, 'त्या दिवशी मिझर्व्ह फार खुष होता. एकाच दिवशी तोफखान्याची मदत घ्यावी लागण्याइतपत महत्वाची कामगिरी त्याच्या हातून पार पडली होती व त्याला बाईही मिळाली होती.'

मग रात्रीच्या पहाऱ्याची व्यवस्था ठरवून सर्व मंडळी झोपेच्या मार्गी लागली. माओ एका कोपऱ्यात झोपली होती. बाकी सैनिकांनी झोपडीतच आपले बिस्तरे टाकले. एकेकाने आळीपाळीने बाहेर पहारा द्यायचा होता. माओला खलास करून टाकावे असे पुन्हा एकदा क्लार्कने सुचविले. तो म्हणाला की तिच्या सारख्या खोकण्यामुळे कदाचित शत्रूला आपला सुगावा लागेल. खरे तर त्याला शत्रूचे भय नव्हते. पण आपल्या पापाचा जिता जागता पुरावा त्याला डोळ्यासमोर नको होता.

सकाळी सहाच्या सुमारास, सगळे उठले आणि त्यांनी माओचे भवितव्य ठरविले. एरिकसन सांगतो. त्या दिवशी घटना झपाट्याने घडत गेल्या. माओ सकाळी उठली तर तिचा ताप चांगलाच वाढला होता. मिझर्व्हचे तिच्याकडे लक्षच नव्हते. त्याला आता लष्करी कारवाईची ओढ लागली होती. आणि त्यासाठीच त्याने वेगाने सारी आवराआवर करायला घेतली. एरिकसन, रेफ व मॅन्युएल यांना दिवसभरासाठी लागणारे पाणी आणण्यासाठी त्याने खालच्या बाजूस असलेल्या ओढ्यावर पाठविले आणि ते तिघे परत येऊन पाहतात तो मिझर्व्हही माओला शक्य तितक्या लवकर खतम करायची भाषा बोलू लागला होता. दिवसभरात चकमक उडालीच तर तिचा उगाचच अडथळा मात्र होईल असे त्याचे म्हणणे होते आणि तो हे सांगत असताना माओ एका बाजूला गप्पगार बसली होती. या लोकांची काय चर्चा चालू आहे ते समजावून घेऊ पाहत होती. जरी चकमक उडाली नाही तरी पथकाबरोबर माओला ठेवणे धोक्याचेच होते. त्या भागातून फिरणाऱ्या अमेरिकन हेलीकॉप्टर्सच्या हे लक्षात येणे शक्य होते.

शेवटी तिला ठार मारण्याचा निर्णय करण्यात आला. मिझर्व्हला वाटत होते की हे काम एरिकसनने करावे. एवढेच नव्हे तर त्याने पुढे असाही दम दिला की एरिकसनने या गोष्टीस नकार दिल्यास त्यालाच मारण्यात येईल व तो 'कारवाईत ठार झाला,' म्हणून जाहीर करण्यात येईल. तरीसुद्धा एरिकसनने या गोष्टीला नकारच दिला.

मिझर्व्हने धमकी दिली होती, तसा तो वागला मात्र नाही. उलट त्याने, रेफ व मॅन्युएल यांना माओला ठार

करण्याचा आदेश दिला. दोघांनीही नकार दिला. एरिकसन सांगतो: 'त्यांच्या नकाराने मला आश्चर्य वाटले व दिलासाही मिळाला.'

एवढ्या वेळपर्यंत अधीरपणे हे सारे बोलणे ऐकणाऱ्या क्लार्कने स्वतःच हे काम करायची तयारी दर्शवली. पण मिझर्व्हला, त्याने एकट्याने हे काम करावे असे वाटत नव्हते. दोघांचा या कामी हात असला पाहिजे अशी त्याची भावना होती. म्हणून त्याने सुचविले की, क्लार्कने पुढच्या बाजूने माओच्या पोटात सुरी खुपसावी; त्याचवेळी तो स्वतः मागच्या बाजूने तिच्यावर बायोनेट चालवील. नंतर प्रेत एकाद्या उंच टेकाडावरून खाली टाकून द्यावे. त्याप्रमाणे सकाळी ९ वाजता सगळ्यांनी टेकाडाच्या दिशेने प्रवास सुरू केला. मिझर्व्ह व बिनतारी संदेशवहन यंत्रणा वाळगणारा मॅन्युएल पुढे चालले होते. क्लार्क व माओ मागून. त्यांच्याच मागे-पुढे एरिकसन व रेफ हे होते. प्रत्येकाचे ओझे यावेळी प्रत्येकाजवळ होते.

चढाव चढून जाण्यास जवळजवळ एक तास लागला. एवढ्यात रेफला, खालच्या बाजूने शेतकऱ्याच्या वेषातील पाच व्हिएतनामी नाल्याच्या बाजूच्या शेताकडे जाताना दिसले. प्रत्यक्षात ते शेतकरी नव्हते, व्हिएतकाँग गनीम होते. कारण त्यांच्या नजरेस ही मंडळी येताच त्यांनी टेहळणी पथकावर गोळीबार सुरू केला व काही क्षणातच रस्ता बदलून ते दाट झुडपात नाहीसे झाले. मिझर्व्हने लगेच बिनतारी यंत्रणेने प्लटूनचा अधिकारी लेफ्ट. रिली याच्याशी संपर्क साधला व गनिमांचा शोध घेतला पाहिजे असे सुचविले. लेफ्टनंटने लगेच मान्यता दिली व 'डोंगरतळाशी असणाऱ्या दुसऱ्या दोन पथकांना (स्क्वाड) मदतीला येण्यास सांगतो, त्याचप्रमाणे आणखीही दोन पथके मदतीला पाठवून देतो' असे सांगितले. त्याशिवाय काही वेळात रॉकेट, आर्टिलरी व मशीनगन्स यांनी सुसज्ज हेलिकॉप्टर्सही पाठविण्याचे रिलीने मान्य केले.

एरिकसन सांगतो: ही एकदम फारच मोठी कुमक येणार होती. व्हिएतकाँग गनीम फार थोडे असावे. इतर वेळी आपल्या कारवाईला एवढे महत्व मिळाले म्हणून मिझर्व्हला आनंद झाला असता पण त्यावेळी आमच्याबरोबर माओ असल्याने तो जरा गोंधळात पडला.

पण लगेच त्याने निर्णय केला. एरिकसन व रेफ यांना त्याने कड्यावर माओबरोबर राहण्यास सांगितले आणि तो स्वतः क्लार्क व मॅन्युएलसह गनिमांचा मार्ग रोखण्यासाठी कडा उतरू लागला. ते तिघे वीस एक मीटर अंतर गेले असतील तोच त्यांना एका छान मोठ्या दगडाचा आडोसा मिळाला. येथून खालचा सारा भाग त्यांच्या नजरेत येत होता. येथूनच त्यांना व्हिएतकाँग गनिमांचे एक पथक डोंगराळ भागातील गुहांच्या दिशेने हळूहळू जाताना दिसले. दरीच्या अगदी तळाला तीनएकशे मीटर अंतरावर त्यांच्या गुहा

असाव्या. कुमक यायची असल्याने मिझर्व्हने पळून जाणाऱ्या गनिमांच्या दिशेने काहीच हालचाल केली नाही. अगदी दूरवर हेलिकॉप्टर्स अस्पष्टशी दिसतही होती. उलट, त्याने मॅन्युएलला मागे पाठवून रेफ, एरिकसन व माओ यांना घेऊन येण्यास सांगितले. दहा मिनिटातच सारी मंडळी पुन्हा एकत्र आली. दरम्यान हेलिकॉप्टर्स आता स्पष्ट दिसत होती. पण तरीही ती बरीच दूर होती. त्यांच्या इंजिनाचा आवाजही अस्पष्टसा ऐकू येत होता. रेफने नंतर सांगितले की, 'केवळ जवळ येणाऱ्या हेलिकॉप्टर्समुळे त्या मुलीचे काय ते झटपट करावे असे सगळ्यांनाच वाटू लागले होते.'

मिझर्व्हने काही बोलण्यापूर्वीच क्लार्कने मुलीचा हात घट्ट पकडला व ठामपणे म्हटले, 'तिला मारून या प्रकरणाचा एकदा निकाल लावून टाकतो.' मिझर्व्हने संमती दर्शविली व त्याने आपले सारे लक्ष शत्रूंविरुद्धच्या कारवाईत गुंतविले. एरिकसनला त्याने खालच्या दगडाच्या आडोशाला बसविले, स्वत: मॅन्युएलसह वरच्या दगडाच्या मागे बसला, पिछाडीची बाजू त्याने रेफकडे सोपवली.

क्लार्कच्या ताब्यात माओ होती व त्याच्या सर्वात जवळ काही अंतरावर रेफ होता. आपल्यासमोर घडलेल्या घटना नंतर सुनावणीत सांगताना रेफ म्हणाला, 'क्लार्कने त्या मुलीला दंड धरून पकडले व तिला घेऊन तो झुडपात गेला. त्याच्या दुसऱ्या हातात त्याचा शिकारी सुरा होता. तो त्या मुलीला मात्र दिसत नव्हता. काही सेकंदातच झुडपातून घुसमटल्याचे आवाज ऐकू आले, नंतर त्या मुलीने एक किंकाळी फोडली. पण ती फार मोठी नव्हती. थोड्याच वेळात क्लार्क बाहेर आमच्या जवळ आला. मुलीचा निकाल लावलास का? असे मिझर्व्ह विचारतो आहे न आहे तोच झुडपातून सरपटत सरपटत माओ बाहेर आली. तिच्या जखमेतून रक्त घळघळा वाहत होते. तशीच सरपटत ती बाजूच्या घनदाट झुडपात नाहीशी झाली. मिझर्व्ह एकदम ओरडलाच, 'अरे, ती बघ, ती पळते आहे.' क्लार्कने एक शिवी हासडली व म्हणाला, 'साले दोन वार केले होते मी तिच्यावर!'

मिझर्व्हने मग आम्हा सगळ्यांना तिचाच शोध घेण्यास सांगितले. पाची जणांनी गोळीबार केला. एरिकसनने माओ गेली त्या दिशेने गोळी चालवली एवढेच. बाकी सगळ्यांचा, हालचाल कोठे होते ते टिपण्याचा प्रयत्न होता. अशाच प्रयत्नात रेफची एम-१६ निकामी झाली. आपल्या समोरच्या झुडपात हालचाल झालेली पाहून त्याने क्लार्कला तेथे नेम धरून गोळी चालविण्यास सांगितले. क्लार्कने एम-१६ मधून एक दणका लावला. क्षणार्धात झुडूप शांत झाले. रेफने पुढे होऊन झुडपात पाहिले. माओच्या शिराच्या चिंधड्या उडाल्या होत्या. एवढ्यात क्लार्क दुरून ओरडला, 'काय रे, तिचा सोनेरी दात शोधतो आहेस काय?'

एक सेकंद सगळेच सुन्न झाले. आपण काय केले, याचा विचारसुद्धा त्यांना नको होता. तो विचारच झटकून टाकण्यासाठी सगळे आपल्या नेत्याभोवती जमले व पुढील लष्करी कारवाईचा विचार करू लागले. एका मोठ्या चकमकीची पूर्वसिद्धता होत होती. तोफाधारी हेलिकॉप्टर्स त्या भागात येऊन पोचली होती. त्यांचा प्रचंड आवाज वातावरण भेदून टाकत होता. शत्रूला टिपण्यासाठी ती खाली खाली येत होती, तसा तो आवाज भेसूर वाटत होता. एवढ्या मोठ्या हल्ल्याची चिन्हे पाहून गनीम आता पळ काढू लागले. मागे जाता जाता ते उगाचच मधून मधून फैरी झाडत होते. पण नाल्याच्या दोन्ही बाजूंनी त्यांचा रस्ता हळूहळू बंद केला जात होता. दरम्यान तोफखान्याला संरक्षण पुरविणारी छोटी विमानेही आकाशात येऊन धडकली. याचा अर्थ भूदलाचा तोफखानाही येत होता तर !

या सगळ्या रणधुमाळीत मिझर्व्हेने रिलीशी पुन्हा संपर्क साधला व एक व्हिएतकाँग गनीम मुलगी नजरेत आल्याचे कळवले. लेफ्टनंट रिलीने सुनावणीच्या वेळी सांगितले की, 'एक मुलगी पळून जात असल्याचे मिझर्व्हेने मला कळवले. तिला पकडण्याच्या मी सूचना दिल्या. काही मिनिटातच मिझर्व्हेने पुन्हा माझ्याशी संपर्क साधून कळविले की त्या मुलीला ते पकडू शकले नाहीत. तिला गोळी घालावी लागली...मी, पुन्हा त्याच्याशी संपर्क साधून त्याने केलेल्या कामगिरीबद्दल व ती वेळीच मुख्य कचेरीला कळविल्याबद्दल त्याचे कौतुक केले.'

माओची अडचण दूर झाल्याने त्यानंतर त्या दिवशी मिझर्व्हे चांगला लढला. इतर पथकांच्या बरोबर त्याने आपल्या टेहळणी पथकाच्या सुयोग्य हालचाली केल्या. हेलिकॉप्टर-तोफा आल्याबद्दल आता त्याला बरे वाटत होते. पाच गनिमांपैकी एक ठार झाला, दोघे जखमी झाले, दोन पळाले व एक गुहेत आसरा घेऊन लढू लागला. एरिकसनने सांगितले की, त्याच्यावर तो गनिम गुहेतून पळून जात नाही ना यावर, विशेषत: गुहेच्या दोन तोंडावर नजर ठेवण्याचे काम होते. ग्रेनेड फेकायची बंदूक त्याच्या हाती होती. गुहांच्या दिशेने लढाई चालू असतानाच रेफ एका उतारावरून घसरून खाली पडला व त्याच्या खांद्याचे व हाताचे हाड सरकले. लगेच एका हेलिकॉप्टरने त्याला क्वी व्हॉन येथील रुग्णालयात हलविले. तेथेच त्याच्या आधीच्या ओळखीचा एक अधिकारी होता. त्याच्याशी रेफने तेथे नंतरच्या दिवसात अनेक विषयांवर, या मोहिमेवरही गप्पा मारल्या, पण माओचा उल्लेख मात्र कधी केला नाही. रेफने नंतरच्या तपासणीत सांगितले की, 'इतर कोणी—एरिकसन वगैरे—या प्रकरणाचा पुढे तलास काढणार आहे हे मला माहीत नव्हते. त्यामुळे मी ती गोष्ट त्या अधिकाऱ्यास सांगितली नाही. मिझर्व्हे व क्लार्क पुढे काय करणार आहेत हेही मला ठाऊक नव्हतं.'

त्या खोऱ्यातील लढाई नंतर काही तास चालली. रात्र पडल्यावर चढाई थांबवण्यात आली. गुहेतील सैनिकाने पाच अमेरिकनांना जखमी केले होते. त्यांच्यापैकी एक तर अगदी गुहेच्या तोंडाशीच आडवा पडला होता. गुहेतून सारखा गोळ्यांचा भडिमार होत होता. पण तशाही परिस्थितीत मिझर्व्हने सरपटत सरपटत जाऊन त्या जखमी सैनिकास उचलून आणले. या त्याच्या कामगिरीबद्दल नंतर त्याचे नाव ब्रॉंझ स्टारसाठी सुचविण्यात आले.

एरिकसनला त्याची ग्रेनेड बंदुक चालवावीच लागली नाही आणि तो म्हणतो, 'की ते बरेच झाले. कारण माझे अवधान माओमध्ये गुंतले होते. एकीकडे घनघोर धुमधडाका चालू असताना मला सारखे वाटत होते की, मी जर हे प्रकरण पुढे तडीस नेले नाही तर माओचा खून हे कायमचे गूढच राहील. तिचे काय झाले हे कधीच, कोणालाही कळणार नाही. मी, फक्त मीच त्या रहस्याचा भेद करू शकत होतो. बाकीच्या सगळ्यांनी तिच्यावर बलात्कार केला होता. तिच्या खुनामध्ये ते सहभागी होते. त्याचबरोबर माओच्या खुनाला वाच्यता फोडल्याखेरीज माझ्या मनाला शांती लाभणार नाही असेही मला वाटत होते. दुसरे मी करू तरी काय शकणार होतो ?'

व्हिएतकाँग गनीम होते फक्त पाचजण. सगळ्याच दृष्टींनी अमेरिकन पथक त्यांच्यापेक्षा वरचढ होते. तरीसुद्धा गनिमांनी घनघोर लढत दिली. यामुळे मिझर्व्हच्या पथकाजवळचा दारूगोळा संपत आला. यामुळेच त्याला आपल्या पथकाची पाच दिवसांची कारवाई मध्येच थांबवून परतावे लागले आणि येथून या माओ-प्रकरणाला अगदीच निराळे वळण मिळाले. एरिकसन सांगतो, 'प्लटूनच्या मुख्य छावणीत मी आल्यावर मला हायसे वाटले. दोन दिवसांच्या सततच्या विचारांनी डोकं सुन्न होऊन गेलं होतं. पण पथक पुन्हा त्या भागात लगेच जाण्याची शक्यता होती म्हणून मला लवकर काहीतरी करायला हवं होतं. मला फक्त झाला प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर घालायचा होता. पुढे अत्याचार-खून याबद्दल मिझर्व्ह आणि कंपनीला करावयाची शिक्षा अधिकाऱ्यांनी ठरवायची होती. याबाबतीत मुलकी व लष्करी कोर्टाचे नियम वेगळे असण्याची शक्यता नव्हती.'

एरिकसनने प्रथम आपला मित्र कर्ली रोवानला शोधून काढले व त्याला माओची कहाणी ऐकवली. रोवानने लगेच हालचाल सुरू केली. त्याने ती हकीगत आपल्या सार्जंटच्या मार्फत लेफ्टनंट रिलीकडे पोचवली. लगेच रिलीने एरिकसनला बोलावणे पाठवले. एरिकसनला जसे हवे होते तसे प्रारंभी तरी घडले नाही. त्याने सांगितलेल्या प्रकाराकडे रिलीने आणखी वेगळ्याच नजरेने पाहिले. माओच्या खुनाबद्दल त्याने जराही दुःख, खेद व्यक्त केला नाही. उलट एरिकसन सांगतो : 'मी रिलीच्या कचेरीत गेलो. त्याने एक-दोन

सेकंद माझ्याकडे नुसते पाहिले, ते पाहणे माझ्याकडे नव्हते. जणू तो दूर कोठेतरी पाहत होता आणि ते खरेच होते. त्याने तोंड उघडले ते त्याच्या आयुष्यातला एक जुना प्रसंग सांगण्यासाठी. तीन वर्षापूर्वीची गोष्ट होती ती. त्याच्या पत्नीला (तीही निग्रोच आहे) प्रसुती-वेदना होऊ लागल्या, म्हणून तो तिला घेऊन अल्बामाच्या एका प्रसुतीगृहात गेला. पण ती बाई काळी म्हणून तिला गृहात ठेवून घेण्यास नाकारण्यात आले. या वेळपर्यंत त्याच्या पत्नीची स्थिती फारच कठीण झाली होती व ती रुग्णालयाच्या दरवाजातच प्रसूत झाली. रिली संतापला व त्याने प्रसुतीगृहात धांगडधिंगा घालण्यास सुरुवात केली. अधिकाऱ्यांनी पोलिसांना बोलावले. रिलीला अटक करण्यात आली. नंतर त्याला कैदेची शिक्षा झाली. प्रसुतीगृहाच्या साऱ्या अधिकाऱ्यांना मारून टाकावे असा विचार प्रारंभी रिलीच्या मनात आला. पण नंतर त्याने सुडाची भाषा टाकून दिली. कारण? येतील त्या गोष्टी आपल्याला तशाच भोगाव्या लागतात हे निश्चित आहे. मग समाजात जी एक व्यवस्था लागलेली असते ती का मोडायची?'

रिलीने एरिकसनला सांगितले की, 'युद्धात तर असे काही मुळीच करू नये. कारण येथे माणूस अधिक बांधलेला असतो. त्या व्हिएतनामी मुलीला विसरून जाणे हेच श्रेयस्कर.'

मिझर्व्हेचे पथक नवा दारूगोळा घेऊन पुन्हा टेहळणीवरील उर्वरित कामगिरी करण्यास जाणार होते. रिलीनेच ही गोष्ट एरिकसनला सांगितली. एरिकसनला मात्र या कामगिरीतून वगळचात आले होते.

मात्र पुढे कोर्टात जे निष्पन्न झाले त्यावरून रिलीने ते प्रकरण तेथेच संपवले नाही. त्याला ते शक्यही नव्हते. साऱ्या रेजिमेंटच्या इभ्रतीचा प्रश्न होता तो. चुकून जरी ही गोष्ट जगजाहीर झाली असती तरी मिझर्व्हे-क्लार्क यांच्या वर्तनाबद्दल त्यांच्याइतकेच जबाबदारी प्रमुख अधिकाऱ्यांवर आली असती. रिलीच्या वरचा अधिकारी कॅप्टन ओटो व्होर्स्ट त्या वेळी युद्धक्षेत्रात होता आणि तेवढाच गंभीर स्वरूपाचा संदेश असेल तरच तो माझ्याकडे पाठवा अशी त्याची सूचना होती. दि. २२ नोव्हेंबरपर्यंत तो परतणार नव्हता. मिझर्व्हेची मोहिमही त्याच दिवशी संपायची होती. पण रिली त्या दिवसापर्यंत थांबला नाही. त्याने लगेच बिनतारी यंत्रावरून व्होर्स्टला ती हकीगत कळवली. त्यातही गंमत अशी की, व्होर्स्टला ती आधीच माहित होती. एरिकसनने ती त्यांना सांगितली होती. मिझर्व्हेच्या पथकातून बाहेर पडल्याच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी एरिकसनकडे युद्धक्षेत्रातली एक कामगिरी सोपवण्यात आली होती. या कामगिरीवर असताना त्याला दुसरे जे एक अमेरिकन सैनिकी पथक भेटले त्यामध्ये साक्षात व्होर्स्टच होता. केवळ काही मिनिटांची ती भेट होती. पण ती संधी साधून एरिकसनने माओची हकीगत व्होर्स्टच्या कानी घातली.

दि. २२ नोव्हेंबरला मिझर्व्हे, क्लार्क आणि मॅन्युएल आपली पाच दिवसांची मोहीम संपवून, थकून भागून परततात तोच त्यांना कॅप्टन व्होर्स्टे यांच्यासमोर उभे राहण्याचा हुकूम मिळाला. रेफ अजून रूग्णालयात होता.

व्होर्स्ठेबरोबर झालेल्या मुलाखतीची हकीगत नंतर कोर्टात मॅन्युएलने सुसंगत रीत्या सांगितली ती अशी : " दुपारच दोनचा सुमार असावा. मिझर्व्हे, क्लार्क व मी असे आम्ही तिघे कॅप्टन व्होर्स्टे-समोर उभे राहिलो. त्याने मिझर्व्हेच्या हाती एक कागद दिला. त्यावर लिहिले होते—पळविणे, बलात्कार करणे व नंतर खून. तिघांनी तो कागद पाहिला. मग व्होर्स्टेने आम्हा प्रत्येकाला विचारले की याबाबत आम्हाला काही माहित आहे का ? प्रथम आम्हो तिघांनी नकारच दर्शविला. मग त्याने मिझर्व्हेकडे वळून ठासून विचारले, तुला या प्रकाराची काही माहिती आहे ? मिझर्व्हे उलट म्हणाला, तुम्ही कशाबद्दल बोलता आहात ? मग त्याने तोच प्रश्न पुन्हा आम्हा तिघांकडे पाहून केला, तुम्ही तिकडे काय भयंकर प्रकार करून ठेवला आहे याची जाणीव तरी आहे का तुम्हाला ?

" मग कॅप्टन व्होर्स्टेने मला विचारले, याचा परिणाम काय होईल माहित आहे का ? मी उत्तरलो, पोटात बंदुकीच्या गोळया; बहुधा. मग व्होर्स्टे तसेच काही बोलला. कोर्ट मार्शल करण्यासंबंधी त्याचे बोलणे चालले होते. पण त्याचा शेवट आम्हाला गोळया घालून ठार मारण्यात होणार हे सगळ्या बाबतीत सत्य होते. तो म्हणाला, तुम्ही जनावरासारखे वागला. माणूस म्हणून जगण्याला तुम्ही लायकच नाही.

' पुढे त्याने, एरिकसनने सांगण्याचे धाडस केले म्हणून तर आम्हाला हा प्रकार कळला, असे सांगून सज्जड दम दिला की, एरिकसनला काही झाले तर याद राखा. '

व्होर्स्टेने मग ते पथकही विभक्त करून टाकले. रेफचा प्रश्नच नव्हता. क्लार्कला बटॅलियनच्या मुख्य कचेरीत काम देण्यात आले. मिझर्व्हेची दुसऱ्या प्लॅटूनमध्ये बदली झाली. एकटचा मॅन्युएलचाच आला तर एरिकसनशी संबंध येण्याची शक्यता होती. त्याला त्याच प्लटूनमध्ये दुसऱ्या पथकात टाकण्यात आले होते.

हे तिघे व्होर्स्टेच्या कचेरीतून बाहेर पडल्यावर थोडयाच वेळात एरिकसन त्याला भेटण्यास आला. व्होर्स्टेने या तिघांना जामल्याचे एरिकसनला माहित नव्हते· कॅप्टन व्होर्स्टे याची या प्रकारामुळे द्विधा मन:स्थिती झाली होती. एकीकडे त्याची विवेकबुद्धी त्याला टोचत होती व त्यामुळे गुन्ह्याला शिक्षा झालीच पाहिजे असे वाटत होते. दुसरीकडे त्याला लष्करातील स्वत:च्या बढतीचा विचार होता. अर्थात ही त्याची मन:स्थिती त्यावेळी स्पष्ट झाली नाही. नंतर पुढे खटल्याच्या काळात एकेक गोष्टी उघडकीस आल्या. त्यामुळे यावेळी एरिकसन भेटीला आला तेव्हा, किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी रिलीच्या

उपस्थितीत त्यांची भेट झाली तेव्हा कॅप्टन व्होर्स्टने 'मी सगळे काही बघतो. तू काळजी नको करू.' असाच हवाला दिला. एरिकसनने नंतर सांगितले की: त्यांच्या या अशा उद्गारांनीच मी वैतागलो होतो. या प्रकरणाचा ते गांभीर्याने विचार करत आहेत असे मुळी मला वाटेचना. खून झाल्याबद्दल त्यांना चिंता वाटत नव्हती. त्यांना भीती वाटत होती, या प्रकरणाचा उगाचच (?) गाजावाजा होईल म्हणून! यामुळेच बहुधा कोर्ट मार्शल झाले तर माझी कशी दैना उडेल, त्यानंतर माझी बदली, व तीही कोठेही, होण्याची कशी शक्यता आहे याचे भयानक चित्र रंगवीत. मला परावृत्त करण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता का? ते मला शेवटपर्यंत कळले नाहीपण माझी भूमिका ठाम होती. माझी विवेकबुद्धी शाबूत होती. मला या प्रकरणाच्या निकाला खेरीज आणखी कशाची आकांक्षा नव्हती. त्या बैठकीत कॅप्टन होर्स्टने माझ्याकडून बदलीचा अर्ज भरून घेतला व मला पुन्हा एकदा दिलासा दिला की, 'मी सगळे काही पहातो. तु काळजी करू नको.'

व्होर्स्टकडून चार दिवसात काही कळले नाही तेव्हा एरिकसनने त्यांची भेट घेतली. त्या दोघांमधील हे शेवटचे बोलणे. यावेळी त्यांच्याबरोबर आणखी कोणी नव्हते. खून प्रकरणात पुढे काय झाले, असा प्रश्न सुरुवातीलाच एरिकसनने विचारला. परंतु व्होर्स्टने त्याला उत्तर न देता स्वतःच एका मागोमाग एक अनेक प्रश्न एरिकसनला विचारण्यास सुरुवात केली. या आरोपांचे प्रकरण तडीस लावून एरिकसन काय साधणार आहे? या व्हिएतनामी लोकांसाठी आधीच अमेरिकनांना सर्व दृष्टींनी किती मार खावा लागला आहे याची त्याला कल्पना आहे ना? चार सहकारी सैनिकांवर अशा प्रकारचे आरोप केल्याने त्यांना व त्याचबरोबर आपणा सर्वांना किती त्रास होणार आहे याची त्याला जाणीव आहे ना? ते चौघे दोषी ठरून त्यांच्यावर कोर्ट मार्शल झाले तर? लष्करी न्यायाधीश अशा प्रकारच्या आरोपात शिक्षा देताना अतिशय सौम्य शिक्षा देतात हे त्याला माहित आहे ना? लष्करातील न्यायाधीशांना, रणक्षेत्रात सैनिकांवर किती दडपण असते, त्यांची मनःस्थिती अशा वेळी काय असते याची त्यांना कल्पना असते, त्यामुळे ते सहसा अशा वेळी घडलेल्या गुन्ह्यांबाबतीत सहानुभुतीने पहातात हे त्याला ठाऊक आहे ना? युद्धक्षेत्रात सैनिकांकडून फारसे चांगले वर्तन अपेक्षित नसते, ते एका वेगळ्याच मनःस्थितीत असतात आणि तिचाही विचार लष्करी न्यायाधीश अशा खटल्यात करतात हे एरिकसनला माहित आहे ना? लष्करी न्यायालयातील एकूणच शिक्षा सध्या अतिशय सौम्य आहेत, त्या, त्या खटल्यांच्या पुनर्विचारात बऱ्याच वेळा त्या रद्दही होतात हे एरिकसनला ठाऊक आहे का? असे अनेक प्रश्न व्होर्स्टने उपस्थित केले. पुढे तो असेही म्हणाला की, या चौघांची वरच्या कोर्टात शिक्षा

रद्द झाली तर एरिकसनला काय वाटेल ? कदाचित त्यांच्यापैकी कोणी एरिकसनवर सूडही घेऊ पाहील !

पुढे कोर्टात एरिकसनने सांगितले, की "या आरोपींना बहुधा शिक्षा होणारच नाही. झालीच तर अगदी थोडी. पण त्यानंतर मी व माझे कुटुंब कायम धोक्यात राहील असे व्होर्स्टने मला शेवटी बजावले.'

माओच्या मृत्यूनंतरचा हा प्रकार चालू असताना व नंतरही काही आठवडे एरिकसन त्याच प्लॅटूनमधे होता. रोज दिवसा व्हिएटकाँग गनिमांचा शोध घ्यायचा व रात्री छापे घालायचे असा कार्यक्रम असे. हे अतिशय कष्टाचे व कायम सावध राहण्याचे काम होते. तरीसुद्धा एरिकसनच्या मनाला ग्रासू पाहणारे वैफल्य, निराशा त्यामुळे कमी झाली नाही. तो म्हणतो, रात्रीच्या रात्री मी जागा असे. जवळच्या जंगलांतून येणारे माकडांचे, पक्षांचे चित्रविचित्र आवाज कानात घुमत असत, आणि मन व्यग्र असे या जबरदस्त शिस्तीच्या लष्करी चौकटीचा भेद करण्यात. बलात्कार आणि खून किती भयंकर आरोप! मुलकी जीवनात जशी या आरोपाबाबत लगेच चक्रे हलू लागतात तशीच ती लष्करी यंत्रणेतही हलायला नकोत का? माझा तसा विश्वास होता. म्हणूनच तर ना मी त्या प्रकरणी वरिष्ठांकडे रीतसर तक्रार केली होती. पण लष्करात ही गोष्ट तुमच्या वरिष्ठाच्या मर्जीवर अवलंबून असते; किंवा वरिष्ठाला बगल देऊन प्रकरण पुढे रेटण्याचा तुम्हाला मार्ग काढावा लागतो.'

'ही लष्करी शिस्तच पुन्हा एकदा माओचा बळी घेणार होती; एकदा सार्जंट म्हणून मिझर्व्हच्या आज्ञा पाळणाऱ्या लष्करी शिस्तीच्या बांधील शिपायांनी तिचा बळी हिल-१९२वर घेतलाच होता. प्राथमिक शिक्षणातच ही शिस्त ते तुमच्या डोक्यांत घुसवतात. म्हणे, तुमच्या वरिष्ठांच्या आज्ञा पाळा. या वरिष्ठांची एक साखळीच असते, तीमध्ये गुंतवून घ्या. नाही तर गेलाच तुम्ही गाळात. या वरिष्ठांच्या साखळीमुळेच हे प्रकरण पुढे न रेटण्यातील सारा दोष मला व्होर्स्टवर टाकता येत नव्हता. कारण त्यालाही कोणी वरिष्ठ होता. मग या प्रकरणात रुकावट कोण आणत होता ? माझे मन मला सारखे छळत होते. पण दोष कुणाला द्यावा, खलनायक कोणाला ठरवावे हे कळत नव्हते. येथे कसली जबाबदारी कोणावर हा प्रश्नच नव्हता. जोपर्यंत प्रत्येक माणूस ठरवून मार्गाने काम करतो आहे, यंत्र चालू आहे. तोपर्यंत सारे आलबेल असते व या यंत्रणेतला प्रत्येक माणूस आपल्याला हवे ते करतो."

त्यातही एरिकसनला नामोहरम करणारी गोष्ट म्हणजे त्याच्या सहकाऱ्यांपैकीही कोणाला हे प्रकरण तेवढे गंभीर वाटत नव्हते. त्याच्या विचाराचा एकादा रोवान सोडला तर सारे एरिकसनलाच या प्रकरणी मूर्खात काढत होते. व्होर्स्ट किंवा रिली यांचे जे म्हणणे होते, तेच त्याच्या सहकाऱ्यांचेही म्हणणे होते. युद्धात हिंसा ही

अटळ आहे आणि तीवर अशा प्रकारचे नियंत्रण घालू असे म्हटल्याने ते शक्य होणार नाही. मग मिझव्हे व इतर मडळींवर आता दोषारोप ठेवायचे कशाला ? शिवाय, कोणीतरी एरिकसनला सांगे, व्हिएटकाँग गनीमसुद्धा मुलींना पळवतात, त्यांच्यावर अत्याचार करतात, नंतर त्यांना ठार करतात. मधूनच कोणी सांगे की माओ हीसुद्धा व्हिएतकाँग पथकातील कशावरून नसेल ?

एरिकसन म्हणतो, 'हे सगळे पाहिले, ऐकले की माझा हा लढा युद्धाविरूद्धच आहे असे मला वाटू लागे. बाकीच्या सगळ्या लोकांनी स्वतःच्या आपल्या जीवनासाठी, भवितव्यासाठी ही काही एक (युद्ध) संहिता तयार केली होती व जणू मीच तिचा भंग करीत होतो ! आजुबाजूच्या लोकांच्या गप्पा, चर्चा ऐकल्या की या सैनिकांत किती तरी मिझर्व्हे, क्लार्क पसरले आहेत असे जाणवे. आमच्या हिल–१९२ पेक्षाही भयानक, हृदयस्पर्शी कहाणी ऐकायलाही मिळे.

विचित्र कोंडी निर्माण झाली होती आणि तितक्याच विचित्रपणे एरिकसन तीमध्ये अडकला होता. पण ती फुटलीही एका विलक्षण योगायोगाने. नोव्हेंबरच्या ३० तारखेला एरिकसनचे पथक असेच दोन-तीन व्हिएतकाँग गनिमांच्या मागावर निघाले होते. एकाएकी एका बाजूने त्यांच्यावर गोळीबार झाला. पथकाच्या प्रमुखाने उलट हल्ल्याचा आदेश दिला. दिसत तर कोणी नव्हते. पण साधारण दिशा हेरून यांनी उलट बंदुका चालविल्या. हवेत चिक्कार धूर निर्माण झाला. त्यातच जमिनीवरून उडालेला धुरळा मिसळला. जितक्या अकस्मात ही चकमक उडाली, तितक्याच अकस्मात ती शांत झाली आणि धुरळ्यातून पलीकडे दिसले ते अमेरिकन सैनिकांचे आणखी एक पथक व तेही रिलीच्याच प्लटूनमधले. एरिकसनच्या पथक-प्रमुखाने दुसऱ्या पथकाच्या प्रमुखाला त्याच्या मुर्खपणाबद्दल चांगले झाडले. त्याने खुलासा केला तो असा की, ते लोक जरा विश्रांती घेत होते, एवढ्यात त्यांना एरिकसनच्या पथकाची चाहूल लागली. कोण आहे न पाहताच त्यांनी बंदुकी चालविल्या. पण एवढ्यात एरिकसनच्या पथक-प्रमुखाचे इंग्रजीतून उच्चारलेले आदेश ऐकू आल्याने त्याने गोळीबार लगेच थांबवला. अशी 'चुकीने' अमेरिकनांमध्येच आपआपसात चकमक उडल्याचे कधी कोणी ऐकले नव्हते. एरिकसनच्या पथक-प्रमुखाने तेच आपल्या प्रतिस्पर्ध्याला सुनावले.

पण ही बोलाचाली चालू असताना एरिकसनच्या एक गोष्ट ध्यानात आली ती म्हणजे या दुसऱ्या पथकात मॅन्युएल होता. त्यानेही एरिकसनला पाहिले. परंतु कोणीच ओळख दाखवली नाही, पण त्यामुळे एरिकसनच्या मनात उगाचच शंका आली, हा गोळीबार मुद्दाम तर केला गेला नाही ?

आणि हीच शंका कॅप्टन व्होर्स्टला आली की काय, कोण जाणे ? कारण दुसऱ्या दिवशी पहाटेच एरिकसनची रवानगी ७० मैल दूरवर असलेल्या कँप रॅडलिफमध्ये केली गेली. फर्स्ट कॅव्हलरी (एअरबोर्न) डिव्हीजनचा हा तळ होता. येथून अॅन खे हे शहर जवळ होते. कॅप्टन व्होर्स्टने, हिल–१९२ प्रकरणातील सैनिकांच्या बदल्या करताना पूर्वी फक्त मॅन्युएलला एरिकसनच्या जवळपास कोठे तरी ठेवले होते. पण या 'चुकीने' घडलेल्या गोळीबाराच्या

प्रसंगानंतर त्याच्याहीमध्ये ७० हून अधिक मैलांचे अतर निर्माण झाले होते.

वास्तविक डोअर गनर म्हणून नवी नेमणूक होईपर्यंत एरिकसन त्याच पथकात व्होर्स्टच्या जवळ रहायचा होता. त्याच्या बदलीचे कागदपत्र अधिकृत मंजुरीसाठी गेले होते. पण दरम्यान हा नवा प्रसंग घडल्याने त्याची बदली (तात्पुरती) रँडल्किफ कँपमध्ये केली गेली. या तळावर आता जवळ जवळ २०,००० लोकसंख्या व्हायला आली होती आणि त्यांच्यासाठी घरे बांधण्याचे काम जोरात चालू होते. या खात्यात सुतारकामाकडे एरिकसनची नेमणूक झाली. त्याला या कामाची पहिल्यापासूनच आवड. त्यामुळे या कामावर एरिकसन खुष झाला.

पण त्याहूनही त्याला हवीहवीशी वाटणारी एक घटना या तळावर घडली. तो कामाला लागून एक आठवडा झाला होता. एरिकसन आणि त्याचे २० सहकारी त्या दिवसभराचे काम थांबविण्याच्या विचारात होते. एवढ्यात त्याचा एक सहकारी बॉइड ग्रीनेकर त्यांच्यापासून दूर झाला व बाजूने जाणाऱ्या लष्करातील एका पाद्र्याला त्याने गाठले. त्याच्या पोशाखावर कॅप्टनच्या फिती होत्या पण ग्रीनेकरची त्याच्याशी चांगली दोस्ती असावी. हे पाहून एरिकसनच्या डोक्यात विचार आला, आपल्या या प्रकरणात सेनाप्रमुखाची साखळी तोडून वाट काढायची तर या पाद्र्यासारखा माणूस नाही, कारण त्यांचा व्यवसायच विवेकबुद्धी जपण्याचा असतो.

अर्थात त्याला गाठायचे म्हणजे अडचणी अनेक होत्या. एरिकसन सांगतो, 'मुख्य अडचण ग्रीनेकरचा स्वभाव कसा आहे हे कोणाला माहिती? त्यानेही प्लटूनमधील सहकाऱ्यांप्रमाणे माझीच टिंगल उडवली तर? कदाचित तो मिझर्व्हेचा मित्र निघाला तर?'

म्हणून मग नंतरचे दोन दिवस एरिकसन ग्रीनेकरचा स्वभाव, त्याचे वर्तन पारखू लागला. त्याच्या चांगुलपणाविषयी खात्री पटल्यावर एरिकसनने एके दिवशी ग्रीनेकरला फिरायला चलण्यास बोलावले. तरीसुद्धा एरिकसनने सगळ्याच गोष्टी ग्रीनेकरला सांगितल्या नाहीत. माओच्या खुनाचा त्याने पत्ता लागू दिला नाही; मात्र मिझर्व्हे आणि मंडळींनी तिला कसे पळविले व तिच्यावर अत्याचार केला हे सर्व त्याने ग्रीनेकरला सांगितले. तेवढ्यानेच ग्रीनेकरला हे प्रकरण खूप गंभीर वाटले व ते दोघे तसेच पाद्र्याच्या कचेरीत गेले. त्याचे नाव कॅप्टन गेराल्ड कर्क.

रात्री १० वाजता त्यांचे पुन्हा भेटण्याचे ठरले. त्याप्रमाणे एरिकसन कर्ककडे गेला. त्याने सर्व हकीकत सांगितली. एरिकसनला कर्क अतिशय आवडला. 'रोवानपेक्षाही कर्क अधिक स्नेहपूर्ण वाटला. तेथे जरासुद्धा माझ्या मनावर दडपण नव्हते. उलट जसजशी हकीकत सांगत गेलो, तसतसा अधिक मोकळा झालो.' असे एरिकसनने सांगितले तर कर्क नंतर म्हणाला की, 'मी त्याच्या हकीकतीकडे संशयाने पाहत होतो. या धर्मकार्यात पडण्यापूर्वी मी १० वर्षं पोलिसात होतो आणि अत्याचाराच्या कृत्यात एरिकसनने भाग घेतला नाही ना, याची मला खात्री करून घ्यायची होती. ज्या प्रकारे तो माझ्याकडे आला होता त्यावरून मला उगाचच वाटत होतं की, सरकारी माफीचा साक्षीदार बनण्याची त्याची इच्छा होती. तथापी प्रथम जागृत

झालेला माझ्यातला पोलीस हळूहळू नाहीसा झाला. एरिकसनचा प्रामाणिकपणा वादातीत होता. माओविषयी, तिचा जीव आपण वाचवायला हवा होता असं खरोखरच त्याला वाटत होतं. '

मध्यरात्रीच्या सुमाराला एरिकसनची कहाणी सांगून संपली. सुरुवातीला कर्कनेही हे प्रकरण पुढे रेटल्यास त्याचे परिणाम काय होतील, कदाचित एरिकसनचे जीवन धोक्यात कसे येईल हे सांगितले. सरकारी साक्षीदार म्हणून एरिकसन शेवटपर्यंत उभा राहील याची खात्री करून घेतली व नंतर लगेच लष्करातील गुन्हेगार चौकशी विभागाला फोन केला. थोड्याच वेळात दोन अधिकारी कर्कच्या कचेरीत आले. त्यांनी एरिकसनची हकीकत ऐकली. त्याला हवे तसे प्रश्न विचारले. एरिकसन सांगतो, 'माओवरील त्या दिवशीच्या बलात्कारापासून व नंतरच्या तिच्या हत्येपासून मला शांत झोप नाही हे मी त्यांना माझ्या निवेदनात परत परत सांगत होतो. परंतु तपासणी-अधिकाऱ्यांवर त्याचा तसा खास काहीच परिणाम नव्हता. त्यांना ते प्रकरण गांभीर्ययुक्त वाटतच नव्हते. जणू रोजच त्यांच्यासमोर अशी प्रकरणे घडत होती. पण त्यांच्या कामात मात्र कुचराई नव्हती. माझ्या आरोपांचे कायद्यातील गांभीर्य त्यांनी जाणले आणि पहिली गोष्ट केली ती ही की, मला कोठडीत टाकले ! माझ्या संरक्षणासाठीच असे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्या क्षणापासून एरिकसनचे लष्करातील जीवन पार बदलून गेले. संरक्षक–कोठडीतून त्याची काही तासांच्या अवधीतच सुटका झाली. पण त्यानंतर त्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून एका मागोमाग एक अशा परीक्षा सुरू झाल्या. त्याची बदली सुतारखात्यातून मिलिटरी पोलीस कंपनीत करण्यात आली. मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या कचेरीबाहेर पहारा देणे, गेटावर उभे राहणे, तळावर कोठे व्हिएतकाँग गनीम घुसल्याचे कळल्यास छापे घालणे वगैरे त्याची कामे होती. रोज संध्याकाळी मात्र त्याला एका खास बसमधून सुरक्षित स्थळी हलविण्यात येई. निरनिराळ्या व्यसनांना बळी पडलेले सैनिक या मोटारीत असत.

एरिकसन सांगतो, 'सी. आय. डीं.नी मला शेवटपर्यंत डोअर-गनर होऊ दिले नाही. ते काम अतिशय धोक्याचे आहे आणि सरकारी साक्षीदार म्हणून माझा उपयोग करायचा तर मी जिवंत राहणे त्यांना आवश्यक होते. त्या काळात तांत्रिक दृष्ट्या तरी मीच संशयीत गुन्हेगार होतो. सी. आय. डीं.नी मला तसे समजावून सांगितले होते. पण त्याचबरोबर कायदेशीररीत्या मला एक हक्क होता, तो म्हणजे, मी मला हवे तेव्हा तोंड बंद करू शकत होतो व त्याबद्दल पोलिसांनाही काही करता येण्यासारखे नव्हते. हा माझा हक्क सी. आय. डीं.नीच मला सांगितला.'

प्राथमिक चौकशी पूर्ण झाल्यावर काही तपासणी अधिकारी हिल–१९२ वर, प्रत्यक्ष घटनेच्या जागी तलास करण्यास गेले. एरिकसन बरोबर होताच. शत्रूचा हल्ला झालाच तर म्हणून सशस्त्र सैन्यदलही समवेत होते. या शोध-पथकात एक कर्नल, मेजर वगैरे मंडळी होती. विमानाने ते कॅप्टन व्होर्स्टच्या तळाजवळच्या धावपट्टीवर उतरले. तेथे उतरल्यावर या पथकाचे प्रमुखत्व कॅप्टन व्होर्स्टकडेच आले. पण त्याने एरिकसनशी ओळखही दाखवली

नाही. हे पथक हिल–१९२ पर्यंत चालतच गेले. सुमारे सहा तासांचे अंतर होते ते. जवळजवळ सर्वांची, विशेषत: तपासणी अधिकाऱ्यांची हबेलंडीच उडाली होती. एवढ्या अवघड प्रदेशातून एवढे अंतर चालणे त्यांना माहीतच नव्हते.

शोध सुरू झाला आणि थोड्याच वेळात मातीत पसरलेले माओचे शव दिसले. अवतीभोवती चिक्कार घाण जमा झाली होती. ते तेथे पडल्याला आता तीन आठवडे होऊन गेले होते आणि प्रेतालाही दुर्गंधी येत होती. त्याचा शोध लागताच सगळे लोक एकत्र जमले आणि एरिकसनवर प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. एरिकसन नंतर सांगतो, 'ते त्यांचे काम करत होते. मला ते दृश्य सहन होईना. माओ, तिच्या भावना, बळजोर मिझर्व्हे आणि मंडळी, असहाय मी...माझ्या मनात असंख्य विचार होते. पण त्या कार्यमग्न अधिकाऱ्यांना भावना, विचार यांच्यासाठी फुरसत नव्हती. ते कार्यमग्न होते ...माओचे त्या वेळचे कण्हणे त्यांनी ऐकले असते तर? किंवा मॅन्युएलच्या बोज्याचा सारा भार वाहताना अडखळणारे तिचे पाय कोणी पाहिले असते तर...?'

शोध-पथकाचे काम सुरू झाले. प्रेताच्या आजूबाजूची ३० चौरस फूटाची जागा त्यांनी आखून घेतली व पुरावे शोधण्यास सुरुवात केली. बंदुकीच्या गोळ्यांची काही नळकांडी जमा करण्यात आली. माओच्या प्रेताचे भाग तपासणीसाठी घेण्यात आले. प्रेत, लष्कराची म्हणून एक 'जायबंदी-थैली' असते तीमध्ये ठेवून घेतले. सायगाव येथे त्याची उत्तरीय तपासणी व्हायची होती. एक अधिकारी झुडपे हुडकीत असता त्याला दात, हाताची हाडे आणि आणखी काही बंदुकीच्या गोळ्या सापडल्या. ते सारे एका प्लॅस्टिक पिशवीत घेण्यात आले.

यानंतर पुन्हा एकदा तेथे जाऊन असाच आणखी शोध घेण्यात आला. या दोन्ही वेळी मिळालेल्या पुराव्याचा पुढे कोर्टात चांगला उपयोग झाला. बंदुकीच्या गोळ्यांचे तुकडे सापडले होते त्यावरून तज्ज्ञांनी असे सांगितले की, माओवर एम–१६ बंदुकीतून अतिशय जवळ अंतरावरून गोळ्या झाडण्यात आल्या असाव्या. यावरून क्लार्कवर ठपका ठेवणे सुलभ झाले. निदान माओचा एक खुनी एवढा त्याचा गुन्हा निश्चित झाला. माओच्या शवाच्या उत्तरीय तपासणीत असे आढळले की, तिच्यावर निदान तीन वेळा तरी सुरीहल्ला झाला असावा. तिच्या डोक्याच्या चिंधड्या झाल्या होत्या, त्यावरून मस्तकावर निदान दोन तरी अतिशय स्फोटक अशा गोळ्यांचा मार बसला असावा. याच शवावरून ती मंगोलियन वंशाची, १८–२० वर्षे वयाची, ५ फूट ४॥ इंच उंचीची असावी असे ठरविण्यात आले.

तपासणी-अधिकाऱ्यांनी हिल–१९२ ला दिलेल्या पहिल्या भेटीनंतर लगेचच मिझर्व्हे, क्लार्क व दोघा डायेझ बंधूंना (मॅन्युएल व रेफ) पकडण्यात आले. ते अर्थातच कॅप्टन व्होर्स्टच्या अधिकारक्षेत्रात ठिकठिकाणी होते. लष्करी पोलिसांच्या ताब्यात देण्यापूर्वी त्या चौघांची कॅप्टन व्होर्स्टशी मुलाखत झाली. ती विषयी पुढे चौकशी-अधिकाऱ्यांना मॅन्युएलने सांगितले की, 'या प्रकरणाचा उगाच फार गाजावाजा होऊ नये म्हणून मी बरेच प्रयत्न केले असे कॅप्टन व्होर्स्टने आम्हाला सांगितले.

त्याचबरोबर यापुढे मी तुम्हाला कोणताही सल्ला अगर मदत देऊ शकत नाही असेही तो म्हणाला.'

लष्करी पोलिसांनी त्या चौघांना ॲन खे येथे आणले. प्राथमिक चौकशीत मॅन्युएल व रेफ यांनी, एरिकसनखेरीज आपण चौघांनी त्या मुलीवर बलात्कार केला व तिला ठार मारले असे कबूल केले. मात्र मिझर्व्हे व क्लार्क यांनी गुन्ह्याचा इन्कार केला.

चौघांवरचे लष्करी खटले १९६७ च्या मार्च महिन्यात केवळ १० दिवसात आटोपले. रॅडक्लिफ तळावरच कोर्ट बसले होते. दहा दिवस न्यायाधीश, वकील, अधिकारी, गुन्हेगार, साक्षीदार वगैरेंचा मुक्काम तेथेच बाजूच्या झोपड्यांतून असे. उष्मा भयंकर होता. वीज-पुरवठ्यासाठी डिझेल जनित्र बसविले होते. त्याचा आवाज सतत चालू असे. एरवी खटल्याचे कामकाज शांतपणे झाले. रात्रीच्या वेळी शत्रूबरोबर घडणाऱ्या धुमश्चक्रीचे पडसाद कानावर येत व युद्धक्षेत्राची जाणीव होई.

एरिकसन सांगतो : लष्करी खटल्यातील सारे न्यायालयीन नियम आपल्या मुलकी कायद्यांतूनच उचललेले होते व ते अतिशय काटेकोरपणे पाळले जात. एकीकडे शत्रू डोक्यावर बसलेला असताना त्यांनी फेकलेले तोफगोळे केव्हाही आमच्या तळावर येऊन पडणे शक्य होते – एवढे सगळे सोपस्कार करायचे म्हणजे कठीणच काम होते; पण तसे ते केले गेले.

व्होर्स्ट आणि कर्क यांच्याप्रमाणेच सरकारी वकिलानेही, सरकारचा साक्षीदार बनण्याने पुढे ह्याच्या भावी जीवनात काय संकटे येऊ शकतील यांचा पाढा वाचला. एरिकसन म्हणतो, 'त्याला माझ्याविषयी खरंच काळजी वाटत होती.' आरोपीचे वकील एरिकसनला मानसिक दृष्ट्या दुबळा ठरविण्याची शक्यता होती हे हेरून सरकारी वकिलाने आधीच त्याला मनोविश्लेषणतज्ज्ञाकडे पाठविले. प्रत्यक्ष खटल्यात घडलेही तसेच. मात्र आरोपीच्या वकिलांनी त्या मुद्द्यावर विशेष भर दिला नाही. मात्र या वकिलांनी, त्याच्यावर खोटे बोलल्याचा, नामर्दपणाचा, एवढेच काय माओच्या खुनाचाही आरोप ठेवला. एका वकिलाने, मिझर्व्हेच्याच आज्ञेवरून एरिकसनने माओला ठार मारले असे म्हटले. पण ही गोष्ट सिद्ध होणे अवघड होते. कारण रेफने, माओवर गोळी घालणे एरिकसनला शक्यच नव्हते. त्याच्या दृष्टिक्षेपातही ती यत नव्हती, असे ठामपणाने सांगितले होते.

या चारी खटल्यात आरोपीच्या वकिलांचा, एरिकसनच्या वागण्याला व कार्याला लाभत असलेली उदात्तता, मोठेपणा खोडून काढण्याचा प्रयत्न होता. जणू त्यामुळे आरोपींवरचा गुन्हा नाशाबित होणार होता !

नंतर याच पथकाच्या आधीच्या एका मोहिमेत शत्रूबरोबर उडालेल्या चकमकीच्या वेळी एरिकसनने कसे कातडीबचाऊ वर्तन केले, स्वत: झुडपात लपून बसला व इतरांना मात्र लढू दिले याचे वर्णन एका वकिलाने केले.

दुसऱ्या वकिलाने, 'एरिकसनचा हा सारा बनाव आहे. त्याला पुन्हा असल्या कठीण, कष्टदायक मोहिमांवर जायचे नव्हते. त्यासाठी योजलेली क्लृप्ती आहे' वगैरे आरोप केले.

एरिकसन म्हणाला, 'बरोबरच आहे. मला या कंपनीतूनच बाहेर पडायचे होते. हेलिकॉप्टर विभागात डोअर-गनर व्हायची माझी इच्छा होती.

म्हणजे असले प्रकार नकोत व त्यांची चर्चा नको. अर्थात जिविताच्या दृष्टीने डोअर-गनरचे काम फार्च धोकादायक. आपण येथे व्हिएतनाममध्ये युद्ध खेळतो आहोत. पण बाहेर क्षेत्रात जायचे आणि निष्पाप लोकांना मारायचे हे युद्ध नव्हे. मला नाही या युद्धात सामील व्हायचे.'

माओबरोबर एकटा झोपडीत असताना त्याने तिला पळून का जाऊ दिले नाही, हाही मुद्दा उलट तपासणीत आला. एका वकिलाने विचारले, 'जवळपास कोठेतरी चाहूल लागली. मला वाटले, व्हिएतनामी गनीम–म्हणून मी गेलो. येऊन पाहतो तर झोपडीत माओ नाही. अशी काहीतरी तिच्या पळण्याविषयीची कथा बनवून तुला मिझर्व्हला सांगता आली असती.'

'नाही ते शक्य नव्हते'– एरिकसन म्हणाला.

'तुझ्यावर काही आपत्ती येऊ नये म्हणून तू त्या मुलीचा बळी घेतलास असेच नाही का?'

माओची बहीण फान थी लॉक हीसुद्धा खटल्यात साक्षीदार म्हणून आली होती. अमेरिकन सैनिक माओला घेऊन गेल्यावर आपण काय केले याची हकीकत तिने सांगितली. दक्षिण व्हिएतनामी सैन्यात तक्रार नोंदवली. शोध करताना व्हिएतनामी सैनिक बरोबर होते. हिल–१९२ वरील त्या झोपडीतही आम्ही गेलो होतो. माओची रक्ताळलेली अंतर्वस्त्रे तेथे मिळाली.

'पण या शोधामुळेच आमच्या आईवर आपत्ती आली. दक्षिण व्हिएतनामच्या सैनिकांना आपल्या लपण्याच्या जागा दाखविल्या म्हणून व्हिएतकाँग गनिमांनी आमच्या आईला पळवून नेले. त्यामुळे सध्या मी व माझे वडील दूर एका खेडेगावी राहतो.'

एरिकसन, लॉक यांच्यासारखे काही अपवाद वगळले तर बहुतेक साऱ्या साक्षीदारांनी आरोपींच्या बाजूनेच निवेदने दिली. आरोपींचे शौर्य, त्यांची कर्तव्यबुद्धी, लढाईत त्यांनी बजावलेली कामगिरी वगैरे मुद्दे वारंवार येत. अशा आरोपींच्या नशिबी कोठडी यावी व युद्धक्षेत्रात ज्यांनी जिवाच्या शर्थीने लढा दिला, त्यांना कोर्टात आपला जीव वाचविण्याची पाळी यावी याबद्दल जवळजवळ सर्वांनी खेद व्यक्त केला. मिझर्व्ह त्या पथकाचा नेता होता. त्यामुळे त्याचा बचाव करताना साक्षीदारांनी व वकिलांनी त्याच्यावर अक्षरशः स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. उदाहरणच द्यायचे तर लेफ्टनंट रिलीच्या साक्षीचे देता येईल. तो म्हणाला की, 'सार्जंटचे चारित्र्य आणि एकूण ख्याती अतिशय उत्तम आहे. मला ठाऊक असलेल्यांपैकी, तो एक अतिशय उत्तम लढाऊ सैनिक आहे. त्याने आपली मोहीम पुरी केली नाही असे कधी झाले नाही. सैनिक म्हणून मी त्याला जास्तीत जास्त गुण देईन.' अशाच वेगवेगळ्या साक्षींतून सार्जंट मिझर्व्हबाबत बरीच माहिती गोळा होत होती. व्हिएतनाममधील दीड-दोन वर्षांच्या काळात त्याला वेगवेगळ्या कार्याबद्दल पाच पदके मिळाली होती. आता एक ब्राँझ पदक मिळणार होते. वर्तनाबद्दल, त्याच्या नावापुढे कायमच उत्तम असा शेरा होता. व्हिएतनाममध्ये येण्यापूर्वी मिझर्व्ह हा अतिशय आदर्श असा सैनिक गणला जात असे. लिंडन जॉन्सन यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीच्या दिवशी जे सैनिकी संचलन झाले त्यामध्ये भाग घेण्याचे भाग्य निष्कलंक सैन्य-जीवनाच्या फक्त दोनशे सैनिकांना मिळाले होते. त्यात मिझर्व्ह हा एक होता.

अशा खुनी माणसांना पुन्हा (शिक्षा भोगल्यानंतर) लष्करात घ्यावे किंवा नाही हा प्रश्नही कोर्टामधील चर्चेत आला. तेव्हा बहुतेक अधिकाऱ्यांनी, मिझर्व्ह व इतर मंडळींच्या संबंधात, त्यांना लष्करात घ्यावे असेच मत नोंदविले. एकट्या कॅप्टन व्होर्स्टने मात्र, आपल्या अधिकारक्षेत्रात ही मंडळी असू नयेत असे मत नोंदविले.

आरोपींपैकी एकट्या रेफला आपल्या कृत्याबद्दल अतिशय दुःख वाटले असावे. एवढेच नव्हे तर त्याने क्लार्कविरुद्ध साक्ष दिली. या उलट इतर तिघा आरोपींना मात्र आपल्यावर अन्याय होतो आहे, युद्धात हिंसा ही इतकी अटळ व स्वाभाविक आहे की त्याबद्दल संतापाने असे काही करणे योग्य नव्हे. साऱ्या युद्धक्षेत्रात सगळीकडेच हे घडते आहे, असा त्यांचा सूर होता. मॅन्युएलच्या बाबतीत तर हे गोलमोल उत्तर इतके संदिग्ध व गुंतागुंतीचे झाले की न्यायाधीशांनी अखेर त्यास विचारले, 'या अत्याचार-खून प्रकरणात तू कोणत्याही प्रकारे गुंतला आहेस असे तुला वाटते की नाही ?' त्यावर मॅन्युएलने 'नाही' असे उत्तर दिले.

प्रश्न : या खटल्यात गोवून सरकारने तुझ्यावर फार मोठा अन्याय केला आहे असे तुला वाटते का ?

उत्तर : सरकारविरुद्ध मला काही म्हणायचे नाही.

प्रश्न : पण तू यामध्ये गुंतलेला नाहीस हे तुला निश्चित म्हणायचे आहे.

उत्तर : होय.

प्रश्न : मग तुझ्यावर खटला भरायला नको होता ?

उत्तर : होय.

प्रश्न : या खटल्यामुळे तुझी बढती अडली आहे अशीही तुझी तक्रार आहे ना?

उत्तर : मी आमच्या सिनेट-प्रतिनिधींना लिहून, माझ्यावर चुकीने खटला भरला आहे असं कळवलंय.

प्रत्यक्ष खटल्यास सुरुवात होण्यापूर्वी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत मॅन्युएलने, आपण माओवर अत्याचार केल्याचे कबूल केले होते. पण कोर्टात प्रकरण आले तेव्हा त्या गोष्टीला तो अत्याचार म्हणायला तयार नव्हता. 'एका साधारण साहसात' आपण भाग घेतला व तोही लष्करी शिस्तीमुळे, असे तो म्हणतो. या लष्करी शिस्तीबाबत व वरिष्ठांच्या आज्ञा विनतक्रार ऐकण्याबाबतचा एक किस्साही त्याने सांगितला. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रात उतरण्यापूर्वी व्हिएतनाममधील परिस्थितीत लढण्याचे प्रशिक्षण अमेरिकन सैनिकांना दिले जात असे. हे दहा दिवसांचे शिबिर असे. तेथे सगळ्यांचे एकच सांगणे असे की, तुमच्या गटात व्हिएतनाममधील अनुभवी (सहा महिने) ज्येष्ठ सैनिक असला तर उत्तम. तो सांगेल तसे वागा. कल्याण होईल तुमचे. तुमचा काळ ठरलाय त्यापेक्षा निश्चितच अधिक जगाल तुम्ही.

चारी आरोपी कोठल्या ना कोठल्या आरोपाखाली दोषी ठरले. सगळ्यांचे मानसन्मान, पदके काढून घेतली, सर्व पगार रद्द केला, (फक्त रेफच्याबाबतीत अपवाद करण्यात आला. त्याच्या पगारातून दरमहा ५० डॉलर कापले जाणार होते. बाकी पगार त्याला मिळणार होता.) सगळ्यांना साध्या सैनिकाच्या दर्जाला आणून ठेवले. कान्सासमधील फोर्ट लेवनफोर्थ येथील युनायटेड स्टेटस आर्मी डिसिप्लिनरी बरॅक सश्रम कारावासासाठी सर्वांची रवानगी झाली. रेफला सर्वात कमी म्हणजे आठ वर्षांची शिक्षा झाली. क्लार्कला जन्मठेप होती.

मॅन्युएलला १५ वर्षे. या शिक्षांमध्ये तसा निश्चित आधार कशाचाच नव्हता. कारण मिझर्व्हची बलात्काराच्या आरोपातून मुक्तता झाली. मात्र पूर्वनियोजित खुनाबद्दल त्याला दहा वर्षांची सजा झाली. पण त्याचा खटलाच सगळा वेगळा चालला होता. मिझर्व्ह दोषी ठरला होता, पण त्याची शिक्षा जाहीर झाली नव्हती. अशा वेळी कोर्टाने त्याला विचारले, 'तुला आणखी काही विशेष असे कोर्टास सांगायचे आहे काय ?'

मिझर्व्ह म्हणाला, 'मी हत्या अनेक पाहिल्या. कारण युद्धात ते तुमचे कामच आहे; मारा अगर मरा. काही वेळा शत्रूचा इतका तिटकारा येतो. गेल्या ऑक्टोबरमध्ये ऑपरेशन थायर चालू असताना आम्ही एका वस्तीत शिरलो. ती वस्ती जवळजवळ जाळून टाकण्यात आली होती. काही व्हिएतनाम तेथून मुलांना बाहेर काढत होते. त्या सगळ्यांची धुरामुळे नाके चोंदली होती. एक मुलगा तर मृत्युमुखी पडला होता. त्याला मला तोंडाने श्वास द्यावा लागला तेव्हा त्याचा जीव बचावला. हे एवढ्यासाठीच की युद्धक्षेत्रात नुसती लढाई आणि लढाईच नसते हे सांगावे.' यानंतर लगेच मिझर्व्हचा वकील उभा राहिला व या २० वर्षांच्या माणसावर (मिझर्व्हवर) किती मोठे जबाबदारीचे दडपण होते याचे त्याने वर्णन केले. त्याने पुढे सांगितले की अशा परिस्थितीत हिल—१९२ वरील प्रकार हा आपला नेहमीचा घडत असलेला प्रकार मानू नये. शिवाय या बाबतीत एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे; ती म्हणजे... गुन्हा अमेरिकेत घडलेला नाही.

खटले संपल्यानंतर दोन आठवडे झाल्यावरची गोष्ट. कोर्टाच्या कामकाजात दुभाष्याचे कामकाज करणारा व्हिएतनामी शिक्षक एरिकसनकडे आला व त्याने सांगितले की, 'माओची बहीण लॉक हिलाही चार्लीनी (व्हिएतकाँग गनिमांना चार्ली म्हणतात) पळवून नेले आता मागे राहिला आहे तो तिचा बाप.—कदाचित तो स्वतःही चार्ली असेल...'


एरिकसन त्याच्या सैनिकी जीवनात डोअर गनर कधी झालाच नाही. ते त्याचे स्वप्न अपुरेच राहिले. खटल्यांचा पुनर्विचार झाला तर साक्षीसाठी म्हणून त्याला तळावरच लष्करी पोलीस म्हणून ठेवण्यात आले. तेथेही त्याचे सहकारी त्याची या प्रकरणावरून खूप टिंगलटवाळी करायचे. विशेषतः एका सामान्य व्हिएतनामी मुलीसाठी त्याने आपल्या सहकाऱ्यांवर ठपका आणवला याचा त्यांना विशेष राग होता.

काही महिन्यानंतर एरिकसनच्या कानी आले की क्लार्कच्या वकिलाने दयेचा अर्ज केला आहे व त्याची शिक्षा बरीच कमी होण्याची शक्यता आहे. एरिकसन म्हणतो, 'कॅप्टन व्होर्स्टने सांगितले होते तसेच घडत होते. तसे हे पहिले चिन्ह दिसत होते. तो म्हणाला होता की, शिक्षा कमी कमी होत नंतर नाहीशाच होतील.'

एरिकसनची व्हिएतनाममधील नोकरी २८ नोव्हेंबर, १९६७ ला संपली. फेब्रुवारी १९६८ मध्ये काही तरी कायदेशीर चूक झाल्याच्या निमित्ताने मॅन्युएलच्या खटल्याचा पुनर्विचार झाला व ता निर्दोष सुटला.

[पान ५६ वर]

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**